महत्प्रयास करीत असून **वेल्शांपासून** अधिकाधिक मुलूख जिंकीत होते, तों, दुसरीकडे त्या **बीडा**सारखे पुरुष हळू हळू त्या **इंग्लिश** लोकांना सुशिक्षणानें विद्याचारसंपन्न करीत होते.

पूर्वी पाहण्यांत आलेलेंच आहे कीं, पहिल्यानें **नार्थंब्रिया** हें राज्य सर्वांत बलाढ्य होतें. नंतर **मर्शिया** ह्या राज्याची, तेथील प्रतापी राजा **आफ्फा धि माइटी** (पराक्रमी) ह्याच्या कारकीर्दींत (७५७ पासून ७९५ पर्यंत) मात्रा वर चढली. त्या राजानें, **वेल्श** लोकांचा आपल्या राज्यांत रिघाव न होऊं द्यावा ह्या हेतूनें, **चेस्टर** पासून **चेप्स्टो**पर्यंत मोठा बांध बांधविला, आणि **रोम** एथें जाणाऱ्या **इंग्लिश** यात्रेकरूंच्या पोषणाकरितां पैका पाठविला. शेवटीं, ज्या **सर्डिक** नांवाच्या पराक्रमी सरदारानें इ० स० ४९५ त **वेस्टसाक्सनां**ना प्रथम **ब्रिटनां**त आणलें, त्याचा वंशज **वेसेक्स**चा राजा **एग्बर्ट** ह्यानें, **मर्शियन** व **नार्थंब्रियन** ह्या उभयलोकांना जिंकलें, आणि तो, **टेम्स** नदीच्या दक्षिणेकडील सर्व इंग्लिश लोकांचा राजा झाला, आणि थेट **फर्थ ऑफ फोर्थ**पर्यंतच्या मुलुखांतील राजांचा **ब्रेट्वाल्डा** (अधिराज) झाला. **केंट, सस्सेक्स,** आणि **एसेक्स,** हीं तीन राज्यें वेगवेगळीं न राहून, त्यांचें एक राज्य झालें, आणि ह्या प्रकारें, सर्व **इंग्लिश** रयासतेवर पहिल्यानेंच एका राजाचा अमल झाला. **वेसेक्स**च्या राजांचा, सर्व **इंग्लिश** शाईवर पुढील दोनशें वर्षेंपर्यंत मुख्य अधिकार होता, हें पुढें पाहण्यांत येईल.

एग्बर्ट राजानें सर्व इंग्लिश लोकांवर ८०२ पासून ८३९ पर्यंत अमल केला.

प्रकरण ३.

इंग्लिश आणि डेन ह्यांच्या दरम्यानचा झगडा

डेन ऊर्फ नार्थमेन ह्यांची उत्पत्ति.

इंग्लिशांचीं क्षुद्र युद्धें आटपून ते थिरथावर होऊं लागतात तोंच, त्यांना एका नवीन संकटाची दहशत पडली, आणि बहुत काळपर्यंत त्यांची बढती त्यायोगें मागें पडली. परिणामीं त्या संकटापासून त्यांचीं सारीं राज्यें संयोग पावून एक राज्य होण्याच्या कामीं मदतच झाली. ही गोष्ट वाचकांच्या स्मरणांत असेलच कीं, जेव्हां **ट्युटन** नांवाचे लोक सर्व **यूरोप**भर पसरले, (१८ वें पृष्ठ पहा) तेव्हां त्यांपैकीं पुष्कळ, आतां ज्या देशांना **डेन्मार्क, स्वीडन,** आणि **नार्वे,** अशीं नांवें पडलेलीं आहेत, त्या देशांत उत्तरेकडे गेले. हे तिकडे गेलेले लोक जसेच्या तसे रानटी आणि मूर्तिपूजक राहिलेले होते. ते **वोडेन** नांवाच्या देवाला भजत. आणि त्या उत्तरेकडील थंडीच्या आणि नापीक मुलखांत नांदण्याला त्यांना भारी प्रयास पडत. त्यांचे देशबंधु **साक्सन** हे पूर्वीं जसे झालेले होते, तसे तेही समुद्रावर भटकणारे झाले, आणि ते, **नार्थमेन, डेन,** किंवा **व्हाइकिंग,** (व्हाइकिंग म्हणजे खाडीच्या कांठीं राहणारे) ह्या नांवानें प्रसिद्धीस आलेले होते. त्यांनीं **आर्क्नि बेटें,** व **आइल** (बेट) **ऑफ मान,** ह्यांत अगोदरच वसाहती केलेल्या होत्या, आणि फार दिवसपर्यंत लढून **आयर्लंड**चा किनारा त्यांनीं हस्तगत केलेला होता. त्या देशांत **डब्लिन, लिमरिक,** आणि **वाटरफर्ड** हीं त्यांचीं मुख्य शहरें होतीं.

आतां त्यांनीं **इंग्लिशांस** उपद्रव देण्याचा उद्योग आरंभिला. ते कधीं कधीं **इंग्लंडच्या** पश्चिमेकडील **वेल्श** लोकांना मिळत, व कधीं कधीं त्या देशाच्या पूर्व किनाऱ्यावर हल्ले करून, नद्यांच्या मुखांवाटे बोटी वर हकारून जाऊन ठाणीं घालीत, आणि त्यांच्या राहण्याच्या मुख्य ठाण्याभोंवतीं मजबुतीकरितां मातकामाच्या बांध भिंती घालीत. ह्या ठाण्यांपासून निघून ते बाहेरील मुलुखांत स्वाऱ्या करीत, शहरें व मठ जाळीत, हातीं सांपडलेले पुरुष व मुलें ह्यांस ठार मारीत, आणि बायकांस दासी करण्याकरितां पळवून नेत. इ.स. ७९४ इतक्या प्राचीन काळीं देखील त्यांनीं **जार्रो** एथील मठ लुटला, आणि त्यांच्या हल्ल्यांनीं **नार्थंब्रिया** हें राज्य हीनबल झालेलें होतें त्या कारणानेंच कांहीं वांट्यांनीं, **एग्बर्ट** राजाला तें जिंकतां आलें. पहिल्यानें, ते **डेन** लोक उष्णकाळांत येऊन लूट मिळेल ती घेऊन निघून जात. परंतु **एग्बर्टाच्या** मरणानंतर ८३९ पासून ते अधिकच पीडा देऊं लागले; आणि ८५५ त त्याचा मुलगा **एथेल्वूल्फ** हा राजा असतां, ते सारा हिंवाळाभर **टेम्स** नदीच्या मुखाशीं **शेपी** नांवाचें बेट आहे त्यांत राहिले. ८६६ त एका मोठ्या **डानिश** (डेनांच्या) फौजेनें **ईस्ट आंग्लियावर** हल्ला केला, आणि **हंबर** नदी उतरून जाऊन तिनें **यार्क** शहर घेतलें, आणि **नार्थंब्रियाचा** सर्व दक्षिणभाग स्वाऱ्या घालून व्यापून टाकला. नंतर ते लोक, **नार्टिंग्हाम**पर्यंत **मर्शिया** संस्थानांत दक्षिणेकडे घुसले, आणि तो मुलूख पूर्णपणें हस्तगत करून **नार्फक** नांवाच्या कौंटींत **थेट्फर्ड** एथें हिंवाळ्याकरितां छावणी करून राहिले. तेथें त्यांनीं, **ईस्ट आंग्लियाचा** राजा **एड्मंड**

डेन लोकांच्या स्वाऱ्या ७९४–८७९.

वेसेक्सचा एथेल्वूल्फ, ८३९–८५८.

झाला, तो ख्रिस्तीधर्म सोडण्याला कबूल होईना म्हणून, एका झाडाला बांधून घालून तो मरे तोंपर्यंत त्यावर तीरांचा मारा केला.

ह्या प्रकारें **नार्थंब्रिया, मर्शिया,** आणि **ईस्ट आंग्लिया,** ह्या तिन्ही राज्यांचा मोठा भाग जिंकून, जेथें ते जात तेथें विध्वंस आणि दुर्दशा करून, नंतर त्यांनीं ८७१ त **वेसेक्स**वर आपली फौज वळविली. परंतु एथें त्यांना समानकक्ष शत्रु भेटला. त्या काळीं **वेसेक्स**मध्यें **एथेल्वूल्फ** ह्याचे पुत्र चौघे सहोदर बंधु ह्यांनीं मागल्या तेरा वर्षांत एकामागून एक असें राज्य केलेलें होतें. **पहिला एथेल्रेड** ह्या नांवाचा त्या बंधूंपैकीं तिसरा हा, त्या **डेन** लोकांशीं आपला धाकटा भाऊ **आल्फ्रेड** ह्याच्या मदतीनें फार शौर्यानें लढला; **कार्नवाल** आणि **वेल्स** ह्या प्रांतांतील **वेल्श** लोकांना त्यानें जिंकलें; आणि **मोना** नांवाच्या बेटापर्यंतदेखील तो चाल करून गेला. त्या बेटाला **नार्थंब्रिया**चा राजा **एड्वुइन** ह्यानें **आंगलसी** (आंगलांचें बेट) हें नांव ठेवलेलें होतें. परंतु **एथेल्रेड**चे सर्व प्रयत्न निष्फल होऊन **डेन** लोकांची सरशी झाली, आणि ८७१ त जेव्हां तो मृत्यु पावला, आणि **आल्फ्रेड**ाला पसंत करून राजा नेमिलें, तेव्हां सर्व गोष्टी निराशेच्या पंथाला पावत होत्या.

एथेल्बाल्ड, एथेल्बर्ट, आणि पहिला एथेल्रेड, हे वेसेक्सचे राजे, ८५८–८७१.

एकादा चांगला आणि शाहाणा पुरुष महत्संकटकाळीं काय करूं शकतो हें **आल्फ्रेड** राजाच्या इतिहासावरून कळून येतें. त्याचें जन्म **बर्कशायर**मध्यें **वान्टेज** एथें झालें. तो अगदीं लहान मूल असतां, आपली आई **आस्बर्घा** हिला जुन्या **साक्सन** कविता तोंडानें पाठ म्हणून दाखवी. ती एके दिवशीं म्हणाली 'तुझां

वेसेक्सचा आल्फ्रेड धि ग्रेट, ८७१–९०६.

मुलांपैकीं जो कोणी हें पुस्तक प्रथम पाठ म्हणून दाखवील त्याला तें बक्षीस मिळेल.' गोष्ट अशी सांगतात कीं, त्या लहान्या **आल्फ्रेडानें** तें पुस्तक आपल्या गुरूकडे नेलें, आणि जेव्हां तें तो सारें शिकला, तेव्हां त्यानें तें आपल्या आईस तोंडपाठ म्हणून दाखविलें. ही गोष्ट खरी असेल तर ती, तो मुलगा चार वर्षांच्या वयाचा होण्यापूर्वी घडलेली असली पाहिजे, कारण तो त्या वयाचा असतां त्याच्या बापानें त्याला **रोम** एथें पाठविलें, आणि तदनंतर त्याची आई पुनः त्याच्या दृष्टीस पडली नाहीं. तो पुढें आपल्या बापासंगतीं दुसऱ्यानें **रोम** शहरीं गेला तेव्हां, त्याला पुढें फार उपयोगीं पडलें असलें पुष्कळ ज्ञान त्यानें त्या शहरांतच फारकरून संपादन केलें असावें असें दिसतें. तो वीस वर्षांचा होण्यापूर्वीच त्याचा सुखदप्रकारें विवाह झाला, परंतु त्याची शरीरप्रकृति रोगी असल्यामुळें तिच्याशीं, व फेपऱ्याचे त्याला वारंवार झटके येत त्यांच्याशीं, त्याला झुजावें लागे. अशा स्थितींत असतां, जेव्हां **डेन** लोकांच्या हल्ल्यांनीं वैराण झालेल्या मुलुखाचा तो राजा झाला, तेव्हां, तो फक्त बेवीस वर्षांचा होता.

आल्फ्रेडाचें बाळपण.

आपल्या भावाच्या मृत्यूनंतर एका महिन्याच्या आंतच त्यानें **डेन** लोकांशीं लढाई केली, परंतु तींत त्याचा पराभव झाला. त्या काळापासून, त्या **डेन** लोकांशीं केव्हां लढावें, केव्हां पैसा देऊन त्यांना वारावें, अशा प्रकारें त्यांना वश करण्याकरितां त्यानें फार प्रयास केले, परंतु ते व्यर्थ गेले. त्याकडून द्रव्य घेऊनही ते **डेन** लोक, समुद्रावरून कधीं संपूंच नयेत अशा हजारों जणांच्या तांड्यांनीं येऊं लागले. त्या स्वाऱ्या घालणाऱ्यांनीं,

आल्फ्रेड राज्य सोडून भटकूं लागतो, ८७८.

मंक (जोगी) आणि इतर धर्मोपदेशक ह्यांना त्यांच्या घरांदारांतून हुसकून लाविलें, तेव्हां ते सर्व मुलूखभर भटकूं लागले, किंवा त्यांनीं आपला द्रव्यसंचय व मोलवान वस्तु यूरोपांत नेल्या. लोक फार जर्जर होऊन भिकेस लागले. सर्व जमीन ओस पडली, आणि वेसेक्समध्यें अद्यापि पुष्कळ वेल्श लोक राहिलेले होते, त्यांची डेन लोकांना मदत करण्याची अर्धी प्रवृत्ति झालेली होती. शेवटीं, ८७८ त, सात वर्षेंपर्यंत बहुशः सतत युद्ध चालून, वुइल्टशायरमध्यें चिपनम एथें, आल्फ्रेडचा इतका पुरा पराभव झाला कीं, त्याला वेष पालटून समर्सेट-शायरांतील जंगलांत आणि दलदलींत पळून जाणें भाग आलें. परंतु पूर्वी मर्शियाचा राजा स्वदेश त्याग करून यात्रेकरू बनून रोम एथें मरावयास गेलेला होता, तसा स्वदेशत्याग तो करीना. त्याची प्रजा विपत्तिग्रस्त होती, तिला तींतून सोडविण्यास मदत केलीच पाहिजे असा त्यानें निश्चय केला.

आल्फ्रेड राजानें एका मेंढपाळणीच्या झोंपड्याचा आश्रय केला होता, तेथें एका वेळीं आपला देश शत्रूंपासून कसा वांचवावा ह्या विचारांत तो निमग्न होता, त्यामुळें, ती भली मेंढपाळीण, रोट्या शेकोटीवर ठेवलेल्या आहेत त्या करपूं देऊं नको, त्यांकडे पाहत राहा, असें त्याला सांगून बाहेर गेली असतां, त्यानें त्यांची करपून राख रांगोळी होऊं दिली अशी जी कथा सांगतात, ती तो पळून गेला होता त्याच वेळची होय. असो, गेला बाजार तरी, तो देश सोडविण्याच्या विचारांत निमग्न होई, त्यापासून योग्यच फळ झालें. मग, त्या समर्सेटशायरांतील दलदलींत एक आथेल्नि नांवाचें बेट होतें त्यांत हळू हळू इमानी मित्रांची एक टोळी जमवून, तो वसंतऋतूंत, आपलें राज्य पुनः जिंकून परत घेण्याकरितां निघाला. तो जसजसा पुढें पुढें

जाऊं लागला, तसतसे लोकांचे थवेच्या थवे त्याच्या जरीपटक्याभों-वतीं जमूं लागले. नंतर जिवावर उदार होऊन लढून, त्यानें **डेन** लोकांचा **चिपनमा**जवळ **एडिंग्टन** एथें पुरा पराभव केला, आणि त्यांचा **गथ्रुम** नांवाचा प्रमुख होता त्याकडून जरबीनें **वेडमोर** एथें इन्नतीचा तह करून घेतला. त्या तहानें, **टेम्स** नदीच्या मुखापासून **बेडफर्ड**पर्यंत, आणि तेथून ऊज नदीच्या कांठासरशी, जात जात, जुना **रोमन** लोकांचा **वाट्लिंगस्ट्रीट** नांवाचा राजमार्ग होता तेथपर्यंत, आणि **वाट्लिंगस्ट्रीट**पासून **चेस्टर**पर्यंत, अशा एका काढलेल्या कल्पित रेघेच्या दक्षिणेस, आम्ही पाऊल घालणार नाहीं असें **डेन** लोकांनीं आपणांस बांधून घेतलें. त्या तहानें देखील सारी **नार्थंब्रिया** आणि **ईस्टआंग्लिया डेन** लोकांना मिळून, शिवाय **डेन** लोकांचीं **पांच बरोझ** (कांहीं अधिकार मिळालेलीं गांवें) असें ज्याला म्हणत तो **मर्शिया**चा भागही त्यांना मिळाला. हा एकंदर मुलूख "**डेनला**" (नकाशा नंबर २ पहा) ह्या नांवानें प्रसिद्धीस आला. **आल्फ्रेडा**नें फक्त **वेसेक्स**, आणि **मर्शिया**चा कांहीं भाग, इतका मुलूख आपल्याकडे ठेविला. परंतु त्या अतिशयित पिडलेल्या भूमीला त्यानें पीडेपासून सोडवून शांतिसुख मिळवून दिलें, आणि पुढें **गथ्रुम** आपल्या अनेक बडे लोकांसह बाप्तिस्मा घेऊन **ख्रिस्ती** झाला, त्यामुळें **इंग्लिश** आणि **डेन** लोक पूर्वींहून विशेष सुखानें एकत्र वस्ती करून राहूं लागले.

वेडमोर एथील तह ८७८.


आल्फ्रेड आतां **वेसेक्स**वर चांगल्या प्रकारें अमल करून आपल्या राज्याची मजबुती वाढविण्याच्या उद्योगास लागला. त्यानें **इंग्लिशांचे** जुने कानू एकत्र केले, आणि त्यांना **बाइबलांतील** दहा आज्ञा व **मोझिझचे** कांहीं कानू जोडले, आणि तो एकत्र केलेल्या

कानूंचा संग्रह, त्या देशाचें धर्मशास्त्र म्हणून स्वीकारण्याला त्यानें **वुइटान** (बुधजनमंडल) ह्याला समजूत घालून प्रवृत्त केलें. शिवाय, श्रीमंत व गरीब ह्यांस सारखा न्याय मिळावा असें करण्याबद्दल त्यानें फार श्रम केले. त्यानें जुने पडलेले मठ व शाळा ह्यांचा जीर्णोद्धार करून नवे मठ आणि शाळा बांधविल्या, आणि त्यांत शिकविण्याचें काम करण्यासाठीं चोहोंकडून विद्वान लोकांना बोलावून आणविलें. त्यांतलाच एक, तो **आस्सर** नांवाचा प्रख्यात **वेल्शमन** होता. **आल्फ्रेडानें** आपल्या राजवाड्यांत राज्यांतील बडे लोकांकरितां म्हणून एक शाळा घातलेली होती, तिजवर तो जातीनें देखरेख करी; आणि स्वतंत्र कुलांत जन्मलेल्या प्रत्येक तरुण पुरुषाला "**इंग्लिश** भाषा चांगली समजूं लागे तोंपर्यंत आपलें पुस्तक कधीं सोडूं नये" असें तो प्रोत्साहन करी. त्यानें **बीडचा इतिहास** व इतर ग्रंथ ह्यांचे **इंग्लिश** भाषेंत तर्जुमे केले, आणि विद्यार्थ्यांकरितां वेंचे म्हणून तयार केले. शिवाय, त्यानें मार्ग दाखवून दिला त्या मार्गानें, **साक्सन क्रानिकल**, म्हणजे **साक्सनांची** बखर, रचण्याचें काम आस्थेवाईकपणानें चालू झालें. ह्या प्रकारें तो **इंग्लिश** ग्रंथकलापाचा जनक किंवा उत्पादक झाला, कारण त्याच्या काळापर्यंत जुनीं **साक्सन** काव्यें, आणि **सीड्मनचें** गीत, ह्यांखेरीज बाकीचीं सर्व पुस्तकें **लाटिन** भाषेंत रचलेलीं होतीं.

आल्फ्रेडाची राज्यकारभाराची रीति.

त्याचा सारा उद्योग केवळ ग्रंथांविषयींच होता असें नाहीं. त्यानें आपल्या प्रजेचे दोन भाग केलेले होते, त्या दोहों भागांतील लोकांनीं पाळीपाळीनें लढाईस जावें, व घरेंदारें जमीनजुमले ह्यांचें रक्षण करावें अशी योजना केलेली होती. शिवाय किल्ल्यांच्या र-

नकाशा नं ४ शंभर वर्षांच्या युद्धांतील विख्यात लढाया आणि वेढे.



नकाशा नं २


इंग्लंड
आणि
डेन-लॉ
मैलाचें प्रमाण
ब्रिटन
डेन्स
इंग्लिश
मानबेट
मांचेस्टर
यॉर्क
लेस्टर
वारिक
लिंकन
सरी
कंटरबरी
केंट
सालसबरी
डोरचेस्टर

क्षणाकरितां त्यानें निरंतर हत्यारबंद असा एक वेगळा शिपायांचा समुदाय ठेवलेला होता. त्यानें जहाजें बांधविलीं. त्यांच्यायोगें एका वेळीं **डेन** लोकांनीं मोठा निकराचा हल्ला केलेला त्यानें मागें हटविला. तीं त्यानें बांधविलेलीं जहाजें, ही, हालींच्या **इंग्लिश** अरमाराची पहिली सुरुवात होय. **लंडन** शहर आगीनें आणि लुटीनें अगदीं जमीनदोस्त झाल्यासारखें झालेलें होतें, तें त्यानें पुन: बांधविलें. त्यानें **नार्वेदेशास, जरूसलेमास**, आणि **हिंदुस्तानास** देखील, जाण्यास प्रवासी लोकांस उमेद दिली. पूर्वीं (३७ वें पृष्ठ पहा) जेव्हां **रोम** एथें जाणाऱ्या यात्रेकरू लोकांच्या पोषणाकरितां म्हणून **आफ्फा** राजा **पोपा**कडे द्रव्य पाठवूं लागला तेव्हां, **पीटर्स पेन्स** नांवाचा, दरघरास दरसाल एक पेनी ह्याप्रमाणें, कर प्रथम चालू झाला होता, तो कर ह्या **आल्फ्रेड** राजाच्या कारकीर्दींत दरसाल वसूल करून जी जमा होई ती **पोपाला** खंडणीदाखल पाठविली जाऊं लागली. थोड्याच वर्षांमागें (म्हणजे १८८३ त), **आल्फ्रेडाचे** नातू **आथेल्स्टन** आणि **एड्मंड** ह्यांच्या शिक्क्यांच्या रुप्याच्या नाण्यांचा जमिनींत पुरलेला असा मोठा ठेवा **रोम** एथें उकरून काढला. **आल्फ्रेडानें** आपल्या प्रजेला, उद्योगशीलता, आत्मसंयमन, आणि परम सहनशक्ति ह्या तीन गुणांचा कित्ता घालून दिला, आणि त्याच्यापूर्वीं एकाही राजानें कधींही जोडली नव्हती इतकी लोकप्रीति त्यानें संपादन केली. त्याचा दिवस नित्यकृत्यें करण्यांत वांटलेला असे. प्रत्येक मेणबत्ती बरोबर दोन तास जळणारी अशा मेणबत्या जळत ठेवलेल्या असत, त्यांवरून ईश्वरोपासना, विद्याध्ययन, किंवा मेहनतीचें कामकाज, ह्याकडे लाविलेला काळ बरोबर कळे. **आल्फ्रेडाचें** मन अत्यंत धर्मासक्त असे, आणि

पीटर्स पेन्स.

त्यानें, आपल्या मुलांच्या मनांत स्वकर्तव्याचें ज्ञान अत्यंत जागृत असावें, अशा प्रकारचें त्यांना शिक्षण दिलेलें होतें. त्याला मुलें पुष्कळ होतीं, त्यांपैकीं दोनच इतिहासांत महत्वाचीं होतीं. तीं हीं, (१) **एथेल्फ्लेड** नांवाची कन्या. तिनें एका **ईल्डार्मन** बरोबर लग्न केलें, आणि तिचा पति वारल्यावर, वैधव्यांत तिनें **मर्शियाचें** राज्य केलें. आणि (२) **एडवर्ड** नांवाचा मुलगा. हा, जेव्हां त्याचा बाप **आल्फ्रेड** ९०१ त वारला, तेव्हां त्याच्या मागून त्याच्या गादीवर बसला.

आल्फ्रेडाच्या वंशजांच्या कारकीर्दींत, इंग्लंड सारें एक करण्याविषयीं प्रयत्न.

आतां ८० वर्षेपर्यंत **इंग्लिश** लोक, **नार्थमेन** म्हणजे **डेन** ह्यांच्या स्वाऱ्यांपासून बहुशः मुक्त झालेले होते. परंतु त्या मुलखांत अनेक वेगळालीं राज्यें असून, तीं सारीं एकमेकांचा मत्सर करणारीं असल्यामुळें त्यांत शांति राहणें अशक्य होतें. तशांत, मुख्यत्वें, त्या राज्यांनीं जिंकलेले **वेल्श** लोक पश्चिमेकडच्या कुशींत, आणि तीं राज्यें अर्धींशीं ज्या लोकांनीं जिंकलेलीं होतीं ते **डेन** लोक पूर्वेकडच्या कुशींत, सलणाऱ्या कांट्यांसारखे अद्यापि होते. आपला बाप **आल्फ्रेड** हा वारल्यावर **एथेल्फ्लेड** (हिला **मर्शियाची** नायका किंवा कुलवधू असें म्हणत) ही मोठ्या शौर्यानें उद्योगास लागली, आणि तिनें, **डर्बी, लिंकन, लेस्टर, स्टांफर्ड,** आणि **नार्टिंग्हाम,** हीं जीं पांच **डानिश बरोझ,** म्हणजे **डेन** लोकांचीं सनदी गांवें म्हणून प्रसिद्ध होतीं, तीं जिंकून घेतलीं.

एडवर्ड धि एल्डर (वडील) ह्याची कारकीर्द, ९०१–९२५.

तिच्या मृत्यूनंतर **एड्वर्ड** ह्यानें बाकी राहिलेला **डेनला** म्हणजे **डेनांचा** मुलूख जिंकून हस्तगत केला. त्याच समयीं **नार्थ-**

ब्रियांत राहणारे **डेन** व **इंग्लिश**, ह्या उभयतांनीं, आणि **वेल्स**, **स्ट्राथ्क्लाइड**, आणि **स्काटलंड**, ह्या देशांतील राजांनीं त्या **एड्वर्डाला** आपला 'पिता आणि स्वामी' पसंत करून नेमिलें.

ह्याप्रकारें, तो **एड्वर्ड** वस्तुतः सर्व मुलुखावर अमल करूं लागला, आणि त्याचा पुत्र **आथेल्स्टन** हाच त्याच्या मागून त्याच्या गादीवर बसला, तो तर आपणाला वारंवार **ब्रिटना**चा सार्वभौम राजा असें म्हणे. तथापि त्या **आथेल्स्टनाला**, **स्काट** लोक, आणि **स्ट्राथ्क्लाइडांतील वेल्श** लोक, ह्यांच्या संबंधानें भारी अडचणी होत्याच. त्या **स्काटांनीं**, व **स्ट्राथ्क्लाइड**च्या **वेल्श** लोकांनीं, **डेन** लोकांशीं कट करून त्याच्या विरुद्ध बंड केलें; परंतु त्यांचा **हंबर** नदीच्या उत्तरेस **ब्रुनान्बर्ह** एथील विख्यात लढाईत पराभव झाला. **आथेल्स्टन**च्या मागून गादीवर एकामागून एक असे बसणारे **एड्मंड**, **एड्रेड**, आणि **एड्वुइ** (ह्यांपैकीं पहिले दोघे **एड्वर्डा**चे पुत्र, आणि तिसरा **एड्वर्डा**चा नातू होता) ह्या सर्वांना, आपआपल्या छोट्या कारकीर्दींत, सर्व बाजूंनीं बंडें उठलीं होतीं त्यांविरुद्ध, थोडेंबहुत झगडावें लागलें. शेवटीं ९५९ त जेव्हां **एड्वुइ**चा भाऊ आणि **आल्फ्रेडा**चा पणतू **एड्गर** गादीवर बसला, तेव्हां सर्व राज्यांत सतत २० वर्षेंपर्यंत दंगेधोपे न होऊन शांति होती.

आथेल्स्टन, ९२५.

ह्या सुपरिणामाला, एक **डन्स्टन** नांवाचा लक्ष्यांत ठेवावयाजोगा पुरुष होता, तो मुख्यत्वेंकरून कारण झाला. तो **ग्लास्टन्बरी** एथें ९२५ त जन्म पावला, आणि त्यानें **एड्गर** राजाला शाहाणपणानें राज्यकारभार करण्याला मोठें साहाय्य केलें. पण प्रथम, **एड्गर** राजाला ज्या लोकांवर अंमल करावयाचा होता, ते लोक

राष्ट्रांतील लोकांची स्थिति.

कोणत्या प्रकारचे होते हें पाहिलें पाहिजे; कारण सर्व गोष्टी स्थिरस्थावर होऊं लागल्या, तसतसे अनेक फेरफार होत गेलेले होते. पूर्वीपेक्षां राजा विशेष बलाढ्य झालेला होता. पूर्वी खेडीं एकत्र करून शतकुटुंबसमुदाय नांवाचे प्रांतविभाग केलेले होते. ते समुदाय आतां एकत्र करून त्यांचे **सेक्शन्स** अथवा **शायर्स** नांवांचे देशविभाग केले. आणि त्या प्रत्येक **शायर**वर

राजाचा शेरिफ़ नांवाचा अंमलदार.

शायर–रीव्ह अथवा **शेरिफ्फ** म्हणजे नाजरासारखा अधिकारी नेमलेला असे. तो राजाच्या खुद्द निसबतीचा अधिकारी असे. त्यानें राजाचे कर वसूल करावे, आणि **शायर–मूट** (शायरांतील महाजनसभा) मध्यें **आल्डर्मेन** आणि **बिशप** ह्यांच्या बरोबर बसत जावें अशी योजना केलेली होती. **बिशप** हा अधिकारी नेहमी राजाच नेमी. राजाच्या **थेनांची** (मानकऱ्यांची) संख्याही पूर्वीपेक्षां वाढलेली होती. त्यांना राजाकडून जमिनी मिळत, ह्यास्तव पाहिजे त्यावेळीं त्यांना कुमकेकरितां राजा बोलावूं शके. ह्या **थेनांचा** मिळून एक नवीन बडेलोकांचा

थेन लोकांचें माहात्म्य वाढतें.

वर्ग बनला. त्यांना मानमरातब, राजानें त्यांना बडेलोक बनविलें म्हणून असे. जुन्या **इओरल** लोकांना मानमरातब होता तो, ते प्राचीन खानदानींतले म्हणून होता. दुसरा एक फेरफार झाला होता तो **इओरल** लोकांत झाला होता. बंडाळीच्या काळांत आपल्या बरादारांचा बचाव करणें हें त्यांना महत्संकटाचें काम झालेलें होतें, तेव्हां ते आपल्याहून कोणा श्रीमान व बलाढ्य पुरुषाचा दुमाला

फ्रिथ–गिल्डें.

स्वसंतोषानें धरीत. ही गोष्ट शहरांतून फारशी घडत नसे, कारण तेथले लोक एकत्र

जमून मिथ—गिल्डस, म्हणजे स्वस्थता राखण्याकरितां मंडळ्या, स्थापीत असत, आणि प्रसंगीं एकमेकांच्या साहाय्याला ते सिद्ध असत. परंतु सेक्सापाळ्यांतील छोटे छोटे जमीनदार (स्वतंत्र पुरुष), आपल्याला कोणीतरी स्वामी किंवा धनी पाहिजे म्हणून, कोणी डोईजड पुरुष शोधून काढून, त्याला आपला धनी करून आपण त्याच्या दिम्मतीचे किंवा पदरचे लोक होत. त्यांना त्याची चाकरी करावी लागे. अशा लोकांना, लाटिन भाषेंत शेतकरी ह्याअर्थी व्हिलनुस म्हणून शब्द आहे त्यावरून, व्हिलन्स असें म्हणत, आणि ते आपल्या धन्याला ह्लाफर्ड अथवा लार्ड असें म्हणत. त्या शब्दाचा अर्थ अन्नदाता. एकंदरीनें त्यांची स्थिति वाईट नव्हती. त्यांना जातीचीं घरें आणि जमिनी असत. त्यांना खाण्याला जवाची किंवा सातूची भाकर, मध, मासे, भाजीपाला, आणि फळें, हीं असत, आणि पिण्याला ताक असे. पूर्वी, व्हिलेज-मूट (गांवांतील महाजनसभा) हिजकडून हक्कानें त्यांना जमीन मिळत असे, आणि प्रत्येक माणूस, दुसऱ्या कोणत्याही माणसाप्रमाणें मान वर करून चाले, आणि स्वतंत्रपणानें आपलें मत देई. तें सारें आतां पालटून, त्यांना जमीन आपल्या धन्याकडून मिळे, त्यांना एके गांवांत किंवा जागीं खिळलेलें राहवें लागे, आणि त्या धन्याच्या द्वारें काय तो त्यांचा सरकारी कारभारांत हात किंवा हिस्सा; एरवीं कांहीं नांहीं, असें झालें.

सिओरल्स हे कमी दरज्यास पावून व्हिलन्स होतात.

अशी स्थिति झाली होती तरी, अद्यापि पुष्कळ स्वतंत्र असे सिओरल्स आपआपल्या जातीच्या घरवाडींत राहणारे होते. घरधनी अंगीं सणाच्या किंवा तागाच्या कापडाचें खमीस, व त्यावर अस्मानी रंगाच्या कापडाचा कमीचाचा डगला घालून, तागाच्या

कापडानें आपले पावलांपर्यंत पाय लपेटून, पायीं कातड्याचा जोडा घालून, आपल्या मिराशी चिरंतन हक्काच्या जमिनीवर काम करीत असणारे आपले गुलाम व मजूर ह्यांकडून काम घेत असे. आणि घरधनीन आपला कशीद्याचा झगा घालून, वरून सणाच्या कापडाचा बुरखा घेऊन, बायकांच्या वेलींच्या मंडपांत सूत कांतणाऱ्या अथवा घरांत किंवा स्वयंपाकघरांत आपआपलीं कामें करीत असणाऱ्या आपल्या चाकरिणींस काम अमुक तऱ्हेनें करा म्हणून सांगत राही. हे लोक, प्राचीन काळीं जितके स्वतंत्र होते, तितकेच अजून स्वतंत्र होते, आणि तेच, अलीकडील काळांतले धट्टेकट्टे योमेन म्हणजे छोटे वतनदार शेतकरी म्हणून होते, त्यांचे पूर्वज होत.

उत्तरकेडील योमेन छोटे वतनदार शेतकरी.

बडे लोकांच्या घरांदारांसारखींच त्यांचीं घरेंदारें फारकरून साफसूफ नीटनेटकीं असत. गोमांस, मेंढ्यांचें मांस, एल (सातूंपासून केलेली दारू) आणि मीड (मधपाणी, मधुनीर) हे पदार्थ त्यांच्या लांबलचक दिवाणखान्यांतील भोजनाच्या मेजांवर दृष्टीस पडत. त्या मेजांवर धनी व चाकर एकत्र खान्याला बसत, आणि कोणाही माणसाला, त्यांच्या स्वातंत्र्याचा निरोध करण्याचा, किंवा हक्कानें त्यांजकडून चाकरी घेण्याचा, अधिकार नव्हता. ह्या स्वतंत्र सिओरल्स लोकांची वस्ती मुख्यत्वेंकरून इंग्लंडच्या उत्तरेकडील भागांत होती, आणि बिशपांना आपले पुढाईत करून ते, दक्षिणेकडील मोठमोठाल्या बडेलोकांशीं वारंवार कलह करीत. ते बडेलोक, दिवसानुदिवस त्यांच्या सत्तेखालीं ज्यास्ती ज्यास्ती छिहलन लोक येत चालले त्यामुळें, कदरखोर शेखीमिरवणारे होत चालले होते.

बडेलोक आपआपल्या जात जमीनदारीवर आळसांत, आणि

वारंवार धुमश्चक्रींत आयुष्य घालवीत. त्यांना, शेतकाम करणारे अथवा सुतार, लोहार अथवा चांभार, ह्या कारागिरांचीं त्यांचीं पडतील तीं कामें करण्याला त्यांचे व्हिलन्स होतेच. शिवाय त्यांचे गुलाम म्हणून वेगळे होते, त्यांची संतति विकण्यासाठीं ते वाढवीत. त्यांना खाण्याला, घरगुती गाई–मेंढ्यांचें मांस, आणि शिकारीनें मिळण्याजोगें मांस विपुल होतें. पिण्याला चांगली एल (सातूंपासून केलेली दारू), मीड (मधपाणी, मधुनीर), आणि वाइन (द्राक्षासव) असे. लढाई वगैरे धामधूम नसून स्वस्थता असे त्या काळांत, बडेलोकांचे, शिकार, व हिरीससाण्यांकडून पारध, कुस्त्या, आणि पैजेच्या दवडी, हे आवडते उद्योग असत. त्यांच्या बायका सूत कांतीत किंवा कशीदा काढीत. फिरता शाहीर त्या बडेलोकांच्या वाडवडिलांनीं बांधलेल्या वाड्यांतील दिवाणखान्यांत लावण्या, पवाडे गाई, अथवा फिरते गारुडी आपलें गौडबंगाल दाखवून, आणि कोल्हाटी आपले आंगकसरतीचे चमत्कार दाखवून, तमाशा पाहण्यास जमलेल्या मंडळीचें मनरंजन करीत. लढाईच्या प्रसंगीं ते बडे लोक, राजानें आज्ञा करितांच एकत्र जमत, आणि आतां वुइटान्जिमोट (बुधजन मंडल) मध्यें बसण्याचा अधिकार असणारे मुख्य सभासद म्हटले म्हणजे हे बडेलोक व बिशप हेच कायते होते. त्या सभासदांना, राजाची निवडणूक करणें, किंवा राजाला पदच्युत करणें, न्यायमनसुबा करणें, तह करणें, राज्यांतील जमिनीची व्यवस्था करणें, म्हणजे देणें, काढून घेणें, किंवा विकणें वगैरे, आणि राज्याचा कारभार चालविणें, इतक्या गोष्टींविषयीं अधिकार होता. ह्याप्रकारें बडेलोक आणि बिशप हे मोठ्या महत्वाचे झाले, आणि त्यांचा दरजा, राजा आणि सामान्यप्रतीचे लोक ह्यांच्या दरम्यानचा होता.

बडेलोक आणि बिशप.

लंडन आणि **वुइन्चेस्टर** ह्या त्या काळच्या दोहों मोठ्या शहरांत **वुइटान्स** (बुधजन मंडलें) भरत असत, आणि त्यांत सामान्यप्रतीच्या लोकांस जाण्याची मोकळीक असे. तेव्हां त्या दोन शहरांत मात्र स्वतंत्र माणूस आपला शब्द अजून ऐकून घेववी.

डेन व इंग्लिश ह्यांची मिसळीची वस्ती.

आल्फ्रेडाच्या काळापासून दुसरा एक मोठा पालट झालेला होता, तो हा कीं, **इंग्लंडच्या** साऱ्या पूर्व-कांठालगतची वस्ती **डेन** व **इंग्लिश** ह्यांच्या मिसळीची झाली; कारण, **डेन** लोक आम्ही देश जिंकणारे म्हणून वसाहती करून राहिलेले होते, आणि आपल्या हक्काला धक्का न लागावा म्हणून ते फार साशंक असत. शिवाय, राजावांचून इतर कोणालाही ते डोईजड असा मानीत नसत, आणि केव्हांही एकाद्या प्रकरणांत राजाकडून त्यांना असंतोष होण्याला कारण झालें तर, ते लागलेच त्यावर बंडावा करून उठत. सारांश ते उत्तरेकडील स्वतंत्र लोकांसारखे धट्टेकट्टे आणि स्वतंत्र होते.

डन्स्टनाचा राज्यकारभार.

डन्स्टन हा पोरवयांत असतांनाच **आथेल्स्टनच्या** दरबारीं प्रथम आला, तेव्हां वर लिहिल्याप्रकारची लोकस्थिति होती. दरबारांतील उन्मत्त बडेलोकांना त्याचें ज्ञान आणि बुद्धिवैभव पाहून त्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला, आणि त्यांनीं त्याला दरबारांतून पिटाळून लावलें. पुढें त्याला जिवावरचें दुखणें आलें. त्यांतून बरा झाल्यावर तो **मंक** (रोमन क्याथोलिक धर्मांतील जोगी) झाला. नंतर **एड्मंडानें** त्याला **ग्लास्टन्बारि** एथील आबट (मठाधिपति) केलें. पुढें तो त्याच राजाचा प्रधान झाला, तेव्हां त्यानें मोठ्या खंबीरपणानें राज्यकारभार केला. प्रथम त्यानें कं-

बर्लंड हा प्रांत **स्काटांचा** राजा **माल्कम** ह्याला देऊन त्याचें सख्य जोडलें, आणि **माल्कमाकडून डेन** लोकांस कुमक होऊं नये असें केलें. नंतर **डेन** लोकांना त्यांचे कानू व रिवाज ह्यांप्रमाणें चालण्याची मोकळीक नव्हती ती त्यांस देऊन त्यांना खुश केलें; आणि श्रीमंत व गरीब ह्यांच्याशीं सारख्या नेकीनें आणि सरळपणानें वागून, त्यानें त्या पिडलेल्या राज्यांत कांहीं एक प्रकारचा न्याय म्हणून जागृत ठेवला. **एड्मंड** ह्याला एका **लीओफ्** नांवाच्या न्यायरक्षणबाह्य किंवा राजरक्षणबाह्य गुन्हेगारानें ९४६ त ठार मारलें. तथापि **डन्स्टन** हा **एड्रेड** राजाच्या कारकीर्दीत प्रधानकीच्या अधिकारावर होताच. पुढें **एड्वुइ** राजाच्या मनांत आपल्याच कुळांतील एका नातलग स्त्रीशीं लग्न करावयाचें होतें, त्याला **डन्स्टन** आड येऊं लागला, म्हणून त्यानें त्याला प्रधानकीच्या अधिकारावरून काढून हद्दपार केलें. **एड्वुईनंतर एड्गर** नांवाचा राजा झाला. तो ९५९ त गादीवर बसला, तेव्हां १४ वर्षांच्या वयाचा लहान मुलगा होता. त्यासमयीं **वेसेक्स** एथील **वुइटान्जिमोट** (बुधजन मंडल) ह्यानें **डन्स्टनाला** परत बोलावून आणून त्या **एड्गराचा** प्रधान नेमिलें.

एड्मंड ९४०; एड्रेड ९४६; एड्वुइ ९५५.

डन्स्टन हा प्रधान असून **कांटर्बरीचा आर्चबिशप** (मुख्य धर्माध्यक्ष) होता. त्याच्या त्या धर्माध्यक्षतेच्या कारकीर्दीत, सर्वलोकभेदांतील लोकांचें ऐक्य होत जाऊन हळू हळू त्यांची एकशाई बनत चालली. **एड्गर** हा 'पीसबल' (शांतिप्रिय) हें उपपद पावला; आणि "**एड्गराचे कायदे**" हे फार शाहाणपणाचे व नीतीचे म्हणून लोक कितीएक पिढ्यांपर्यंत स्मरत होते.

एड्गर धि पीसबल, ९५९–९७५.

त्याच्या कारकीर्दींत, त्या राष्ट्राला **एंग्ला ल्यांड** (**इंग्लिश** लोकांचा देश) असें प्रथमच नांव पडलें. उत्तरेकडील **स्काट** नांवाचे पुंड बेलगामी लोक होते. त्यांचा **केनेथ** नांवाचा राजा होता. त्याला **नार्थंब्रिया** प्रांताचा **लोथियन** नांवाचा उत्तरभाग देऊन त्या लोकांची समजूत केली. तो **लोथियन** नांवाचा प्रदेश **एड्गरचा** ताबेदार ह्या नात्यानें तो **केनेथ** राजा उपभोगूं लागला.

लोथियन स्काट लोकाना दिले.

ह्यामुळें **स्काच** राजे **लोलंड्स** (सखलप्रदेश) मध्यें फार करून राहूं लागले, आणि **एडिंबरो** ही **स्काट्लंडाची** राजधानी झाली. **वेल्स** देशांतील **इड्वाल** नांवाच्या बंडखोर राजाची रग मोडली, आणि त्यानें दरसाल ३०० लांडग्यांची मुंडकीं खंडणी म्हणून देत जावी असा त्याकडून करार करून घेतला. इतर राष्ट्रांशीं व्यापार आतां वाढूं लागला. वाटमारे, लुटारू, व जहाजें फोडणारे, ह्यांपासून व्यापाराच्या संरक्षणाकरितां फार खरमरीत कायदे केलेले होते; आणि **स्क्यांडिनेव्हियाच्या** खाड्यांतून येणारे **व्हायकिंग** नांवाचे चांचे ह्यांच्यापासून समुद्रकांठीं उपद्रव न व्हावा म्हणून त्या कांठांच्या निरंतर रखवालीसाठीं तीन अरमारें **एड्गरानें** तयार ठेवलेलीं होतीं. त्यायोगें **फ्रान्स** आणि **जर्मनी** ह्या देशांतील व्यापाऱ्यांना **लंडनास** सुरक्षितपणें येण्याला कांहीं अडचण उरली नव्हती. **लंडनांतील** हातकाम करणारे कारिगर आपआपल्या धंद्यांच्या संबंधानें मंडळ्या किंवा श्रेणी करूं लागले.

व्यापाराची वृद्धि.

पारिशें (पारिश म्हणजे एकेका धर्मोपदेशकाला वृत्तिसंबंधानें आंखून दिलेला गांवाचा, शहराचा, अथवा देशाचा विभाग) एकवटून **वार्ड्स**, म्हणजे पेंठा; पुरे, किंवा महले, होऊं लागले, त्या ए-

केका वार्डावर एकेक आल्डर्मन (सनदी अधिकारी) नेमिला, आणि बर्ह किंवा बरो (सनदी गांव) ह्यांतील घरंदाज गृहस्थ आपआपला स्थानिक राज्यकारभार करण्याचा हक्क मागूं लागले.

डन्स्टनानें लोकशिक्षणाच्या कामाला पुनः तेजगी किंवा जीवनकळा आणली, आणि मानस्टरिझ (जोग्यांचे मठ) आणि शाळा ह्यांतील मंकांनीं (जोग्यांनीं) पूर्वींहून विशेष निष्कलंक आचरण ठेवावें, आणि शिक्षणाच्या कामीं विशेष आसक्त व्हावें, ह्या दोन गोष्टींविषयीं त्यानें फार प्रयत्न केला. असें असतां, त्याला धर्मसंबंधी फारच आस्था होती तिच्यायोगें त्याच्या हातून एक चूक झाली, तिनें परिणामीं तो आपल्या अधिकाराला मुकला. जोगी, किंवा लग्न न केलेले पाद्री, ह्यांवर त्याची कृपादृष्टि असे, आणि रोम एथें संप्रदाय पडत चालला होता त्याप्रमाणें, तो लग्नें केलेल्या पाद्र्यांकरवीं आपल्या बायकांचा त्याग करविण्याचा प्रयत्न करूं लागला, आणि आबी (आबट नांवाच्या जोग्यांकरतां मठ) आणि मानस्टरिझ (मंक नांवाच्या जोग्यांकरितां मठ) ह्यांस स्वास्थ्यें करून देण्याकरतां त्यानें पुष्कळ जमिनी लोकांकडून काढून घेतल्या. ह्या कृत्यांपासून लोकांत असंतोष उत्पन्न झाला. पुढें जेव्हां एड्गर मरण पावला, आणि त्याच्यामागून त्याचा तरुण मुलगा एड्वर्ड ह्यानें अवघीं चार वर्षें राज्य केल्यावर त्याची सावत्र आई

एड्वर्ड धि मार्टर (स्वमताग्नीस्तर्थ प्राण अर्पण करणारा), ९७५-९७९.

एल्फ्रिथ हिच्या हुकमानें जेव्हां त्याला ठार मारिलें तेव्हां, दरबारांतील थेन (बडेलोक) धर्मसंबंधी उत्पन्न झालेल्या कलहांस कंटाळून त्यांनीं त्या एल्फ्रिथचा अल्पवयी मुलगा एथेल्रेड ह्याला राज्याभिषेक केला, आणि ती एल्फ्रिथ, व तिच्या कृपेंतला एथेल्वाइन नांवाचा आल्डर्मन

(सनदी अधिकारी) होता, त्या उभयतांनीं राजाचा अमल चालवावा अशा आशेनें ते त्यांकडे पाहूं लागले. तेव्हां डन्स्टन हा, अधिकार सोडून कांटर्बरी एथें सुखवस्तु राहण्याकरितां गेला, आणि पुढें नऊ वर्षांनीं तो वारला.

तदनंतर तो हीनभाग्य देश पुनः विपत्तिसागरांत पडला. एथेल्रेड झाला "अनूरेडि" किंवा "अन्कौन्सेल्ड", म्हणजे दुसऱ्याची सल्लामसलत न ऐकणारा, असें म्हणूं लागले, कारण तो इतर कोणाचीही "रीड" म्हणजे सल्लामसलत बिलकूल ऐकून घेत नसे. तो राज्यकारभार हातीं घेण्यालायक वयांत येतांच, त्यानें आपल्या पाद्रींशीं (धर्मोपदेशकांशीं) कलह केला, आणि जुलुमी प्रकारानें अंमल करण्याविषयीं, व आपल्या थेनाचें प्राबल्य मोडण्याविषयीं, त्यानें प्रयत्न मांडला. परंतु ते थेन त्याला फारच भारी होते. त्यांवर त्याचा इलाज चालला नाहीं, आणि परिणामीं साऱ्या देशाचे पुनः तुकडे तुकडे होऊन अनेक छोटीं संस्थानें झालीं. त्यामुळें तो देश डेन लोकांच्या मुखीं अनायासें भक्ष्यसा पडण्याला पात्र झाला. तेव्हां ते डेन, डेन्मार्क व नार्वे ह्या दोहों देशांच्या स्वेन किंवा स्वेगेन आणि ओलाफ् ह्या नांवांच्या राजांच्या हुकमतीखालीं स्वाऱ्या करण्यासाठीं पुनः एकवार शेंकडों गणती येऊं लागले. इतकी गोष्ट निःसंशय आहे कीं, एकाद्या चांगल्या राजाच्या हाताखालीं इंग्लिश लोक त्या वेळीं असते, तर त्यांनीं त्या डेनांना तोंड देऊन अडवून धरून स्वदेशांत येऊं दिलें नसतें; कारण, ईस्ट (पूर्व) साक्सनांचा ब्रिथनाथ नांवाचा वृद्ध आल्डर्मन हा ९९१ त माल्डन एथील प्रख्यात लढाईत त्या डेनांशीं कसा लढला, आणि लढतां लढतां

एथेल्रेड धि अन्रेडि, ९७९-१०१६.

कसा मेला, हें आम्हीं बखरांत वाचतोंच. परंतु एथेल्रेडानें फक्त "डेनगेल्ड" नांवाचा जमिनीवर एक नवीन कर बसवून द्रव्य उत्पन्न केलें, आणि त्याच्या योगें प्रथम १६००० पौंड, आणि पुढें थोड्या वर्षांनीं पुनः २४००० पौंड, इतका रोकड पैसा त्या डेनांस देऊन त्यांच्यापासून आपला देश सोडविला. नंतर एथेल्रेडानें, नार्मन लोक हे आपणाला कुमक करतील ह्या आशेनें, नार्मंडीचा रिचर्ड नांवाचा ड्यूक ह्याची एम्मा नांवाची मुलगी होती तिच्याशीं विवाह केला. त्याचें वुइटान (बुधजन मंडल) हें तर त्या डोळ्यांत सलत असलेल्या डेन लोकांवर तुटून पडण्याविषयीं अति उत्सुकच होते. तेव्हां शेवटीं, १००२ ह्या वर्षाच्या नोव्हेंबर महिन्याची १३ वी तारीख हा सेन्ट ब्राइस नांवाच्या एका साधूच्या जयंतीचा दिवस होता, त्या दिवशीं, त्या वुइटानला गुप्त हुकूम देण्यास प्रवृत्त करून, त्या एथेल्रेडानें वगळ न करितां शेंकडों डेनांची कत्तल करविली.

दुसरी डेनांची स्वारी.

डेनलोकांची कत्तल, १००२.

ह्या कत्तलींत जीं माणसें मारलीं गेलीं त्यांत डेन्मार्कचा स्वेन राजा ह्याची गन्हिल्ड नांवाची बहीण, तिचा पति, व मूल, हीं होतीं. तेव्हां त्या स्वेनानें ह्याचा सूड घेईन अशी प्रतिज्ञा केली. तो आपल्या देशाहून मोठी फौज घेऊन आला, आणि अर्ल थर्किल नांवाचा त्याचा सरदार, त्याच्या मागोमाग लवकरच व्हायकिंग नांवाच्या चांच्यांची झुंड घेऊन आला. त्या डेनांनीं धुवा उडवून तो देश वैराण केला, आणि त्यावेळीं आल्फीज नांवाचा कांटर्बरि एथील आर्चबिशप होता त्याला क्रूरपणानें ठार मारिलें, एथेल्रेडानें आणखीं दोनदा द्रव्य देऊन त्या शत्रूंपा-

सून देश सोडविला. परंतु **इंग्लिश** लोक त्याच्या जाचक राज्यरीतीला त्रासले होते. **नार्थंब्रिया** आणि **मर्शिया** ह्या प्रांतांतील लोक **स्वेन** राजाला मिळाले, आणि **वेसेक्स** प्रांतांतील **थेन** लोक देखील त्याला वश झाले. तेव्हां **एथेल्रेड** राजा आपल्या बायकामुलांना बरोबर घेऊन **नार्मंडी** संस्थानांत पळून गेला, आणि **स्वेन** हा त्याच्या देशाचा राजा झाला. ही गोष्ट खरी कीं, राज्याचा मालक झाल्यानंतर तो **स्वेन** एका महिन्यानें वारला, तेव्हां **एथेल्रेड** परत आला, परंतु तो येतो तोंच **स्वेन** राजाचा मुलगा **क्नूट** ह्यानें त्यावर हल्ला मांडला. **एथेल्रेड** दोन वर्षेपर्यंत झुजला, आणि शेवटीं १०१६ त मरण पावला.

राज्याकरितां झगडा.

नंतर **लंडनां**तील लोकांनीं **एथेल्रेडा**चा पुत्र **एड्मंड आयर्नसाइड** ह्याला आपला राजा म्हणून पसंत केलें. परंतु बाकीच्या सर्व **इंग्लिश** राष्ट्रांतील लोकांनीं **क्नूट** ह्याला पसंत केलें. पुढें **एड्मंड** शौर्यानें लढला, आणि कडेकोट तयारीच्या सहा लढाया करून, शेवटीं आपण व **क्नूट** ह्या दोघांनीं राज्य विभागून घेतलें. परंतु **एड्मंड** सात महिनेपर्यंत कारकीर्द होतांच वारला, मग एकट्या **क्नूटा**लाच **डेन** व **इंग्लिश** ह्या उभय लोकांनीं आपला राजा म्हणून एकसारखें मान्य केलें.

एड्मंड आयर्नसाइड, ह्याची सात महिन्यांची कारकीर्द, १०१६.

ह्याप्रकारें छत्तीस वर्षे क्लेशकारक झगडा चालून, पुनः एकवेळ आपणांवर आळ्यांत ठेवणारा ताकतवान हात आहे, असें लोकांस वाटूं लागलें, आणि राज्यांत १८ वर्षेपर्यंत स्वस्थता होती. **क्नूटानें**, मी जन्माचाच **इंग्लिश** राजा असें प्रजेला वाटावें, अशा प्रकारें

अमल करण्याचा निश्चय केला. आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं, गादीविषयीं कांहीं भीति उरली नाहीं असें होण्यापूर्वी, तो क्रूर होता, तथापि मी जातीनें न्यायी व विवेकी आहें, असें पुढें त्यानें लोकांच्या प्रत्ययास आणून दिलें. पूर्वीच्या सर्व **इंग्लिश** राजांप्रमाणें त्यानेंही **वुइटान्जिमोट** (बुधजनमंडल) ह्याकडून मुकुट स्वीकारिला. त्यानें "एड्गराचे कायदे" ह्यांस अनुसरून अमल केला, आणि **एथेल्रेडा**ची विधवा **एम्मा** हिच्याशीं विवाह करून, त्या राष्ट्रांतील प्रजेचें आपणाशीं प्रेमबंधन त्यानें अधिकच सुदृढ केलें. अन्यपक्षीं, तो आपल्या लोकवंशांतला राजा म्हणून **डेन** लोक तर खुशच होते. **क्रूटानें इंग्लंडच्या** चार **अर्लडम्स** म्हणजे सुभे केले. **अर्ल** अथवा **यार्ल** हा **डेनिश** किताब, **इंग्लिशांच्या आल्डर्मन** ह्या किताबाबरोबरीचा होता. ते सुभे येणेंप्रमाणें. (१) **मर्शिया**, (२) **नार्थंबर्लंड**, (३) **वेसेक्स**, (४) **ईस्ट-आंग्लिया.** ह्या सुभ्यांवर अमल करणारे सुभेदार **इंग्लिश** जातीचे होते. त्यांत अतिप्रबळ असे दोनच होते, (१) **मर्शियाचा अर्ल लिआफ्रिक**, व (२) **वेसेक्सचा अर्ल गाड्वुइन.** हा **गाड्वुइन क्रूट** राजाचा प्रधान होता, व त्यानें त्या राजाच्या पुतणीशीं किंवा भाचीशीं लग्न केलेलें होतें. **क्रूटानें डेनिश** फौजेला फांटा दिला, आणि फक्त **"हुस्कार्लस"** म्हणजे खास फौज म्हणून एक तुकडी ठेविली. तो **डेन्मार्क** देशीं लढण्यास देखील आपल्या बरोबर **इंग्लिश** शिपाई नेई. ह्या काळांत **इंग्लंडां**तील लोकांना स्वदेशीं दंगेधोपे नसून स्वस्थता होती, आणि दलदली किंवा पाणथळी लागवडीजोग्या करण्यास; रानजमीन वरील जंगल तोडून साफ करण्यास,

क्रूट, १०१६–१०३५.

स्वस्थतेचीं १८ वर्षे.

घराखालचीं आगरें व जमिनी ह्यांची लागवड करण्यास, आणि आपला उदीमव्यापार व हस्तकौशल्यानें तयार केलेले जिन्नस वाढविण्यास, त्यांना लागेल तितका वेळ व फुरसत होती. पूर्वीच्या एड्गर राजानें जसा प्रयत्न केलेला होता, तसा, वेल्श व इंग्लिश माणसें गुलाम करण्यासाठीं विकण्याचा लाजिरवाणा व्यापार बंद करण्याविषयीं क्नूटानें देखील प्रयत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. ब्रिस्टल एथून, तरुण पुरुष व बायका ह्यांचीं भरतांडेंच्या भरतांडें जहाजांवर भरभरून पाठवून (असें करील त्याला शासन होईल असे कायदे असतां, व बिशप तसें करणें हें पाप आहे असा उपदेश करीत असतां,) आयर्लंडांतील डेन लोकांना अद्यापि धडका विकीत.

पहिला हारल्ड, १०३५–१०४०. हार्थाक्नूट, १०४०–१०४२.

जर हारल्ड व हार्थाक्नूट हे क्नूटाचे दोघे पुत्र त्याच्यासारखे शाहाणे असते, तर इंग्लंडावर डेनिश वंशांतले राजे राज्य करीत राहते असते. परंतु ते दोघे क्रूर पशुतुल्य होते, त्यांनीं आपापल्या लहान लहानशा कारकीर्दीत प्रजापीडनाशिवाय दुसरें कांहींच केलें नाहीं. पुढें जेव्हां १०४२ त एका लग्नसंबंधी मेजवानींत हार्थाक्नूट हा जमिनीवर पडला आणि मरण पावला, तेव्हां त्याचा सावत्र भाऊ, एथेल्रेड व एम्मा ह्या दोघांचा मुलगा एड्वर्ड ह्याला, जुन्या घराण्यापैकीं म्हणून, राजपदाकरितां आदरून इंग्लिशांनीं त्याचें अभिनंदन केलें. ह्या काळापासून पुढें जे डेन इंग्लंडांत स्थायिक होऊन राहिले, ते हळू हळू इंग्लिश शाईत मिळून गेले. इतके कीं, थोड्या पिढ्यांनंतर इंग्लिश कोणते व डेन कोणते हें सांगणें मुष्किल झालें. तथापि, हा दिवसपर्यंत, लिंकन्शायर व यार्क्शायर ह्या दोहों कौंटींतील सुंदर केंशांच्या रांकट शेतकरी

लोकांत डेनिश रक्ताचा छडा दिसण्यांत येतो. डेनांनीं जीं गांवें किंवा शहरें वसविलीं तीं ओळखण्याला खूण म्हटली म्हणजे, त्यांच्या नांवांच्या शेवटीं (बि) हा प्रत्यय असतो ती होय. त्या प्रत्ययाचा अर्थ, जो साक्सन भाषेंत "टुन" आणि "हाम" ह्या प्रत्ययांचा आहे तोच. ह्याप्रकारें पाहतां डर्बि, व्हुइट्बि, आणि रग्बि, हीं शहरवजा गांवें एका काळीं डेन लोकांचीं होतीं, आणि नाटिंग्हम, डर्हम, आणि ब्रिड्लिंग्टन हीं जुनाट इंग्लिशांच्या वसाहतींचीं ठिकाणें असावींत हें त्या नांवांवरूनच कळतें.

डेनिश शहरे.

प्रकरण ४.

इंग्लंडांत नार्मन लोकांचें वजन कसें पडूं लागलें

आल्फ्रेडाच्या वंशजांपैकीं एक आपणांस पुनः एकवेळ राजा मिळाला म्हणून इंग्लंडांतील लोक खुशालले होते, तथापि एड्वर्ड हा वास्तविक क्नूटाहूनही परदेशीय होता. हें कसें हें कळण्याला सुमारें दीडशें वर्षें मागें जाऊन, फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्यावर काय वृत्त घडत होतें हें पाहिलें पाहिजे. डेन ऊर्फ नार्थमेन ह्यांनीं इंग्लंडांत आल्फ्रेड राजाला ज्या काळीं अतिशय जेरीस आणलें होतें, त्या काळाच्या सुमारास, त्याच चांच्यांचीं मोठमोठालीं भरताडें बोटींवरून जाऊन फ्रान्स देशांतील सेन नदीच्या भोंवतालच्या प्रदेशावर झडपा घालीत होतीं, आणि ते चांचे, त्यांच्याच भाऊबंदांनीं (युद्धमित्रांनीं) ज्या प्रकारें इंग्लंडांतील मुलूख लुटून फस्त केला, त्या प्रकारेंच तो प्रदेश लुटून फस्त

फ्रान्सदेशांतील नार्मन लोक, ९००.

करीत होते. ह्या लुटारूंच्या एका टोळीनें **रॉल्फ** किंवा **रॉल्लो** नांवाच्या एका विख्यात **व्हायकिंगच्या** (चांच्यांच्या नाइकाच्या) हुकमतीखालीं, **सेन** नदीच्या मुखावाटे बोटी हकारून वर जाऊन, **रुआंग्** नांवाचें ठिकाण हस्तगत केलें. त्या **रॉल्फानें** चहुंबाजूंनीं कत्तल उडवून काय प्रलय केला त्याविषयीं अनेक दंतकथा आहेत. परंतु तथ्य म्हणून जें सर्व आम्हांला कळलें आहे तें हें कीं, ९१३ त, म्हणजे ज्या समयीं **एथेल्फ्रेड** आणि **एड्गर** हे **इंग्लंडांत डेन्ला** (डेनांच्या कबजांतील प्रांत) जिंकून घेत होते, (४६ वें पृष्ठ पहा.) त्या समयींच, **चार्लस धि सिंपल** नांवाचा **फ्रान्सचा** राजा ह्यानें, ह्या **रॉल्फ** नांवाच्या उत्पाती साहसी पुरुषाशीं तह करून त्याला **सेन** नदीच्या दोन्ही थडींची जमीन, व त्याच्या राहण्याच्या मुख्य ठिकाणासाठीं म्हणून **रुआंग्** हें गांव, दिलें. **रॉल्फानें** नंतर त्याच राजाच्या कन्येशीं विवाह केला, आणि तो **ख्रिस्ती** झाला. ज्या भूमिप्रदेशावर त्यानें **कौन्ट** (एक पदवी) किंवा **ड्यूक** (एक पदवी) ह्या किताबानें राज्य केलें, तो प्रदेश **नार्मंडी** (म्हणजे **नार्थमेन** ह्यांची भूमि) ह्या नांवानें प्रसिद्धीस आला, आणि तो त्याच्या वारसांस क्रमानें प्राप्त होत गेला.

नार्मंडीची डची (ड्यूकाचें राज्य), ९१३.

ह्यावरून **फ्रान्सांतील नार्मन** व **इंग्लंडांतील डेन** हे एकाच लोकवंशांतले होते हें लक्ष्यांत येईल; परंतु ज्या **फ्रेंच** लोकांमध्यें ते **नार्मन** वसाहत करून राहिले, व ज्यांच्याशीं त्यांनीं शरीरसंबंध केले, ते **फ्रेंच** लोक **इंग्लिश** लोकांहून फार वेगळ्या प्रकारचे होते. शरीराचा बळकटपणा आणि आसक्ति ह्या गुणांत जरी **फ्रेंच इंग्लिशांहून** कमी होते, तरी, **फ्रेंच** त्यांहून सुधारलेले व शिष्टाचारसंपन्न होते. कारण **रोम** एथील विद्याचारसंपन्न लोक, व दुनिया, हीं **फ्रेंचांनीं इंग्लिशांहून**

ज्यास्त पाहिलेलीं होतीं. फ्रेंच, कला व इमारती बांधण्याची विद्या, ह्यांत सुगर, जिवट, शीघ्रबुद्धि, चणचणित, आणि रंगेले असे होते. बेयु नांवाच्या गांवाच्या भोंवतालच्या लहानशा प्रदेशाखेरीज इतर सर्व प्रांतांतील नार्मन लोकांनीं थोड्या काळांत फ्रेंचांची भाषा, स्थितिरीति, व रिवाज, स्वीकारिले, आणि त्यांनीं आपल्या दांड व निग्रही स्वभावांचें त्या सुधारलेल्या फ्रेंचांच्या स्वभावांशीं संमेलन केलें.

नार्मन हे फ्रेंच बनतात.

ह्यास्तव, शंभर वर्षें लोटल्यानंतर, जेव्हां, एथेल्रेड धि अन्रेडि ह्यानें, नार्मंडीचा ड्यूक रिचर्ड ह्याची कन्या (म्हणजे व्हायकिंग रॉल्फ ह्याचें पणत्वंड) जी एम्मा हिच्याशीं लग्न केलें, तेव्हां नार्मन लोक पूर्वीच फ्रेंच बनून गेलेले होते. तेव्हां अर्थात् एम्माचा मुलगा एड्वर्ड हा, जरी इंग्लंडांत जन्मलेला होता तरी, अर्धा परदेशीय होता. शिवाय, वयानें फक्त नऊ वर्षांचा असतां, तो व त्याचा भाऊ आल्फ्रेड हे, आपला बाप व आई ह्यांबरोबर नार्मंडींत पळून गेलेले होते. त्याची आई एम्मा हिनें, एथेल्रेड वारल्यावर, इंग्लंडास परत जाऊन क्नूटाशीं लग्न केलें. त्याचा भाऊ आल्फ्रेड हा, हारल्ड राजाच्या कारकीर्दींत नार्मंडीहून इंग्लंडांत गेला, परंतु तेथें हारल्डाच्या माणसांनीं विश्वासघातानें त्याचे डोळे काढले, त्यामुळें तो ईलाइ एथें मरण पावला. परंतु एड्वर्ड नार्मन दरबारींच राहिलेला होता. त्याचा मामेभाऊ वुइलियम ह्याला, वयानें सात वर्षांचा असतांच जेव्हां, नार्मंडीचा ड्यूक हें पद प्राप्त झालें, तेव्हां तो एड्वर्ड नार्मंडींतच होता, आणि ते दोघे मामेभाऊ मोठे गट्टीचे मित्र होते.

एड्वर्ड हा अर्धा नार्मन होता.

ह्यास्तव पुढें सहा वर्षांनीं जेव्हां एड्वर्डाला त्याचा सावत्र-भाऊ हार्थाक्रूट ह्यानें इंग्लंडास बोलावून नेलें, आणि तेथें पुढें लवकरच त्याला पसंत करून इंग्लंडचा राजा केलें, तेव्हां सहजच पुष्कळ नार्मन धर्मोपदेशक व बडे लोक एड्वर्डाच्या मागून इंग्लंडास गेले, आणि त्यांना त्या देशीं मोठमोठे हुद्दे दिले. एड्वर्ड हा स्वभावानें सौम्य, भितरा, आणि फार भक्तिमान, होता. त्यानें

एड्वर्ड धि कन्फे-स्सर १०४२-१०६६.

लवकरच जुमीजेझ गांवचा राबर्ट ह्या नांवाच्या एका नार्मन मंकाला (जोग्याला) लंडन एथील बिशप नेमिलें; आणि त्यानंतर दुसऱ्या एका उल्फ नांवाच्या मंकाला राचेस्टर एथील बिशप नेमिलें. पुढें कांहीं वर्षांनीं त्याने त्या बिशप राबर्टाला बढती देऊन कांटर्बेरी एथील आर्चबिशप देखील केलें. हाच पुरुष त्या साऱ्या देशांत मोठें घातक प्रस्थ झाला. राजाच्या प्यारींतल्या ह्या नार्मनांना दाबांत ठेवणारा म्हटला म्हणजे वेसेक्सचा अर्ल गाड्वुइन हा एवढा एकच पुरुष त्या काळीं होता. त्याची कन्या एडिथ हिच्याशीं एड्वर्डानें विवाह केलेला होता. वास्तविक म्हटलें म्हणजे देशावर अमल गाड्वुइनच करी, आणि तो फार चांगल्या प्रकारें करी. परंतु दुर्दैवानें स्वेन नांवाचा त्याचा वडील मुलगा पुंड, उनाड, व बेकैद पुरुष होता. त्यानें जे गुन्हे केले त्यांनीं राजा आणि प्रजाजन फार नाखुश झाले. तेव्हां गाड्वुइनाचे शत्रु त्याच्या विरुद्ध निमित्त म्हणून ही गोष्ट पुढें आणण्याला अति सिद्ध होतेच.

तितक्यांतच अशी एक गोष्ट घडली कीं, ज्या बूलोनच्या यूस्टेस नांवाच्या कौंटानें एड्वर्डाच्या बहिणीशीं लग्न केलेलें होतें, त्याचा डोव्हर एथील लोकांशीं कांहीं तंटा उत्पन्न झाला;

त्या संबंधानें त्यांच्याशीं त्याची लढाई झाली, तींत पुष्कळ लोक ठार मेले. तेव्हां योग्य चौकशीवांचून डोव्हरच्या लोकांस शासन करण्याचें गाड्वुइनानें नाकारिलें. जरी त्याचें म्हणणें रास्त होतें, तरी ते नार्मन, आणि गाड्वुइनाच्या अधिकाराविषयीं मत्सर करणारे इतर इंग्लिश बडे लोक देखील, त्याच्या विरुद्ध, राजाच्या बाजूचे झाले. सारांश, गाड्वुइन आणि त्याचे मुलगे ह्यांना न्यायरक्षणबाह्य ठरविलें, म्हणजे त्यांस कोणीं ठार मारलें, त्यांचें वित्त हरण केलें, किंवा त्यांच्याशीं कोणत्याही वाईट प्रकारचें वर्तन केलें, तरी त्याविरुद्ध त्यांना न्याय मिळावयाचा नाहीं, असले अपराधी त्यांना ठरविलें. मग, प्रजेस चिथवून आपसांत यादवी माजविण्यापेक्षां आपणच दूर जावें हें बरें असा विचार करून, तो गाड्वुइन तत्काल इंग्लंड सोडून फ्लांडर्स देशीं निघून गेला, आणि सुमारें एक वर्षपर्यंत परदेशीं राहिला. हें वर्ष इंग्लिश इतिहासांत स्मरण ठेवण्यालायक आहे; कारण, जोंपर्यंत गाड्वुइन देशांतरीं होता तोंपर्यंत, नार्मन सरदार बहादूर आणि धर्मोपदेशक (पाद्री) ह्यांच्या इच्छेस येईल तशी प्रत्येक गोष्ट ते करून घेऊं लागले, आणि नार्मंडीचा ड्यूक वुइलियम, (हा आतां उंच, सुंदर, तरुण, पुरुष बनलेला होता) एड्वर्डाला भेटण्यासाठीं नार्मंडीहून इंग्लंडास आला. एड्वर्डाला संतान नसल्यामुळें वुइलियमानें आपल्या पश्चात् इंग्लंडच्या गादीवर बसावें म्हणून जें वुइलियमाला एड्वर्डानें वचन दिलें म्हणतात तें ह्याच भेटीच्या वेळांत. एड्वर्डाचा आपल्या मामेभावाशीं परम मित्रभाव असल्यामुळें, असलें वचन

गाड्वुइनाला न्यायरक्षणबाह्य ठरविलें, १०५१.

वुइलियम एड्वर्डाला भेटण्यासाठीं येतो, १०५१.

देणें फार स्वाभाविकसें दिसतें. तथापि गादी देण्याला वास्तविक ती एड्वर्डाची नव्हती. **वुइटान** (बुधजनमंडल) हेंच काय तें ती देण्याला समर्थ होतें, आणि **वुइलियमा**च्या रक्तवाहिन्यांत एक थेंब देखील **इंग्लिश** रक्ताचा नव्हता म्हणून, त्या गादीवर त्याचा बिलकूल हक्क नव्हता.

दरम्यानच्या काळांत **गाड्वुइन** नसल्यामुळें देशांत सर्व गोष्टींची भारी अव्यवस्था झाली, आणि पुढील सालीं जेव्हां तो आपल्या धाकट्या मुलग्यांना बरोबर घेऊन परत आला, तेव्हां त्याला भेटावयास लोकांची गर्दी जमली. त्यानें राजाच्या माणसांशीं लढण्याला लोकांना परवानगी दिली नाहीं, परंतु, माझ्या निर्दोषीपणाविषयीं मला कांहीं बोलावयाचें आहे तें ऐकून घ्या, असें त्यानें हक्कानें मागणें केलें. राजा तर त्याला पुनः पदरीं ठेवून घेण्याला फारच नाखुष होता, तथापि **वुइटानानें** (बुधजनमंडलानें) त्याचा जमीनजुमला व अधिकार त्याला मोठ्या आनंदानें परत दिला. राजाच्या प्यारींतले **नार्मन** ह्यांनीं, **गाड्वुइना**वर पुनः कृपादृष्टि झाली असें ऐकलें तेव्हां, ते **फ्रान्स** देशीं पळून गेले. मात्र, कमी आबरूचे असे पुष्कळ मागें राहिले.

गाड्वुइन स्वदेशीं परत येतो, १०५२.

आणि आतां सतत १४ वर्षें, म्हणजे १०५२ पासून १०६६ पर्यंत, **इंग्लंडा**वर पुनः एकवार **इंग्लंडां**तील लोकांनींच पूर्वींहून खरोखर राज्य केलें; आणि जशी एकादी ज्वाला विझण्यापूर्वी वारंवार भबकते तशीं हीं १४ वर्षें त्या राष्ट्राला चकचकाटाचीं झालीं. **गाड्वुइन** हा पुढल्या वर्षी एका मेजवानीच्या समयीं फार अकस्मात् वारला. परंतु त्याचा दुसरा मुलगा **हारल्ड** हा, शूर शिपाई असून मोठा शाहणा व महत्वलोभी मुतसद्दी होता,

त्यानें त्याचें स्थान स्वीकारलें. **एड्वर्ड** आपला सारा वेळ शिकारींत, आणि ज्या जागीं हालीं **वेस्टमिन्स्टर आबी** (मठ) आहे त्या जागीं **सेन्ट पीटरचें** भव्य देवालय (भजनमंदिर) बांधण्याचें काम चालू होतें त्यावर देखरेख करण्यांत, घालवी. त्या काळांत **इंग्लंडचा** राज्यकारभार **हारल्ड** हा, **मर्शियाचा अर्ल लिआफ्रिक,** व **यार्कचा आर्चबिशप एल्ड्रेड,** ह्या दोघांच्या मदतीनें चालवी. **लिआफ्रिकाचें** घराणें हें, **गाड्वुइनच्या** घराण्याचें प्रतिस्पर्धी होतें, आणि त्या **लिआफ्रिकाचे** मुलगे **हारल्डाला** फार त्रास देत, तथापि त्या म्हाताऱ्या **लिआफ्रिकाची** स्वदेशावर इतकी अतिशय भक्ति होती कीं, **हारल्डासारख्या** शाहण्या राज्यकारभारकर्त्या पुरुषाला तो नेहमी पाठबळ देई.

साक्सन वंशांतील हारल्ड ह्याचा राज्यकारभार.

एकंदरीनें सर्व प्रजा इतकी संतुष्ट होती कीं, **नार्थंबर्लंड** व **वेल्स** ह्या प्रांतांत कांहीं बखेडे झाले त्यांशिवाय, सांगण्यासारखें दुसरें कांहींच घडलें नाहीं. **ग्रफ्फीड** नांवाचा **वेल्स** देशाचा राजा, **गाड्वुइनाला** देशांतरास घालवून दिल्यापासून, **इंग्लंडच्या** पश्चिमेकडील मुलुखाला फार उपद्रव देत होता. परंतु आतां **हारल्डानें,** आपला भाऊ **टास्टिग** ह्याच्या मदतीनें त्या राजाला जिंकून, **एड्वर्ड** हा माझा अधिराज, असें त्याकडून कबूल करवून घेतलें. **नार्थंबर्लंड** प्रांतांतील हकीकत इतकी आनंदकारकशी झाली नाहीं. त्या प्रांताचा **सिवर्ड** नांवाचा बडा **अर्ल** ह्यानें, पूर्वी **स्काट्लंडचा** तरुण राजा **माल्कम** ह्याला, त्याची गादी हक्क नसतां बळकावणारा **माक्बेथ** ह्याला जिंकण्याच्या कामीं मदत केलेली होती. तो

वेल्स देश जिंकला.

सिवर्ड १०५५ त मरण पावला. तेव्हां **टास्टिग** ह्याला त्याच्या जागीं **अर्ल** केलें. परंतु **टास्टिग** हा **एड्वर्ड** राजाच्या फार प्यारींतला असल्यामुळें, आपल्या प्रांतीं राहून तेथील सरकारी कारभार करावा तो न करितां, तो नेहमी राजाच्या दरबारीं असे. त्यामुळें त्या प्रांतीं मोठें बंड उठलें. तेथील लोकांनीं, आपली आपण एक सभा भरवून, तीत **लिआफ्रिकाचा** नातू **मार्कीर** ह्याला पसंत करून, आपला **अर्ल** नेमिलें. मग ते शेंकडों एकत्र मिळून दक्षिणेकडे कूच करून निघाले, आणि **टास्टिग** ह्याला देशपार केलें पाहिजे, असें त्यांनीं जरबीनें मागणें केलें. तेव्हां आपल्या भावाच्या कृतीवर आतां पांघरूण घालून त्याचें रक्षण करितां येत नाहीं, असें **हारल्डाला** कळून आलें. मग **टास्टिगालें** न्यायरक्षणबाह्य करण्याचा ठराव केला. तेव्हां तो आपल्या कुटुंबाच्या मंडळीसह **फ्लांडर्स** देशीं निघून गेला. त्या दिवसापासून तो, आपला भाऊ **हारल्ड** ह्याचा वैरी बनला, आणि **हारल्ड** पदच्युत होण्याला जी मुख्य-कारणें झालीं त्यांपैकीं एक कारण तो **टास्टिग** होता.

नार्थंब्रियन (नार्थंबर्लेंडांतील) बंड. टास्टिग ह्याला न्यायरक्षणबाह्य ठरविलें.

एथवर काळाची मजल येई तों **हारल्ड** वस्तुतः राज्याचा सर्वश्रेष्ठ सत्ताधीश बनलेला होता. लोक त्याच्या निग्रही अमलाखालीं सुखी होते, आणि **एड्वर्डाला** कांहीं मूलबाळ नव्हतें म्हणून, ते, **हारल्ड** हाच आपला पुढें राजा होणार, असें लेखूं लागले. जर कधींही **एड्वर्डानें**, आपली गादी तुला देईन, असें **बुइलियमाला** खरोखर वचन दिलें असेल, तर आतां, आपल्याच्यानें आपलें वचन पूर्ण करितां येणार नाहीं, हें उघड त्याला कळून

आलें असावें, कारण, त्यानें हंगरी देशाहून एड्मंड आयर्नसाइडचा मुलगा एड्वर्ड ह्याला आपल्यामागें आपल्या गादीवर बसण्याकरितां म्हणून मुजरत बोलावून आणलें. तो एड्वर्ड, इंग्लंडांत पोहोंचल्यावर थोड्याच दिवसांनीं, राजाची भेट देखील होण्यापूर्वींच वारला. मागें एड्गर नांवाचा त्याचा एक लहान मुलगा मात्र राहिला. ह्या एड्गराचें वृत्त पुढें थोड्या वेळानें सांगण्यांत येईल.

गादीवर वारसा करणारे.

दरम्यानच्या काळांत, वुइलियम, एड्वर्डाच्या वचनावर अजून भिस्त ठेवून होता. आणि जेव्हां एका समयीं, हारल्ड जहाजांत बसून जात असतां नार्मंडीच्या किनाऱ्यावर त्याचें जहाज फुटून पान्टह्यूचा कौंट ह्यानें त्याला धरून कैद करून रूआंग् एथें पाठविलें, तेव्हां, असें म्हणतात कीं, इंग्लंडच्या गादीवर तुम्ही हक्क सांगत आहां त्याला मी पाठबळ देईन, अशी वुइलियमानें हारल्डाकडून शपथ घेवविली, आणि त्या शपथेला विशेष पूज्यता येऊन ती अनुल्लंघ्य व्हावी म्हणून, देवळांतील ज्या वेदीला स्पर्श करून त्यानें शपथ घेतली त्या वेदीखालीं, त्याला फसवून पूज्य सेन्टांच्या (साधूंच्या) अस्थि लपवून ठेवल्या होत्या. हें कसें असेल तसें असो, परंतु इतकी गोष्ट खरी कीं, एड्वर्डाला किंवा हारल्डाला इंग्लंडची गादी कोणालाही देईन असें वचन देण्याचा अधिकार नव्हता. एड्वर्ड हा, एक आवडतें मठसहित देऊळ बांधवीत होता. त्यांत त्याचें शव पुढें लवकरच पुरलें जाणार होतें. त्या देवळाचा

हारल्डाची शपथ.

एड्वर्डाचा मृत्यु.

प्रतिष्ठासंस्कारपूर्वक उत्सर्ग होऊन फक्त एक आठवडा होतो तोंच, तो १०६६ त जान्युअरीच्या ५ व्या तारखेस मृत्यु पावला. तो फार गरीब, दुबळा, राजा होता, परंतु **हारल्डानें** त्याच्या नांवानें, मागल्या १४ वर्षांत राज्यकारभार चांगल्या प्रकारें चालविला होता. लोक त्या राजाला साधु समजून पूज्य मानीत, आणि त्यांनीं त्याला "**धि कान्फेस्सर**" (स्वधर्मार्थ दुःख भोगणारा) हें उपपद दिलें. त्यानें, मरणाच्या पूर्वी, माझ्या पश्चात् **हारल्डाला** गादीवर बसवावें, अशी शिफारस केली, आणि त्याच्या मरणसमयीं **वुइटान** (बुधजनमंडल) **लंडनांत** भरविलेलें होतें, त्यानें त्याच दिवशीं **हारल्डाची** निवडणूक केली. **हारल्डाला आर्चबिशप एल्ड्रेड** ह्यानें **वेस्टमिन्स्टर** एथें मुकुट धारण करवून राज्याभिषेक केला.

ह्या प्रकारें आतां **गाड्वुइनाचा** पुत्र **हारल्ड** हा, **इंग्लंडां**तील लोकांच्या संमतीनें, **इंग्लंडचा** राजा झाला. इतकें मात्र खरें कीं, त्याच्या रक्तवाहिन्यांत जर राजरक्ताचा अंश असेल तर तो, त्याची आई **डेनिश** राजपुत्री होती तिच्यापासून आलेला काय असेल तेवढाच. असो, परंतु ह्या नवीन मिळालेल्या मानमरातबांचा उपभोग घेण्यास त्या **हारल्डाला** फुरसतच नव्हती. **ड्यूक वुइलियम** ह्यानें, हें घडलेलें वृत्त ऐकतांच, **हारल्डाकरवीं** आपली शपथ खरी करवून गादी आपणाला देववायला लावीन अशी शपथ घेतली. नंतर वेळ फुकट न दवडतां त्यानें एक अरमार बांधविण्याला, आणि साऱ्या **फ्रान्स** देशांतून मोठी फौज गोळा करण्याला, आरंभ केला. आणखी ज्या

दुसरा हारल्ड, १०६६ तील जान्युअरी तारीख ५ पासून आक्टोबर तारीख १४ पर्यंत.

पुरुषानें पूज्य साधूंच्या अस्थींवरून घेतलेली शपथ मोडली, त्या पुरुषावर मांडलेल्या त्या मोहिमेकरितां विनंती करून आशीर्वाद मागण्यासाठीं **पोप अलेक्झांडर** ह्याकडे त्यानें माणसें पाठविलीं. दरम्यानच्या वेळांत दुष्ट दैवानें, **हारल्डा**च्या संकटाला भर घालण्यासाठींच जणू, त्याच्या भावाला आणलें. **टास्टिग** हा **नार्वे** देशांत गेलेला होता, त्यानें **इंग्लंडां**तील आपली **अर्लडम** (अर्लच्या ताब्यांत असणारा मुलूख) पुन: मिळविण्याचा प्रयत्न करण्यास येण्याला हीच वेळ पसंत केली. **इंग्लंड**चा दक्षिण समुद्रकांठ लुटून तो उत्तरेकडे गेला, आणि **हंबर**नदीच्या मुखावाटे, **हारल्ड हार्ड्राडा** नांवाचा **नार्वे**चा राजा होता त्याच्या सहवर्तमान जहाजें हकारून वर जाऊन, तो **यार्कशायर**मध्यें जमिनीवर उतरला.

ह्याप्रकारें चहुंबाजूंनीं संकटाची दहशत असतां, **हारल्डा**नें कित्येक महिने दक्षिणेकडील समुद्रकांठावर टेहळणी ठेवली होती, परंतु **वुइलियम** आला नाहीं, तेव्हां, जीं मासे मारणारांचीं जहाजें जमवून त्यानें आपलें अरमार बनविलेलें होतें· तीं त्याला आपआपल्या वाटे लावून देणें भाग पडलें. मग तो स्वत: **टास्टिगा**वर उत्तरेकडे त्वरेनें चाल करून गेला. त्यानें त्या **नार्वेजिअन** फौजेचा **यार्कशायरां**त **स्टांफर्ड ब्रिज** एथें पराभव केला, आणि **टास्टिग** आणि **हार्ड्राडा** राजा हे उभयतां त्या लढाईंत ठार मारले गेले.

स्टांफर्ड ब्रिड्ज एथील लढाई.

परंतु त्या जयानिमित्तची मेजवानी आटोपली नाहीं तोंच, **नार्मन** लोक **ससेक्स** प्रांतांत **पेव्हन्सि** एथें येऊन जमिनीवर उतरले अशी खबर घेऊन एक जासूद आला.

तेव्हां **हारल्ड** राजा लागलाच दक्षिणेकडे पुन: त्वरेनें निघून

लंडनास आला. तेथें सर्व लोकांस, एकत्र जमून देशाचें रक्षण करण्यास या, म्हणून त्यानें पाचारण केलें. तेव्हां फक्त दक्षिणेकडील लोक आले, त्यांना बरोबर घेऊन तो, **हेस्टिंग्स** एथें **नार्मन** लोक तळ देऊन राहिलेले होते, तिकडे कूच करून निघाला. त्याचा भाऊ **गर्थ** ह्यानें, जमलेल्या सैन्याहून विशेष बळकट सैन्य असल्याशिवाय लढाईच्या धोक्यांत पडूं नये, म्हणून त्याला पुष्कळ विनवून सांगितलें, आणि भोंवतालचा प्रदेश उजाड करून, दाणापाणी न मिळाल्यामुळें **वुइलियम** उपासमारीनें आपोआप निघून जाई, असें करण्याविषयीं त्यानें त्याला फार आग्रह केला. परंतु **हारल्ड**, **इंग्लिश** भूमीचा असा विध्वंस करण्याला बिलकूल राजी नव्हता. तेव्हां,

हेस्टिंग्सची लढाई, तारीख १४ आक्टोबर १०६६.

१०६६त आक्टोबर महिन्याच्या १४ व्या तारखेस, स्मरणांत ठेवण्यालायक अशी जी "**हेस्टिंग्सची** लढाई." म्हणून म्हणतात, ती, त्या गांवापासून सात मैल अंतरावर एक **सेन्लाक** नांवाची टेंकडी आहे तिजवर झाली. ती हटातटाची झुंज होती. **इंग्लिश** शिपाई पायींच मर्दुमकीनें लढले. त्यांच्या आंगीं चिलखतें भिडविलेली असून, हातीं बरच्या आणि दोन्ही हातांनीं वापरतां येण्याजोगे परशु हीं हत्यारें होतीं. गांवढ्यांतले लोक फौजेंत होते, ते सुळांनीं आणि दुडेळक्यांनीं त्यांच्यानें लढवेल तसे लढले. **नार्मनांनीं** तीरांचा वर्षाव केला, आणि त्यांच्यांत **टेल्लेफर** नांवाचा वैतालिक (वादित्रगायक) होता, (हा पहिल्यानेंच लढाईंत पडला). त्याच्या हाताखालीं जे चिलखतें भिडविलेले आणि जंजीर टोप घातलेले घोडेस्वार होते, त्यांनीं एकदम चढाव करून टेंकडीवर येऊन **इंग्लिश** शिपायांच्या रांगा फोडण्याचा यत्न केला.

परंतु बांध्यानें सुदृढ असे ते **साक्सन** लोक भिंतीसारखे अढळ जागच्याजागीं उभे राहून, चहुंदिशांनीं जीव घेणारे घाय किंवा वार करूं लागले. तेव्हां एकवेळ **नार्मन** मेटें टेंकूं लागले, आणि **ड्यूक** मारला गेला अशी आरड उठली. ती ऐकून **वुइलियम** आपल्या डोकीवरचा टोप हिसकून काढून, मोठ्यानें आरोळी ठोकून म्हणाला, "मी जीवंत आहें, आणि देवाच्या साहाय्यानें मी अजून जय मिळवीन." मग त्यानें आपल्या लोकांकडून पळ काढला अशी हूल दाखविवली, तिला भुलून **इंग्लिश** त्यांच्या पाठीस लागण्याकरितां त्या टेकडीवरून अव्यवस्थितपणानें खालीं उतरले. तेव्हां **नार्मन** एकाएकीं मागें उलटले, आणि त्यांनीं त्यांचे कापून तुकडे तुकडे केले. त्या **नार्मनांनीं** अतिउमद्या कुलीन **इंग्लिश** लोकांच्या एका लहानशा टोळीला त्या टेंकडीच्या मस्तकाकडे पिटून लावलें. तेव्हां ते टोळींतले लोक त्या जाग्यावर राजा व राजकीय निशाण ह्यांच्याभोंवतीं एकत्र जमले. त्या जाग्यावर पुढें **बाटलआबि** (युद्धसंस्मारकमठ) बांधली. तेथें **वुइलियमानें** आपल्या तीरकमठेवाल्यांना पुढें आणून, तीरकमठे वर करून तीरांचा वर्षाव करा असा त्यांस हुकूम केला, त्यायोगें ते तीर त्या **इंग्लिश** लोकांवर वरून पडूं लागले. त्यांपैकीं एक तीर **हारल्डाच्या** उजव्या डोळ्याला लागून **हारल्ड** खालीं पडला, आणि जरी त्याच्या शिपायांनीं मोठ्या शौर्यानें त्याचें रक्षण केलें, तरी तो **साक्सन** वंशांतील शेवटला राजा चौघां **नार्मन** सरदार बहादुरांच्या प्रहारांखालीं ठार झाला. तेव्हां अर्थात् **वुइलियम** विजयी झाला. **गाड्वुइनाची** वृद्ध विधवा (**हारल्डाची आई**) **गाइथा** हिनें आपल्या पुत्राचें शव मोठी विनवणी करून मागितलें.

हारल्डाचा मृत्यु.

तें तिला देऊन, त्याला जांभळा पोशाक घालून **ससेक्स** प्रांतांतील खडकांत दगडांच्या ढिगाखालीं तें पुरण्याविषयीं **वुइलियमानें** परवानगी दिली.

नंतर **वुइलियम** कूच करून **लंडनास** गेला, तेथें त्याला प्रतिकार करणारे फारच थोडे लोक उरले होते, कारण त्या **इंग्लिश** शाईतील शेलकीं माणसें, **सेन्लाक** नांवाच्या टेंकडीवर मरून पडलेलीं होतीं. **लंडनांतील** लोकांनीं खरोखर धाकटा **एथेलिंग एड्गर** ह्याला राजा करावें म्हणून पसंत केलेलें होतें, इतक्यांत **वुइलियम**, मार्गात **साउथवार्क** हें गांव जाळून, आपल्या फौजेनिशीं येऊन पोहोंचला. तेव्हां त्यांचीं अंतःकरणें खचलीं, आणि "पेंचामुळें त्यांनीं त्याला शिरें नमविलीं." पुढें **क्रिस्टमस**, म्हणजे नाताळ, आलें तेव्हां, त्यांत **वुइलियमाला वुइटानानें** (बुधजनमंडलानें) राजा म्हणून पसंत केलें, आणि **वेस्टमिन्स्टर** एथें, ज्या **आर्चबिशप एल्ड्रेडानें हारल्डाला** राज्याभिषेक केलेला होता, त्याच **आर्चबिशपाच्या** हातून **वुइलियमाला** मुकुट मिळून राज्याभिषेक झाला.

वुइलियमाला राज्याभिषेक होतो.

आतां **इंग्लंडचें** स्वातंत्र्य म्हणून जें काय होतें तें हरपलें. सहाशें वर्षांपूर्वी **नार्थ सी** (उत्तर समुद्र) नांवाच्या समुद्राच्या कांठीं आपली जन्मभूमि होती तेथून झुंडीच्याझुंडींनीं येऊन, **इंग्लिश** लोकांनीं, **पेव्हन्सि** गांवाजवळ **आन्डेरिडा** एथें **ब्रिटनांना** जिंकलें होतें. आतां त्याच **इंग्लिशांना** जवळजवळ त्याच स्थळीं परक्यांनीं जिंकलें, आणि त्यांना त्या परकी लोकांच्या अमलाच्या जुंवाला आपल्या माना वांकवाव्या लागल्या. परंतु हा परक्यांचा विजय **इंग्लिशांच्या** विजयाहून भिन्न प्रकारचा होता. **नार्मन**

इंग्लिश आणि नार्मन.

शतशः **इंग्लंडांत** आले ही गोष्ट खरी, तथापि त्यांच्या राष्ट्रांतील एकंदर लोक आले नाहींत, किंवा त्यांनीं **इंग्लिशांना** पिटून लावलें नाहीं. **इंग्लिश** व **नार्मन** वस्तुतः एकाच लोकवंशांतले होते. शिवाय, **वुइलियम धि कान्करर** (विजयी) हा शाहणा आणि प्रतापी पुरुष होता. **इंग्लिश** लोक त्याला फार उपयोगाचे झाले, आणि त्यांवर चांगल्या प्रकारें अमल करावा अशी त्याची इच्छा होती, ह्या दोहों कारणांमुळें त्यानें **इंग्लिशांचें** संरक्षण केलें, हें पुढें पाहण्यांत येईल. शेवटची गोष्ट ही कीं, हा काळ येई तों, **इंग्लिश** लोकांची मोठी बळकट एक शाई बनून गेलेली होती. तींतील लोक धट्टेकट्टे व दृढनिश्चयाचे असून, इतके अति स्वतंत्र आणि कळकळीचे होते कीं, जो जुलूम त्यांना भोगावा लागला त्याखालीं देखील ते चिरडले गेले नाहींत. ह्यास्तव सुमारें १०० वर्षांच्या आंत **नार्मनच** **इंग्लिश** बनून गेले, आणि **इंग्लंड** हाच आपला देश, असें म्हणण्यांत त्यांना गर्व वाटूं लागला.

भाग २.

नार्मनांच्या विजयापासून मोठ्या चार्टरा (सनदे)पर्यंत

वंशावलि.

पहिला वुइलियम.
ज. १०२७, मृ. १०८७,
का. १०६६–१०८७.
लग्न—फ्लांडर्सची माटिल्डा हिच्याशीं.

- रार्बट, नार्मंडीचा ड्यूक, ज.१०५३, मृ.११३४.
  - वुइलियम. फ्लांडर्सचा अर्ल, ११२८ त ठार मारला गेला. त्याला वारस नव्हता.
- **दुसरा वुइलियम,** ज.१०६०, मृ.११००, का. १०८७–११००.
- **पहिला हेन्री,** ज.१०६८, मृ.११३५, का.११००–११३५. लग्न—एड्मंडआयर्नसाइड याची वंशज माटिल्डा हिच्याशीं.
  - माटिल्डा, हिने आन्जूचा कौंट जिफ्री याच्याशीं विवाह केला
    - **दुसरा हेन्री,** ज.११३३, मृ.११८९, का. ११५४–११८९. लग्न—गिएनची एलिनोर हिच्याशीं.
      - हेन्री, मृ.११८३.
      - **पहिला रिचर्ड,** ज.११५७, मृ.११९९, का. ११८९–११९९, लग्न—नव्हारची बेरेन्गारिया हिच्याशीं.
      - जिफ्री, लग्न—ब्रिट्टनीची कान्स्टन्स हिच्याशीं.
        - आर्थर, ब्रिट्टनीचा ड्यूक, १२०३ त मारेकऱ्यांनीं मारला.
      - **जान,** ज.११६७, मृ.१२१६ का. ११९९–१२१६. लग्न—आंगूलेमची इसाबेल हिच्याशीं.
- आडिला, हिने ब्लवाचा कौंट स्टीफन याच्याशीं लग्न केले.
  - **स्टीफन,** ज.१०९४, मृ.११५४, का. ११३५–११५४

प्रकरण ५.

नार्मन अमलाखालील इंग्लंड

पहिला वुइलियम, १०६६–१०८७.

वुइलियम रूफस, १०८७–११००.	पहिला हेन्री, ११००–११३५.

आतां आमच्या देशीं महत्वाचे पालट झाले, त्यांबरोबर मोठी विपत्ति आली. **पश्चिम साक्सन** राजांचा प्राचीन **इंग्लिश**-वंश आटोपला, आणि त्या दिवसापासून आजपावेतों, निवळ **आंग्लो–साक्सन** वंशांतला एकही राजा **इंग्लंडच्या** गादीवर बसला नाहीं. त्या राजांचें स्थान **नार्मंडीचा ड्यूक वुइलियम** ह्यानें घेतलें. तो कोणत्याही अर्थी **इंग्लिश** नव्हता, कारण त्याचा बाप **"लि डिआबल"** उपनांवाचा **नार्मंडीचा ड्यूक राबर्ट** हा होता, आणि त्याची **आर्लोट्टा** नांवाची आई ही एका **नार्मन** जातीच्या कातडीं कमावणाराची मुलगी होती.

पहिला वुइलियम, १०६६–१०८७.

तो केवळ लहान मुलगा असतांनाच बापाच्या मागें, त्याच्या गादीवर बसला होता, आणि तो वयानें मोठा होत चालला तेव्हां, बखेडखोर **नार्मन** बारनांना (ही एक बडे लोकांची पदवी आहे) त्यानें आपल्या लगामीं आणलें, आणि **मेन** नांवाचें राज्य जिंकलें. १०५३ त **फ्लांडर्सचा कौंट** (ही एक पदवी आहे) ह्याच्या **माटिल्डा** नांवाच्या कन्येशीं त्यानें लग्न केलें, आणि तो नेहमी, पतिपत्नीसंबंधांत प्रेमल, आणि पितापुत्रसंबंधांत वत्सल होता. जेव्हां तो **इंग्लंडचा** राजा होण्याकरितां स्वदेशाहून आला, तेव्हां

तो सुमारें चाळीस वर्षांच्या वयाचा उंच डौलदार पुरुष होता. तो स्वभावानें कठोर आणि करडा होता, आणि आपले हेतु तडीस नेण्यासाठीं त्यानें पुष्कळ क्रूर कर्में केलीं. परंतु बहुतेक गोष्टींत, तो न्यायी प्रजापालक, प्रतापी सेनानायक, आणि शाहणा राजनीतिज्ञ होता. **इंग्लंड**वर अमल चांगल्या प्रकारें करण्याविषयीं त्यानें प्रयत्न केला, आणि टाळतां येईल तोंपर्यंत, तेथील कायदे कानू व देशरिवाज ह्यांत त्यानें पालट केले नाहींत. परंतु परदेशीय लोकांची फौज घेऊन **इंग्लंड** हस्तगत करण्यासाठीं तो आलेला होता, तेव्हां **इंग्लिशां**ची स्वतंत्र संसारयात्रा नष्ट करून त्यांची हालअपेष्टा केल्यावांचून त्याला तसें करतां आलें नाहीं.

राज्याभिषेकसमयीं लावलेली आग.

वेस्टमिन्स्टर एथें त्याचा राज्याभिषेकसंस्कार चालला होता तेव्हां देखील, त्या देवळांतील लोकांच्या आरोळ्यांनीं देवळाबाहेर उभे असलेले **नार्मन** शिपाई भेदरले, आणि त्यांनीं भोंवतालच्या घरांना आग घातली. ह्यावरून भयावह कारकीर्दीचा आरंभ झाला असें चिन्ह दिसलें. तेच आग लावणारे शिपाई आणि त्यांचे सरदार मिळून सारे, **वुइलियमा**च्या लढाया आम्हीं मारल्या त्यांबद्दल आपल्याला बक्षीस केव्हां मिळतें म्हणून वाट पाहत होते.

त्यांना फार दिवस वाट पाहवी लागली नाहीं. राज्याभिषेक झाल्यावर पुढें लवकरच, राजा ह्या नात्यानें **इंग्लंड**च्या दक्षिणेकडील व पूर्वेकडील मुलूख पाहण्यासाठीं म्हणून **वुइलियमा**ची स्वारी थाटानें गेली. तोच **इंग्लंड**चा भाग काय तो खरा सर केलेला होता. तेव्हां त्या स्वारींत तेथील सारी जमीन आपल्या पदरचे बारनपदवीचे बडे लोक, आणि नाइटपदवीचे सरदार बहादूर, व सामान्य शि-

पाई ह्यांना वांटून दिली. तो म्हणाला कीं, एड्वर्डच्या मरणकालापासून मी हक्कानें राजा झालेला होतों, परंतु राष्ट्रांतील प्रजेनें हारल्डाला वश होऊन त्याचा हुकूम मानून मजविरुद्ध बंड केलें, ह्यास्तव, धर्मखात्याची जी जमीन असेल तीखेरीज, बाकीची राज्यांतील सारी जमीन गुन्हेगारीदाखल सरकारची झाली. हें वुइलियमाचें म्हणणें अर्थात् अयुक्तिक होतें, तथापि त्यानें जे पालट केले त्यांना त्या म्हणण्यानें न्यायाचा आभास दिला.

गुन्हेगारीदाखल सर्व जमीन सरकारांत घेतली.

फोक–लांड, म्हणजे सामान्य लोकांच्या समाईक मालकीची जमीन, **आल्फ्रेड**च्या काळापासून अधिकाधिक राजाच्या सत्तेखालीं येत चालली होती. ती आतां दरोबस्त राजाची, म्हणजे राजाच्या मालकीची जमीन झाली, आणि जे रणांत मृत्युमुखी पडले, किंवा देश सोडून पळून गेले, त्यांच्या खासगी मालकीच्या जमिनी **नार्मन** बडे लोकांना देऊन टाकल्या. ह्या प्रकारें सारा **केंट** प्रांत, आणि बहुतेक सारे **सरी** आणि **ससेक्स** हे दोन प्रांत, आणि तशीच इतर **शायरां**तील (प्रांतांतील) पुष्कळ जमीन, **नार्मन** मालकांच्या हाती गेली. कांहीं प्रकरणांत **वुइलियमानें**, विधवा, पोरकीं मुलें, आणि छोटे जमीनदार, ह्यांस, त्यांच्या साऱ्या जमिनी तर नाहींतच, परंतु त्यांपैकीं तुकडे परत दिले. सारांश, **इंग्लिश** लोकांपैकीं ज्यांकडे कांहीं जमीन राहिली, ती त्यांस राजाकडून परत मिळाली, किंवा त्यांनीं किंमत देऊन सोडवून परत घेतली, आणि ती तरी **व्हास्सल** (तावेदार रयत, किंवा पोटजाहागीरदार) ह्या नात्यानें त्यांच्या भोगवट्यास राहिली. **आल्फ्रेडा**च्या काळांत ज्याची त्याची जातमालकीची त्याचा हक्क म्हणून

फोक–लांड राजाच्या मालकीची जमीन होते.

जमीन असे. तो शिपाईगिरीची नौकरी करून तिच्या रक्षणाच्या कार्मी मदत करी. शिवाय **आल्डर्मन** (प्रांताधिकारी) ह्या अधिकारावर माणूस नेमावयाचा झाला, म्हणजे मी अमक्यास पसंत केलें आहे म्हणून मत देण्याचा त्याला अधिकार असे. **आल्डर्मन** राजाच्या निवडणुकींत आपण मत देऊन मदत करी. ह्या प्रकारचें **आल्फ्रेडा**च्या काळांतील **इंग्लिशांचें** प्राचीन स्वातंत्र्य जाऊन, त्याच्या बदली, आतां सर्वच पारडें फिरून विपरीत प्रकार होऊं लागला. प्राचीन **इंग्लिश** राज्यपद्धतींत अधिकारपरंपरा, खालून उपक्रम पावून वर, म्हणजे स्वतंत्र म्हणविणारा रयत ह्यापासून राजापर्यंत, चढत जाई. उलटपक्षीं **नार्मनां**च्या राज्यपद्धतींत अधिकारपरंपरा, वर उपक्रम पावून खालीं उतरत येई. **नार्मन** पद्धतींत राज्यांतील सर्व जमीन राजाच्या मालकीची असे. ती तो, आपले अर्ल पदवीचे व बारन पदवीचे बडे लोक, आणि नाइट पदवीचे सरदार बहादूर, (हे तिन्ही पूर्वीच्या थेन पदवीच्या **इंग्लिश** बडे लोकांच्या जागीं नवीन आले) ह्यांस जाहागीर देई; आणि ते, त्याच्या मालकीची ती अशा समजानें, तिचा उपभोग करीत. त्याच प्रकारें ते बडे लोक आपली जमीन पोटजाहागीरदारांला देत, आणि ते पोटजाहागीरदार, ती त्यांच्या मालकीची अशा समजानें तिचा उपभोग करीत. ह्या जाहागीरदारांना व पोटजाहागीरदारांना **व्हास्सल** असें म्हणत, आणि जमिनीच्या मालकाला **लार्ड**, म्हणजे धनी, असें म्हणत. **व्हास्सला**ला, आपल्या **लार्डा**पुढें बिनहत्यार, उघड्या डोक्यानें, गुडघे टेंकून, आपले हात त्या **लार्डा**च्या हातांत देऊन राहून, मी आपला हुकूमबंदा होऊन राहीन, आणि यावज्जीव, आणि मरणकाळींही, आपल्याशीं इमानीपणा आणि आपणावर स्वामिभक्ति ठेवीन अशी शपथ वाहवी लागे. नंतर

त्या व्हास्सलाचा मुका घेऊन, लार्ड त्याला व त्याच्या वारसांना चिरकाल **फीफ** किंवा **फ्यूडम**, म्हणजे मोकासा, सरंजाम, किंवा जाहागीर, म्हणून जमीन देई, आणि तिच्या मोबदला, आपल्या लार्डासाठीं लढण्याकरितां अमुक इतकीं माणसें त्यानें पुरवीत जावीं अशा करारानें तो व्हास्सल बद्ध होत असे.

फ्यूडल सिस्टिम म्हणजे जाहागीर देण्याचा शिरस्ता.

आतां, ह्या फेरफारांपैकीं पुष्कळ फेरफार हळू हळू केले, आणि तेही जुलुमानें किंवा क्रूरपणानें केले नाहींत, तथापि ज्यांचें सर्वस्व किंवा बहुतेक सर्वस्व परदेशीयांना त्यांच्या नजरेखाली दिलें जात होतें त्यांना किती क्लेश होत असतील ह्याची कल्पना आम्हांला करतां येईल. असो, आतां, व्हिल्लन्स (जमीन खाऊन अगदीं नीच प्रकारची सेवा करणारे), आणि गुलाम देखील, परदेशीयांच्या तावडींत गेले, कारण त्या परदेशीयांपैकीं कोणाही माणसाला जमीन मिळाली म्हणजे तिच्या संबंधाचे सर्व हक्क, म्हणजे व्हिल्लन्स व गुलाम ह्यांची सेवा इत्यादि हक्कांचे प्रकार असत, त्यांसहवर्तमान ती त्याला मिळे. **नार्मनांपैकीं** बारन पदवीचे बडे लोक हे स्वदेशीं, म्हणजे **नार्मंडींत**, असतांना देखील, नेहमी बेकैद आणि शिरजोर असत; आणि त्यांना सुंदर घरें, नाजुक अन्न, व सभ्य दरबारी रीतिभाती, ह्यांची संवई असल्यामुळें, त्यांना इंग्लिशांचीं तीं ओबडधोबड घरें, तें जाडेंभरडें अन्न, आणि तें अतिशय मद्यपान, ह्या गोष्टींचा तिरस्कार वाटूं लागला; आणि वारंवार नार्मंडीहून येतांना, आपल्याबरोबर आपले नार्मन बबर्ची, शिंपी, घरें बांधणारे कारागीर आणि बांकनीस, ते घेऊन येत.

नार्मन लोक इंग्लिश लोकांचा तिरस्कार करितात.

शिवाय आतां सर्व देशभर मजबूत किल्ले बांधूं लागले. राज्याभिषेकानंतर तीन महिन्यांनीं जेव्हां, आपला भाऊ **बिशप ओडो केंटचा अर्ल,** आणि आपला मित्र **फिट्झ आस्बर्न हेरिफर्डचा अर्ल,** ह्यांना आपल्यामागें राज्यकारभार चालविण्यासाठीं ठेवून **वुइलियम नार्मंडीस** माघारा गेला तेव्हां, त्यानें त्यांना चहुंकडे किल्ले बांधण्याचें काम त्वरेनें चालवावें असें सांगितलें. **लंडनांत टेम्स** नदीच्या कांठीं **व्हाइट टौअर** (पांढरा बुरूज) नांवाचा किल्ला उठविला; तसेच **हेस्टिंग्स, नारिच, कांटेबरी, राचेस्टर, ब्रांबेर, लूएस कारिस्ब्रूक, वुइन्ड्झर,** ह्या व इतर ठिकाणीं, जंग्यांच्या तटबंदींचे प्रचंड बुरुजी किल्ले लवकर उदयीं आले. त्या किल्ल्यांतून जिंकलेल्या मुलुखाच्या रखवालीसाठीं विश्वासू **नार्मन** कप्तानांच्या (सरदारांच्या) हुकमतीखालीं, पायदळ आणि घोडेस्वार ह्यांच्या मोठमोठाल्या फौजा ठेवल्या. **इंग्लिश** लोकांना नेहमी दगडी भिंतींचा तिटकारा असून खुलेपणाची आवड होती, म्हणून हे दगडी तटबंदींचे प्रचंड किल्ले आपल्या देशांत उठूं लागलेले पाहून त्यांना दहशत पडली. ह्यास्तव, **वुइलियम नार्मंडीस** गेलेला असतां जेव्हां, त्याच्यामागें बारन पदवीचे बडे लोक, **इंग्लिशांची** मालमत्ता हिरावून घेऊन त्यांच्या बायका आणि मुली ह्यांच्या कुटाळ्या करून अपमान करूं लागले, तेव्हां, **केंट** व **हेरिफर्ड** ह्या प्रांतांत मोठीं बंडें उठलीं. त्याच वेळीं **हारल्डाचे** मुलगे ह्यांनीं पश्चिमेकडे, आणि बडे **इंग्लिश अर्ल** ह्यांनीं उत्तरेकडे, आपलें राज्य पुनः जिंकून घेण्याविषयीं प्रयत्न मांडले. शेवटीं, जेव्हां **डेनमार्कचा** राजा **स्वेन इंग्लिशांना** कुमक करण्यासाठीं आपल्या

किल्ले बांधण्याचें काम.

इंग्लिशांचें बंड.

देशाहून येत आहे असें वुइलियमानें ऐकलें तेव्हां, तो नार्मंडी-हून त्वेरेनें माघारा आला.

नंतर पुढील चार वर्षेंपर्यंत तो विजयी वुइलियम आणि ते इंग्लिश स्वदेशभक्त ह्यांच्या दरम्यान लांबणीची कुस्ती चालली. प्रथम वुइ-लियम राजानें पश्चिमेकडील बंड मोडलें, आणि एक्झीटर एथें एक मजबूत किल्ला बांधण्याविषयीं हुकूम केला. इतक्यांत लिआफ्रिकाचे नातू एड्-वुइन आणि मार्कीर, आणि शूर सिवर्डाचा मुलगा वाल्थिआफ, ह्या तिघांना स्काट्लंडचा राजा तिसरा माल्कम ह्याची कु-मक मिळून, ते उत्तरेकडे उठले; आणि शेवटीं १०६९ त नार्थं-ब्रिया प्रांतांतील लोकांनीं, एड्गर एथेलिंग ह्याला आपला राजा पसंत करून नेमून, डेन लोकांच्या कुमकेनें यार्क शहर हल्ला करून घेतलें, आणि तीन हजार नार्मन लोकांना ठार मारलें.

इंग्लिश स्वदेशभक्त ह्यांशीं झगडा, १०६७–१०७१.

वुइलियमानें ह्याचा सूड घोर प्रकारानें उगविला. ती खबर त्याला कळली तेव्हां तो डीन एथील जंगलांत शिकार करीत होता. परंतु तो एकदम निघाला, आणि पहिल्यानें, त्यानें द्रव्य देऊन डेनिश अरमाराची समजी करून त्याला वाटेस लावलें. नंतर यार्क शहर पुनः हस्तगत करून घेऊन, त्यानें यार्क व डर्हम ह्यांच्या दरम्यानच्या सर्व मुलूखभर आपली फौज फिरवून तो मुलूख उजाड करून टाकला. कसब्यांचीं गांवें, खेडीं-पाडीं, गुरेंढोरें, व पिकें, ह्या चट साऱ्यांचा त्यानें विध्वंस केला, आणि तेथील दैवहीन लोकांना ठार मा-रलें, किंवा स्काट्लंडच्या सरहद्दीपलीकडे पिटून लावलें. एक

वुइलियम उत्तरेकडील मुलूख ओस पाडितो.

लक्षाहून ज्यास्ती निरपराध लोक एकट्या दुष्काळानें मृत्युमुखीं पडले असें म्हणतात, आणि तो सारा मुलूख इतका ओसाड होऊन गेला होता कीं, नऊ वर्षेपर्यंत त्यांतील जमिनीची नांगरून लागवड करण्याचा कोणीं प्रयत्न केला नाहीं. कसेंही असो, परंतु **वुइलियमानें** आपलें लक्ष्य साधलें—**इंग्लंड**चा उत्तर भाग जिंकला. नंतर जातीनें आपण आंग न राखतां, किंवा आपल्या फौजेलाही आंग न राखूं देतां, हिंवाळ्याच्या ऐन भरांत, जमिनीवरील बर्फाच्या लोटांतून, पूर आलेल्या नद्यांतून, आणि उजाड पाणथळींवरून, कूच करून तो **चेस्टरास** गेला, आणि आपल्याविरुद्ध हा वेळपर्यंत टिकाव काढलेलें तें शेवटचें शहर त्यानें हस्तगत केलें. हें स्मरणांत ठेवलें पाहिजे कीं, ह्या सर्व स्थलांतील जे जे लोक बंडांत सामील झालेले होते, ते गुन्हेगारीदाखल आपआपल्या जमिनींस मुकले, त्यायोगें **नार्मन** जमीनदारांची संख्या वाढली.

इंग्लिश स्वदेशभक्त लोकांची न्यायरक्षणबाह्य झालेली अशी फक्त एक लहानशी टोळी उरलेली होती, तथापि त्या लोकांनीं, नद्या, ओढे, आणि दलदली, ह्यांनीं चहुंकडून व्याप्त अशा **ईलाइ** नांवाच्या बेटांत, आपल्या देशांतील शेंकडों लोक जमविले, आणि **मार्कीर**, आणि प्रख्यात न्यायरक्षणबाह्य **हेरिवर्ड–धि–वेक**, ह्या दोघां नायकांच्या हुकमतीखालीं राहून त्यांनीं अजून सुमारें एक वर्ष टिकाव काढला. शेवटीं **वुइलियमानें** त्या दलदलींतून दोन मैल लांब दगड, माती व लांकूड ह्यांची भरणी घालून रस्ता करविला, आणि जिवावर उदार होऊन लढून त्या स्वदेशभक्तांनीं त्याचा प्रतिकार केल्यावर, त्यांचें किल्ल्यासारखें आश्रयाचें ठिकाण तें बेट **वुइलियमानें** १०७१ त सर केलें. तेव्हां त्या स्वदेशभक्त नायकांची फाटाफूट

स्वदेशभक्त नायकांचा शेवट, १०७१.

झाली. एड्वुइन हा तर ह्यापूर्वीच ठार मारला गेला होता. मार्कीर हा जन्मभर कैदेत राहिला. गरीब दुबळा एथेलिंग एड्गर, हा कांहीं काळ परदेशीं राहून इंग्लंडास परत आला, आणि त्याला पेनशन (बैठें वेतन) करून दिलें, त्यावर उपजीविका करून त्यानें दिवस घालविले. शूर हेरिवर्ड ह्याच्याशीं वुइलियमानें सख्य केलें असें म्हणतात. परंतु वाल्थिआफ ह्याचा, पुढें पांच वर्षांनीं, राजाविरुद्ध कित्येक नार्मन अर्लांनीं मसलत करून कट केलेला त्याला माहीत असून खबर दिली नाहीं म्हणून, शिरच्छेद केला. वुइलियमाच्या कारकीर्दींत हा एवढाच काय तो थंड्या पोटीं वध झाला. वाल्थिआफावर लोकांची फारच भक्ति होती त्यामुळें वुइलियमाला दहशत पडली असावी असें दिसतें.

ह्या प्रकारें त्या स्वदेशभक्तांपैकीं अखेरचा पुरुष स्वपक्षासाठीं प्राणास मुकला. आणि ईलाइ हें बेट हस्तगत झाल्यानंतर, वुइलियमाच्या कारकीर्दीच्या बाकी राहिलेल्या काळांत देशांत बखेडे न होऊन पूर्वीपेक्षां स्वस्थता होती. राजा निग्रहीपणानें अमल करीत होता. त्यानें इंग्लिशांचे कायदे कानू अमुक म्हणून जाहीर रीतीनें सांगण्यासाठीं दरएक शायरांत (प्रांतांत) बारा लोक जमविले, आणि ते इंग्लिशांचे कायदे अमुक म्हणून सांगतील ते कायदे त्यानें स्वीकारले. शायरांतील सरकारी काम आपल्या शेरिफ नांवाच्या अधिकाऱ्यांच्या हातीं त्यानें ठेवलें. हिशेब राजकीय चापेल अथवा चान्त्रि (भजनमंदिर) कडील क्लार्क्स, म्हणजे कारकून, किंवा कनिष्ठ प्रतीचे पाद्री, ह्यांनीं ठेवावे असें केलें. मुख्य सेक्रेटरी ह्याला चान्सेलर असें म्हणत, कारण त्याची बसावयाची जागा एका पड-

स्वस्थतेचीं सोळा वर्षे.

ह्यामागें असे, त्या पडद्याला **लाटिन** भाषेंत **कान्सेलि** असें म्हणत. बारन लोकांवर फिर्यादी असतील त्या **किंग्स कोर्ट**, म्हणजे राजाचें कोडत, होतें त्यांत करण्याविषयीं परवानगी देऊन त्या बारन लोकांना दाबांत किंवा जरबेंत ठेवलें. त्या कोडतांत **नार्मन** व **इंग्लिश** ह्यांचा सारखा न्याय होई. शिवाय, १०८६ त साऱ्या **इंग्लिश** जमीनदारांकरवीं, **वुइलियमानें**, **साल्झबरी** एथील आपल्या बड्या दरबारांत, आम्ही आपल्याशीं प्रजाधर्मानें वागूं अशी शपथ घेवविली. असें करविण्यांत त्याचा हेतु हा कीं, त्यांनीं आपणाला आपला पहिला सर्वश्रेष्ठ धनी असा मानावें. पुढें थोड्या वेळांत नजरेस येईल कीं, इतर देशांत झाल्या प्रकारें बारनांच्या मुखीं **इंग्लंड** भक्ष्यसें पडणार होतें, तें, त्या शपथेनें, त्यांच्या मुखीं पडण्यापासून बचलें.

राजाशीं प्रजाधर्मानें वागण्याविषयीं शपथ.

वुइलियमानें चर्च (खिस्तीधर्मभक्तमंडल) आपल्या सत्तेखालीं ठेवण्यासाठींही चांगली सावधगिरी केली. आपल्या पूर्वींच्या कोणत्याच **इंग्लिश** राजानें **पोपाला** (**रोमन क्याथोलिक** खिस्ती धर्मपंथाचा **रोम** एथें राहणारा जगद्गुरु ह्याला) मी आपला शिष्य सेवक असें म्हटलेलें नव्हतें, म्हणून, **वुइलियमानें पोपाला** शिष्य सेवक म्हणण्याचें नाकारिलें. शिवाय, आपल्या जाहागीरदारांतून कोणालाही, आपल्या परवानगीवांचून, तो बहिष्कार घालूं देईना. १०७० त एक **लान्फ्रांक** नांवाचा सुज्ञ आणि विद्वान **लांबार्डी** देशांतील गृहस्थ होता, त्याला त्यानें **कांटर्बेरी** एथील **आर्चबिशप** नेमिलें, आणि हळू हळू बिशप्रिक्स, म्हणजे बिशपांच्या जागा, परदेशियांच्या नेमणुका करून भरल्या. बारन लोक आपल्या जमिनींबद्दल करीत त्याप्रमाणें, त्या बिशपांनीं आपल्या जमिनींबद्दल

आपणाला सेवांजलिसंस्कार (धन्याचा मानपान) केला पाहिजे असा त्यानें निर्बंध केला. धर्मोपदेशकांकरितां त्यानें त्यांचीं वेगळीं कोडतेंही करविलीं, आणि त्यापुढें सामान्य कोडतांत आल्डर्मेन आणि शेरिफ्फ ह्यांच्यासमवेत धर्मोपदेशकांना बसण्याची मनाई केली. लान्फ्रांकाच्या कारभाराच्या हातोटीखालीं धर्मोपदेशकांची आणि मठांची पूर्वीपेक्षां चांगली व्यवस्था झाली, आणि बारन लोकांवर कांहीं दाब ठेवतां येऊं लागला. तथापि लान्फ्रांक हा, " त्या देशांत पुष्कळ विपत्ति आणि अन्याय पाहून तो सोडून जाण्याची वारंवार इच्छा करी. " नार्मनांनीं बांधलेल्या अति सुंदर कथीड्रलांपैकीं (बिशपांच्या गाद्या असलेल्या देवळांपैकीं) पुष्कळ कथीड्रलें बांधण्याची सुरुवात ह्याच काळीं झाली, आणि सर्वांत चांगली म्हणून जी गोष्ट ती ही कीं, लान्फ्रांक आणि राजा ह्या दोघांनीं ब्रिस्टल एथील लाजिरवाणा गुलामाचा व्यापार बंद करविण्याविषयीं होईल तेवढी यत्नाची पराकाष्ठा केली.

आर्चबिशप लान्फ्रांक, १०७०.

ह्या प्रकारें एकंदरींत वुइलियम जरी कडवा धनी होता, तरी त्यानें बऱ्याच न्यायानें राज्य केलें. दोन गोष्टींत मात्र त्यानें आपल्या हिताकरितां अन्याय केला. पहिली गोष्ट ही कीं, हांपशायरांत आपल्या शिकारीसाठीं, ९००० हून ज्यास्ती एकर जमीन ओस पाडून तिचें न्यू फारेस्ट (नवें अरण्य) ह्या नांवाचें जंगल त्यानें बनविलें, आणि त्या जंगलांत कोणी माणूस हरिण मारील तर त्याचे डोळे काढले जातील, असा त्यानें हुकूम फर्मावला. दुसरी गोष्ट ही कीं, वुइंचेस्टर एथील आपल्या द्रव्याच्या भांडाराला भर घालण्यासाठीं,

न्यू फारेस्ट.

त्यानें प्रजेवर कर बसवून जुलूम केला. त्या करांत **एड्वर्ड धि कान्फेस्सर** ह्यानें काढून टाकलेला. **डेनगेल्ड** नांवाचा कर त्यानें पुनः बसविला.

इंग्लंडांतील सारी जमीन कशी वांटलेली आहे, तीपैकीं लागवडीखालीं किती, आणि ओस किती, लागवड कोणत्या प्रकारें होते, आणि प्रत्येक जमीन-करणारानें किती सारा किंवा कर देणें योग्य आहे, ह्या गोष्टी कळण्यासाठीं **वुइलियमानें** त्या देशांतील साऱ्या जमिनीची पैमाशी करविली, म्हणून लोक त्यावर फार रागावले. तथापि, वास्तविक पाहतां, ही गोष्ट करणें योग्यच होतें. त्या पैमाशीपासून कळून आलेल्या गोष्टींची नोंद एक **डूम्सडे-बूक** नांवाचें बूक (वही) करवून त्यांत ठेवली. त्या **डूम्सडे-बु**कावरून किती जमीन **नार्मनां**च्या हातीं गेलेली होती हें कळतें. आणखी, त्या काळीं **इंग्लंडां**त लोकसंख्या वीस लक्षांहून ज्यास्ती नव्हती, म्हणजे हालीं एकट्या **लंडन** शहरांत जी लोकसंख्या आहे तिच्या निमेहूनही कमीच होती, ही गोष्टही त्या बुकावरून समजते. ही लोकसंख्या कित्येक पिढ्यापर्यंत वाढली नाहीं. पुष्कळ **फ्लेमिंग**, म्हणजे **फ्लांडर्स** देशचे लोक, व **रुआंग्** आणि **कान** ह्या दोहों ठिकाणांहून व्यापारी, हे पुढल्या दोन कारकीर्दींत **इंग्लंडांत** आले. तसेच **जू** (इस्राएल) लोक **इंग्लंडां**त येऊन आपलीं घरें करून राहूं लागले. ते राजांपासून रक्षणाचें आश्वासन मिळवून त्याखालीं कसब्यांच्या गांवांतून **जूअरिझ**, म्हणजे वेगळे तुटक जूंचे महले, ह्यांत राहत. इतकी नवीन भरती होत असतांही लोकसंख्या वाढली नाहीं. ह्यावरून **नार्मन** विजयापासून पुढें जो अवघड जुलुमाचा

डूम्सडे-बूक.

कांळ आला त्यांतील युद्धांत आणि दुष्काळांत किती लोक मेले असावेत, हें कळून येतें.

वुइलियमाच्या कारकीर्दीच्या अखेरीचे दिवस त्याला भारी क्लेशांत गेले. त्याचा वडील मुलगा राबर्ट ह्यानें १०७८ त त्याच्याविरुद्ध नार्मंडींत बंड केलें, आणि एका लढाईत तर त्यानें आपल्या बापाला ओळखण्यापूर्वी अगदीं ठार केलेंच असतें. वुइलियमाचा सावत्र भाऊ बिशप ओडो ह्यानें बारन लोकांना मिळून संगनमत करून त्याच्याविरुद्ध एक कट केला, ह्यास्तव त्या भावाला कैदेंत टाकणें भाग आलें; आणि शेवटीं १०८७ त वुइलियमाला फ्रान्स देशचा राजा फिलिप ह्यापासून आपल्या नार्मंडी प्रांताच्या सरहद्दीचें रक्षण करण्यास जावें लागलें. तेथें मांट नांवाच्या गांवाला आग लागलेली असतां त्या गांवांत तो घोड्यावर बसून फुपाट्यावरून जाऊं लागला तेव्हां त्याचा घोडा ठेंचाळला, त्यासरसा झोंक जाऊन वुइलियम खोगरावर तडाख्यानें आपटला, आणि त्याला अनिवार्य दुखापत झाली. तेव्हां त्याला रुआंग् एथें माघारें उचलून नेलें. तेथें तो १०८७ त सेप्टेंबरच्या ९ व्या तारखेस मृत्यु पावला, आणि कान एथें त्याला मूठमाती दिली. त्याला राबर्ट, रिचर्ड, वुइलियम आणि हेन्री हे चार पुत्र होते. त्यांपैकीं रिचर्ड हा अल्प वयांतच वारला. राबर्ट नार्मंडी आणि मेन ह्या दोहोंचा ड्यूक किंवा राजा झाला. हेन्रीला वुइलियमानें ५००० पौंड मागें ठेवले; आणि वुइलियमाला लान्फ्रांकच्या नांवें पत्र देऊन त्याकडे ताबडतोब पाठविलें. त्या पत्रांत, राबर्ट हा अति हेकेखोर आणि नबळा असल्यामुळें इंग्लंडचें राज्य करण्यास अयोग्य आहे हें मला माहीत आहे, ह्यास्तव वुइ-

वुइलियमाला झालेले क्लेश आणि त्याचा मृत्यु, तारीख ९ सेप्टेंबर १०८७.

लियमाच्या मस्तकीं मुकुट घालावा, म्हणजे त्याला राज्याभिषेक करावा अशी लान्फ्रांकाला विनंती केली होती.

वुइलिअम रूफस (ताम्रवर्ण राजा)–१०८७–११००.

दुसरा वुइलियम हा **वुइलियम विजयी** याचा तिसरा मुलगा. **इंग्लंडचा** राजा आपणास करावें म्हणून आपल्या बापाची आंगठी घेऊन तो **लान्फ्रांकाकडे** आला. तो जोरदार आणि जलाल पुरुष होता. त्याचें मुख ताम्र, केश पिवळे, आणि डोळे तिरळे आणि कैरे, होते. तो बापाची आज्ञा पालन करणारा पुत्र होता, आणि बापासारखा शूर होता, परंतु तो राजनीतिकुशल नव्हता. तो कायद्याला किंवा धर्माला जुमानीत नव्हता, आणि तो आचरणानें बेकैद आणि व्यसनी पुरुष होता.

वुइलियमाचें रूप आणि गुणदोष.

लान्फ्रांक हा त्याचा गुरु किंवा शिक्षक होता. **राबर्ट** नाहीं तर एकादा वाद सांगूं लागेल, ह्या भीतीनें **लान्फ्रांकानें** १०८७ त सेप्टेंबरच्या २६ व्या तारखेस **वुइलियमाला वेस्टमिन्स्टर** एथें एकदम राज्याभिषेक केला. राज्याभिषेक करितांना, मी प्रजेला चांगले कायदे करून देईन, असें त्याकडून **लान्फ्रांकानें** वचन घेतलें होतें. तें वचन, **लान्फ्रांक** १०८९ त वारला तोंपर्यंत, पुढें दोन वर्षें त्यानें रक्षण केलें. परंतु बारन लोक संतुष्ट नव्हते. त्यांना आपणांवर अमल करण्याला तो नबळा परंतु सुस्वभावाचा **राबर्टच** पाहिजे होता. म्हणून, पुरे तीन महिने लोटले नाहींत तों, त्या कुलं-

बारनांचें बंड, १०८८.

गडी करणाऱ्या **बिशप ओडोला** आपला प्रमुख करून, त्यांनीं बंड केलें, आपल्या किल्ल्यांची मजबुती केली, देश उजाड केला, आणि राजाच्या करांचें आणि दंडांचें उत्पन्न बळकावलें. **वुइलियम विजयी** ह्यानें **इंग्लिशांवर** अमल न्यायीपणानें केला, हें मोठें शाहणपण केलें, ही गोष्ट आतां प्रत्ययास आली; कारण ह्या प्रसंगीं त्या बारनांपासून आमचें रक्षण करणारा काय तो आमचा राजा, अशी त्या **इंग्लिशांची** भावना होती. म्हणून जेव्हां **वुइलियमानें** जे कोणी " निथिंग ", म्हणजे निरुपयोगी किंवा अयोग्य, नसतील त्या सर्वांनीं आमच्या कुमकेस यावें म्हणून पाचारण केलें, आणि आम्हीं अमल चांगल्या प्रकारें करून, जंगलासंबंधी क्रूर कायदे आहेत ते रद्द करूं, असें वचन दिलें, तेव्हां **इंग्लिश** लोक त्याच्या जरीपटक्याभोंवतीं थव्यांच्या थव्यांनीं गोळा झाले. नंतर त्या बारनांचा पराभव झाला; इतकेंच नाहीं, परंतु

इंग्लिश लोक राजाला पाठबळ देतात.

त्या **इंग्लिश** लोकांनीं, **नार्मंडीहून रावटनें** एका अरमारासह फौज पाठविली होती, ती देखील माघारी पिटून लावली. त्या समयीं एक मोठा चमत्कार नजरेस पडला, तो हा कीं, ज्या **पेव्हन्सि** नांवच्या गांवीं १०६६ त पहिल्यानें **नार्मन** लोक **नार्मंडीहून** येऊन जमिनीवर उतरले होते, त्याच **पेव्हन्सि** गांवांत **इंग्लिश** लोकांच्या फौजेनें, **नार्मन** वंशांतील राजाच्या पुस्तपन्याकरितां म्हणून, **नार्मन** फौजेचा पराभव केला.

परंतु **वुइलियम** आपलीं वचनें विसरला. जेव्हां **लान्फ्रांक** मरण पावला, तेव्हां त्यानें त्याची **आर्चबिशपची** गादी चार वर्षांहूनही ज्यास्त काळपावेतों रिकामी टाकलेली होती, आणि त्याला आवरण्याला कोणी नव्हतें. १०९० त **नार्मंडींत** आ-

पला भाऊ **राबर्ट** ह्याच्याशीं युद्ध करण्यासाठीं तो गेला. शेवटीं जेव्हां त्या भावांचा समेट किंवा सल्ला झाला, आणि आम्हां दोघांतून जो कोणी ज्यास्त काळ वांचेल त्याला **नार्मंडी** व **इंग्लंड** हीं दोनही राज्यें मिळावीं असा उभयतांचा करार झाला, तेव्हां ते दोघे मिळून **हेन्री**शीं युद्ध करण्यास गेले. दरम्यानच्या काळांत **इंग्लिश** लोकांचें द्रव्य आणि **इंग्लिश** शिपाई ह्यांचा उपयोग मन मानेल तसा अटक नसतां होत होता. तेव्हां विशेष म्हणून मनांत वागवावयास पाहिजे होतें तें हें कीं, त्या काळांत शिपाई म्हटले म्हणजे, घरेंदारें आणि शेतवाड्या असलेले माणूस असत, आणि आपआपल्या घरकामावरून त्यांना राजाच्या कामगिरीसाठीं बोलावून न्यावयाचें असे. **वुइलियम** हा शूर सेनापति होता. तो आपल्या अनुयायांवर कृपाळू, आणि वारंवार आपल्या शत्रूंविषयीं मोठा उदार असे. चहुंकडून शेंकडों बडे बडे लोक त्याची नौकरी करण्याला जमत, आणि तो सढळ हातानें त्यांना बक्षिसें देऊन मेजवान्या करी, परंतु आपल्या लोकांचें द्रव्य आपण या कामीं खर्चीत आहों ह्याविषयीं त्याला कधींही काडीमात्र काळजी वाटली नाहीं.

नार्मंडींत होणाऱ्या नार्मनांच्या युद्धांच्या खर्चासाठीं इंग्लंडांतील लोकांवर कर बसतात.

कायद्याचा अमल करण्याचें काम, न्यायाधीश म्हणून असत, ते करीत, आणि **वुइलियम विजयी** ह्याच्या कारकीर्दींत ह्या न्यायाधीशांतील मुख्याला **जस्टिशियर** असें प्रथमच म्हणूं लागले, आणि त्याचा अखत्यार मोठा होता. राजा देशांतरीं जाई त्या वेळीं त्याच्या बदली तो **जस्टिशियर** त्याचा राज्यकारभार चालवी, आणि सनदा, परवाने, आज्ञापत्रें वगैरे, त्याच्या नांवानें बाहेर जात. **दुसऱ्या वुइलियमानें राल्फ फ्लांबार्ड** नांवाच्या एका घ-

सक्या आणि असभ्य पुरुषाला आपला जस्टिशियर नेमलें होतें, आणि जेव्हां राजाच्या खजीन्यांत द्रव्य कमी होई, तेव्हां हा मनुष्य लोकांवर हरएक रीतीनें जुलूम करी. जेव्हां बिशप आणि आबट मरत, तेव्हां तो त्यांच्या जागा विकी, किंवा रिकाम्या टाकी, आणि त्यायोगें द्रव्य येई किंवा शिलकी पडे तें तो राजाच्या खजीन्यांत टाकी. तो बडे लोकांकडून मोठ्या मोठ्या खंडण्या घेई. प्रत्येक बारसाला सरंजाम, जाहागीर वगैरे जमीन, किंवा इतर माल मिळकत मिळावयाची असली, किंवा एकादा बाप आपल्या मुलीचें लग्न करण्याविषयीं राजाची परवानगी मागूं लागला, म्हणजे त्याला अमर्याद दंड द्यावयास लावी. तसाच तो लोकांवर अन्यायाचे कर लादी. प्रत्यक्ष चोऱ्या करणारे चोर दंड देऊन शिक्षा टाळीत. एवढ्यानेंच सारें संपलें नाहीं. राजाचे दरबारी लोक कोठेंही जाओत, तेथें खेड्यापाड्यांतील लोकांवर ते चरत किंवा त्यांची चंदी चाले. ते त्यांचें दाणापाणी घेत, त्यांचे घोडे वापरीत, त्यांचीं पिकें विकीत, आणि त्यांच्या मिळेल त्या जिनसावर ते हात मारीत. त्या काळच्या क्रानिकलांत (बखरींत) लिहिलें आहे, "जें देवाला द्वेषपात्र आणि माणसाला त्रासकारक, तें सारें वुइलियमाच्या काळांत ह्या देशीं नित्यपरिपाठांतलेंसें झालेलें होतें, आणि त्यामुळेंच तो आपल्या बहुतेक लोकांना अत्यंत द्वेषपात्र, आणि देवाला द्वेषार्ह झाला." त्या हतभाग्य इंग्लिश लोकांना एकच सुख होतें, आणि ते हें कीं, निदान त्या राजानें बारनांना निवांत ठेवलें, आणि सर्व राज्यांत बखेडे नसून स्वस्थता होती.

राल्फ फ्लांबार्ड जस्टिशियर.

लोकांवर जुलूम.

त्या राजानें खरोखर इंग्लंडच्या कल्याणाच्या अशा दोन गोष्टी

केल्या. १०९० त, जे कोणी **वेल्स** देशांत जमीन जिंकून हस्तगत करूं शकले, त्या सर्वांना ती जमीन त्यानें बक्षीस केली, आणि स्वतः त्यानें त्या देशावर दोन स्वाऱ्या केल्या. ह्या प्रकारें पुष्कळ नवीन जमिनी जिंकून घेतल्या आणि किल्ले बांधले, ते मुख्यत्वेंकरून **पेंब्रोक** आणि **कार्डिगन** प्रांतांत. शिवाय, त्या काळापर्यंत **कंबर्लंड** हा कौंटी **स्ट्राथ्क्लाइडा**चा भाग म्हणून मोडत होता, तो १०९२ त त्यानें हस्तगत केला. नंतर **कार्लाइल** म्हणून जें त्या कौंटीचें मुख्य ठिकाण होतें तेथें एक मोठा किल्ला बांधवून, **हांपशायरांतून** शेतकरी लोक नेऊन त्यांकडून त्या कौंटींत वस्ती करविली, आणि तेथें **इंग्लिश अर्ल** (अर्ल पदवीचा अधिकारी) नेमून ती **इंग्लिश अर्लडम** (अर्लाच्या ताब्यांत असणारा प्रांत) केली. आणखी **स्काट्लंड**चा राजा **तिसरा माल्कम** ह्याकडून आपल्या सर्व राज्याबद्दल आपणाला सेवांजलिसंस्कार (धनीपणाचा मानपान) करविला.

वेल्स देशांत विजय.

कंबर्लंड हा कौंटी इंग्लंडांत सामील केला.

पुढें १०९३ त **वुइलियमा**ला जबर दुखणें आलें, तेव्हां त्याला आपल्या दुर्मार्गांचा आणि गरीबांना लुटल्याचा पस्तावा झाला, आणि **ब्रेक** एथील **आन्सेल्म** नांवाचा **आबट** (एक प्रकारचा जोगी) फार सुशील आणि विद्वान पुरुष होता, त्याला त्यानें **कांटर्बरी** एथील **आर्चबिशप** नेमलें. **आन्सेल्म** हा तें पद किंवा तो अधिकार स्वीकारण्याला नाराजी होता, तो म्हणाला, "मी आणि **वुइलियम** ह्यांनीं मिळून अमल करणें म्हणजे, एका गरीब दुबळ्या मेंढराची एका वठणीस न आणलेल्या गलेलठ्ठ बैलाबरोबर सांगड घा-

आर्चबिशप आन्सेल्म.

लणें होय." सारांश बिशपांना आर्चबिशपाच्या अधिकाराचा क्रूसाच्या आकाराचा दंड असतो, तो त्याच्या हातीं जुलुमानें द्यावा लागला. इतक्यांत जेव्हां राजा दुखण्यांतून बरा होऊन पुनः दुष्टपणानें अमल करूं लागला, तेव्हां तो आर्चबिशप झालेला आन्सेल्म दुबळ्याहून कांहीं वेगळा आहे असें राजाच्या प्रत्ययास आलें. आर्चबिशपच्या गादीवर बसविल्याबद्दल आन्सेल्माकडे राजा अमर्याद रकम मागूं लागला, ती मी देणार नाहीं म्हणून आन्सेल्मानें साफ सांगितलें, आणि लोकांकडून राजा जुलुमानें पिळून ·द्रव्य घेई त्याबद्दल आन्सेल्मानें त्याला बेधडक दूषण दिलें. परंतु चार वर्षेंपर्यंत राजाच्या दुष्टपणाशीं झुजून, तो आपल्याच्यानें बंद करवत नाहीं असें पाहून, शेवटीं आन्सेल्म १०९७ त आपला अधिकार सोडून रोम एथें सुखवस्तूसारखा राहवयास गेला, आणि आपला दुष्ट छंद चालविण्याला वुइलियम पुनः एकवार खुला होऊन राहिला.

• दरम्यानच्या काळांत वुइलियमानें राबर्टाशीं पुनः युद्ध मांडलें होते, आणि फ्रेंच राजानें राबर्टाचा पक्ष धरलेला होता, तो त्याकडून सोडविण्यासाठीं, त्यानें द्रव्याची मोठी रकम खर्च केली. शिवाय त्यानें एक दहा हजार मार्कांची किंवा ६६६६ पौंडांची रकम खुद्द राबर्टाला दिली. तेव्हां राबर्टानें सल्ला केला, आणि जरूसलेम एथें जाण्याला द्रव्य पाहिजे म्हणून त्यानें वुइलियमाला नार्मंडी गहाण लावून दिली. त्याच काळीं, म्हणजे १०९६ त, जरूसलेम नांवाचें जें ख्रिस्ती लोकांचें पुण्यनगर किंवा पुण्यक्षेत्र तें तुर्क लोकांच्या अमलाखालीं होतें, तें, तेथवर जाऊन जिंकावें, आणि ख्रिस्ती यात्रेकरूंना ते तुर्क लोक फार पीडा देत त्यास्तव त्यांना शासन करावें, म्हणून सारें यूरोप खंड वायचळलें

होतें. **चौथा अर्बन** नांवाचा **रोम** येथील **पोप** ह्यानें, **पीटर धि हर्मिट** (वानप्रस्थ) नांवाचा **तुर्कां**पासून त्रास भोगलेल्या यात्रेकरूंपैकीं एक पुरुष होता, त्याला, **जरूसलेमां**तील **ख्रिस्ताच्या पवित्र कबरीचें** दर्शन घेऊन तेथें भजनपूजन करण्याला जाणाऱ्या यात्रेकरूंस जे घोर क्लेश भोगावे लागत, त्यांचा धर्मोपदेशक नात्यानें चहुंकडे घोष करीत जाण्याकरितां उमेद दिली. आणखी त्या **पोपानें**, आपल्या पापांची आपणांला क्षमा व्हावी म्हणून यत्न करणाऱ्या साऱ्या लोकांस, आपआपल्या डाव्या दंडाच्या बाहीवर रंगीत क्रूस शिवून वागवा, आणि **ख्रिस्ती** लोकांची **पुण्यभूमि** त्या **तुर्कां**पासून सोडवून मोकळी करण्यासाठीं **क्रूसेड**करितां (क्रूसेड हा शब्द क्रूस ह्या अर्थी **क्रक्स** म्हणून लाटिन शब्द आहे त्यापासून उत्पन्न झालेला आहे), म्हणजे धर्मयुद्धार्थ, निघा म्हणून पाचारण केलें. म्हणून **राबर्ट** धर्मयुद्धाला गेला, त्याच्या बरोबर अनेक **इंग्लिश** लोक व **फ्रेंच** लोक गेले, आणि **वुइलियम** त्या वेळापुरता **नार्मंडी**चा आणि **फ्रान्स** देशाच्या दुसऱ्या कांहीं उत्तम भागांचा अमलदार झाला.

राबर्ट हा पहिल्या क्रूसेडला (धर्मयुद्धाला) गेला, १०९६.

ह्या **वुइलियमाच्या** अमलदारीबद्दल गरीब **इंग्लिश** लोकांना भारी मोल द्यावें लागलें. तें १०९६ साल, अनेक प्रकारचे कर, आणि पीडाकारक दुष्काळ, ह्यांनीं किती उदासवाणें दिसत होतें, हें त्या काळच्या बखरींत लिहिलेलें आहे, आणि पुढल्या तीन सालांची तीच कथा तींत सांगितलेली आहे. परंतु ह्या सर्व दुःखकारक गोष्टींची समाप्ति जवळ आली होती. ११०० त आगस्टच्या २ ऱ्या तारखेस, जाऊं नये म्हणून त्याला पूर्वी सावध केलेलें असतां, **वुइलियम न्यू फारेस्ट** नांवाच्या अरण्यांत शिकारीस गेला.

तेथें तो आपल्या सोबत्यांपासून दुरावून वेगळा पडला, आणि पुढें लवकरच, छातींत तीर लागून मेलेला, तो कांहीं शेतकऱ्यांना सांपडला. कित्येकांची कल्पना होती कीं, **वाल्टर टिरेल** नांवाच्या एका **फ्रेंच नाइटाच्या** (सरदार बहादुराच्या) हातून तो आकस्मिक योगानें मेला; परंतु **टिरेलानें** शपथ घेऊन सांगितलें कीं तें मजकडून झालें नाहीं; तेव्हां, ज्या गरीब लोकांना "त्यानें केलेल्या जुलुमांनीं तो अतिद्वेषपात्र झालेला होता," त्यांतून कोणीतरी एकानें त्या **वुइलियमाला** ठार मारलें असावें असा विशेष संभव दिसतो. त्याचें शव एका शेतकऱ्याच्या गाड्यावर घालून **वुइंचेस्टर** एथें नेलें, आणि तो "पापमुक्त न होतां आपल्या पातकांत असून" मेला, म्हणून, कोणत्याही प्रकारचा धर्मसंस्कार न करितां तें पुरलें. त्याचा धाकटा भाऊ **हेन्री**, त्या शिकार करण्यासाठीं गेलेल्या मंडळींत होता, तो,—**राबर्ट** अजून **पुण्यभूमींतच** होता त्याला गादी द्यावी म्हणून कोणी बोलणें काढील त्यापूर्वी—गादी आपल्या कबज्यांत यावी म्हणून, तेथून घोडा भरधांव फेंकीत **वुइंचेस्टरास** गेला.

वुइलियम रूफसाचा मृत्यु, ११००.

पहिला हेन्री, ह्याला बोक्लर्क हें उपपद होतें.

११००—११३५.

ह्यापुढें ३५ वर्षेंपर्यंत, काळ तर कठीणच होता आणि कर जबर होते तरी, त्या देशांतील राज्यकारभार एकंदरीनें चांगल्या प्रकारें चालला होता. **हेन्री हा वुइलियम विजयी ह्याचा कनिष्ठ पुत्र**

होता. तो शांत, सावध पुरुष असून, त्याचे डोळे विचारवान आणि बुद्धिमान पुरुषाच्या डोळ्यांसारखे होते. तो विद्येचा शौकी होता. त्याला अंत:करण फारसें नसून, त्याची बुद्धि चांगली होती. आपण आपल्या प्रजेचें पालन चांगल्या रीतीनें केलें तरच गादीवर आपली स्थिति काईम होईल हें त्याच्या लक्ष्यांत आलें. **वुइलियम** आगस्टच्या २ ऱ्या तारखेस मारला गेला त्याच दिवशीं, **वुइंचेस्टर** एथील राजकीय खजीना **हेन्रीनें** आपल्या कबजांत घेतला. नंतर तो **लंडनास** त्वरेनें गेला, तेथें कांहीं वाटाघाट होऊन त्याला राजपदाकरितां पसंत केलें, आणि **वेस्टमिन्स्टर** एथें **११००** त आगस्टच्या ५ व्या तारखेस रविवारीं त्याला मुकुट घालून राज्याभिषेक केला. लोकांना आनंद झाला, कारण; **वुइलियम विजयी** ह्याच्या पुत्रांपैकीं इंग्लंडांत जन्म पावलेला, आणि तेथेंच शिक्षित झालेला, असा तोच काय तो एकटा होता. शिवाय, **राल्फ फ्लांबार्ड** नांवाच्या त्या दुर्लौकिकाच्या पुरुषाला एकदम पकडवून **टौअरमध्यें** कैदेंत टाकण्याची, आणि तो चांगला **बिशप आन्सेलम** ह्याला बोलावून परत आणण्याची त्यानें त्वरा केली.

पहिल्या हेन्रीचे गुणदोष.

नंतर त्यानें एक "**चार्टर**" किंवा लेखी राजवचनपत्र प्रसिद्ध केलें. चांगले कायदे माजी पडले आहेत, ते आम्ही पुन: चालू करूं, आणि लोक आणि **चर्च** (धर्मोपदेशक मंडल) ह्यांवर गैरवाजवी करांचीं ओझीं आहेत त्यांपासून त्यांना मुक्त करूं, विधवा आणि वारशानें मालमत्तांच्या धनिनी झालेल्या स्त्रियांस, त्यांच्या इच्छेविरुद्ध प्रकारानें लग्नें करण्याविषयीं, आम्ही जुलूम करणार नाहीं, आणि इच्छेस येईल त्याप्रमाणें मरणसमयीं आपल्या जिंदगीची व्य-

हेन्रीचा चार्टर.

वस्था करण्यास लोकांना आम्ही मोकळीक देऊं, अशीं वचनें त्या चार्टरांत होतीं. आणखी बारन हे आपले सरंजामी किंवा जाहागीरदार ह्या नात्यानें त्यांच्या कल्याणाविषयीं त्यानें स्वतः ज्या ज्या तजविजी केल्या, त्या त्या तजविजी आम्ही आपआपल्या पोटजाहागीरदारांच्या कल्याणाविषयीं करूं असें त्या बारन लोकांकडून त्यानें वचन घेतलें. **स्काट्लंड**चा राजा **माल्कम** आणि त्याची बायको **मार्गरेट** (**एड्मंड आयर्नसाइड**ची नात) ह्या दंपत्याची **एडिथ** नांवाची कन्या हिच्याशीं विवाह करून त्यानें **इंग्लिश** लोकांची प्रीति अधिक संपादली. ह्या सांगितलेल्या नात्यावरून ती **एडिथ** राणी **इंग्लिश** राजरक्ताची होती हें लक्ष्यांत येईल. तिच्या द्वारें, हालींच्या दिवसापर्यंतचे आमचे सर्व राजे आणि राण्या, पहिला **वेस्टसाक्सन** राजा जो **सर्डिक**, त्यापासून आपली उत्पत्ति म्हणून, इच्छा असल्यास, साबीत करूं शकतील. असो, **एडिथ** राणीनें, असें असतांही, **नार्मन**ांना खुशी करण्यासाठीं आपलें नांव पालटून **मॉड** किंवा **माटिल्डा** हें नांव स्वीकारलें.

तो इंग्लिश राजपुत्रीशीं विवाह करितो.

राबर्ट हा नेहमीचाच सर्व गोष्टींत अति मागस असे, त्याप्रमाणें वर लिहिलेल्या साऱ्या गोष्टी, तो **पुण्यभूमीहून** स्वदेशीं माघारा येण्यापूर्वीच, होऊन गेलेल्या होत्या. तो माघारा आला तेव्हां बारनांनीं, त्यांच्या वहिवाटीप्रमाणें, त्याच्या तर्फेनें बंड केलें. ह्या खेपेस तें बंड लवकर मोडलें. **राबर्ट** फौज घेऊन येऊन **पोर्ट्स्मौथ** एथें जमिनीवर उतरला. परंतु **आन्सेल्म** आणि **मॉयलान**चा **राबर्ट** ह्या दोघांनीं त्या दोघां बंधूंच्या दरम्यान सल्ला करविला. मग **राबर्ट** हा, **हेन्री**कडून ४००० रु-

प्याचे **मार्क** (एक नाणें) इतकें पेनशन, म्हणजे बैठें वेतन, ठरवून घेऊन **नार्मंडीस** माघारा गेला. तथापि अजून आणखी पांच वर्षेंपर्यंत, **नार्मंडींत** व **इंग्लंडांत**, बारन हे लोकांना चिथवीतच होते. **बेलेम** एथील **राबर्ट** हा **श्रूस्बरी** आणि **आरन्डेल** ह्यांचा **अर्ल** होता. तो क्रूर आणि विश्वासघातकी पुरुष होता. त्यानें मोठेंच बंड केलें, तेव्हां तें मोडून त्याला हद्दपार करून **नार्मंडींत** घालवून दिलें. तेथें त्यानें पुनः **हेन्रीच्या** मुलुखावर हल्ला केला; आणि **ड्यूक राबर्ट** हा इतक्या वाईट प्रकारानें अमल करूं लागला कीं, हळू हळू **नार्मंडीचे** तुकडे तुकडे होऊं लागले. तेव्हां ११०६ त **हेन्री इंग्लिश** फौज घेऊन **नार्मंडींत** गेला, आणि **टेन्शेब्राइ** एथील विख्यात लढाईत त्यानें तेथील बडे लोकांना पुरें जिंकलें, आणि **राबर्टाला** धरून **इंग्लंडास** आणलें, तेथें तो, आपल्या आयुष्याच्या बाकी राहिलेल्या सार्‍या काळांत, कैदेंत होता. सारांश, हेकेखोर आणि बेपरवा, परंतु उदार आणि मायाळू, अशा स्वभावाचा तो गरीब **राबर्ट**, ह्याचा ह्या प्रकारें शेवट झाला. **इंग्लिश** लोकांना त्या **टेन्शेब्राईच्या** लढाईचा गर्व वाटला, कारण, **नार्मनांना** त्यांच्या देशीं जिंकल्यानें, **हेस्टिंग्सच्या** लढाईची आमच्या तोंडावर आलेली काळोखी आम्हीं सारी पुसून टाकली, असें ते मानूं लागले.

टेन्शेब्राईची लढाई, ११०६.

राबर्टाला कैदेंत टाकलें.

नार्मंडी आणि **इंग्लंड** हीं पुनः एकवेळ एका राजाच्या सत्तेखालीं आलीं. आणि **नार्मन** बारनांशीं झालेला हा झगडा आमच्या देशाला फार महत्त्वाचा झाला. ह्याचें कारण, **हेन्रीनें** आपल्या **इंग्लिश** शिपायांना **फ्रेंचांच्या** घोडेस्वारांच्या फौजेशीं

कसें लढावें हें शिकविलें त्यामुळें त्या फौजेची त्यांना भीति वाटत असे ती नाहींशी झाली, एवढेंच केवळ नव्हे; परंतु दुसरेंही एक कारण होतें, तें हें कीं, हेन्रीनें त्या बंडखोर नार्मन बारनांचे इंग्लंडांतील जमीनजुमले काढून घेऊन ते, त्यांच्याहून कमी बलाढ्य, परंतु आपणांशी प्रजाधर्मानें वागतील, अशा नार्मन लोकांना वांटून दिले. हे नवीन केलेले बडे लोक वारंवार आपआपल्या कौंटींचे शेरिफ्फ होत, आणि ते नार्मनच होते तरी, ते, जुन्या उमरावींपैकीं नसल्यामुळें, किंवा नार्मंडींत त्यांना जमिनी नव्हत्या त्यामुळें, इंग्लंड हाच स्वदेश मानून, इंग्लिश लोकांशीं शरीरसंबंध करूं लागले. त्यायोगें नार्मन आणि इंग्लिश ह्यांच्या दरम्यानचा भेद, मुख्यत्वेंकरून दरबाराशिवाय इतर सर्वत्र इंग्लिश भाषा अधिकाधिक प्रचारांत येऊं लागल्यामुळें, मावळूं लागला. कांहीं काळपर्यंत आमच्या देशांतील बडे लोकांची भाषा फ्रेंच कशी होती, ह्या गोष्टीचा आजमितीला सुद्धां पत्ता लावतां येतो. उदाहरणार्थ, शीप (मेंढरूं), आक्सन (बैल अनेकवचनीं), काफ (वांसरूं), हीं प्राचीन इंग्लिश नामें आहेत, कारण, व्हिल्लन्स म्हणून जे कनिष्ठप्रतीचे जमीन खाणारे बंदे होते, ते हीं जनावरें पाळून वाढवीत. परंतु त्याच पशूंचें मांस जेव्हां नार्मनांच्या खाण्याच्या मेजावर येई तेव्हां, त्या मांसाला ते, यथाक्रम, मट्टन (मेंढराची सागुती), बीफ (गोमांस), आणि व्हील (गोवत्समांस), म्हणत. ह्याच प्रकारें सॉव्हरन (राजा किंवा राणी), हॉमेज (सेवांजलिसंस्कार किंवा धन्याचा मानपान), पालस (राजमंदिर), आणि कास्टल (किल्ला), हे नार्मन शब्द आहेत,

नवे बडे लोक इंग्लिश होतात.

आमच्या भाषेंत आलेले फ्रेंच शब्द.

आणि हार्थ (घरांतील शेकोटीची जागा), व होम (आपलें घर), हे प्राचीन इंग्लिश शब्द आहेत. सारांश, शरीरसंबंध होऊन नार्मनांचें रक्त इंग्लंडांत प्रविष्ट झाल्यापासून इंग्लिश लोक जसे पूर्वींहून जिवट, साहसी, आणि स्थितिरीतीनें निवळलेले झाले, तशी आमची भाषा, रोमान्स किंवा फ्रेंच शब्द आंत शिरून, पूर्वींहून शब्दबहुल आणि सुंदर झाली.

नार्मनशाई आणि इंग्लिशशाई ह्या, हेन्रीच्या कारकीर्दींतील उभयपक्षीं समान न्यायानें, पूर्वींहून अधिक जवळ येऊन एकमेकीला भिडल्या. ११०७ त साल्झबरी एथील बिशप राजर ह्याला हेन्रीनें आपला जस्टिशियर, म्हणजे मुख्य न्यायाधीश, केलें, आणि त्या विख्यात पुरुषानें राज्यांतील महसूल आणि कायदे ह्यांना उत्कृष्ट व्यवस्थेप्रत आणलें. त्यानें लोकांना त्यांची शायरमूट्स (शायरांतील म्हणजे प्रांतांतील कोडतें) बंद केलीं होतीं तीं पुनः स्थापून दिलीं, आणि शेरिफ्फ नांवाचे शायरांतील अधिकारी दरसाल, जमिनींचे सारे, कर, आणि दंड, ह्यांचे उत्पन्न किंग्सकोर्ट अथवा "क्यूरिआ रेजिस" (राजाची कचेरी) ह्यांत भरण्यासाठीं येत. त्यांना पावत्यादाखल पैसा पावल्याची खूण म्हणून टालिझ (हा शब्द, कापणें ह्या अर्थी टेल्लेर ह्या फ्रेंच शब्दावरून साधलेला आहे), म्हणजे लांकडाच्या चिरोट्या, मिळत. ही प्रत्येक चिरोटी एका सगळ्या चिरोटीचें मधोमध कापलेलें अर्ध असे, तें पुनः असें कीं त्याला एका आंगून नागमोड दांते पाडलेले असत, ते अशा खुबीनें पाडलेले कीं, तसेच दांते पाडलेलें जें दुसरें अर्ध असे त्याचे आणि ह्याचे दांते एकमेकांत गच्च बसून दोहोंची मिळून बेमालूम एक चिरोटी बनावी. त्या सगळ्या चिरोटीचें एक अर्ध राजाच्या कचे-

साल्झबरीचा राजर ह्या जस्टिशियर होतो.

रींत ठेवलें जाई, आणि दुसरें अर्ध त्या पैसा भरणाऱ्या शेरिफ्फाला देत. ज्या मेजावर भरण्यास आणलेला पैसा मोजीत त्यावर बुदबळांच्या पटासारखें एक चेकर्ड (खिडकीदार रंगविलेलें) कापड आंथरलेलें असे. जेव्हां राजाच्या हिशेबांपैकीं कांहीं विशेषप्रकारचे हिशेब करावयाचे असत तेव्हां त्या कापडावर लांकडी किंवा धातूच्या चकत्यांनीं रकमा मोजीत किंवा गणीत. ह्यावरून तें कौंटिगहौस (हिशेब करण्याचें घर किंवा स्थान) पुढें "कोर्ट आफ धि एक्स्चेकर" (जमाबंदीची कचेरी किंवा कोडत) ह्या नांवानें प्रसिद्धीस आलें. शेरिफ्फांकडून कोणाचें नुकसान झालें तर त्याला राजाच्या कोडतांतील न्यायाधीश किंवा अधिकारी ह्यांपुढें जाऊन फिर्याद करितां येई. ते न्यायाधीश किंवा अधिकारी करांची ठरोती करण्यासाठीं, आणि वाद किंवा तंटे ह्यांची चौकशी करण्यासाठीं दरसाल एकदा सर्व देशभर फिरावयास जात. कसब्यांच्या गांवांनीं पहिल्या हेन्रीपासून पुष्कळ नवीन हक्क द्रव्य देऊन मिळविले किंवा विकत घेतले. लंडनानें तर, आपल्यापुरतीच म्हणून एक सनद मिळविली, आणि तीबरोबर आपल्यापुरताच एक शेरिफ्फ, व एक जस्टिशियर, नेमून घेतला. त्या शहरांत राहणाऱ्या लोकांची चौकशी त्या शहरच्या कोटाबाहेर होऊं नये, असा ठराव झाला. तेथील लोकांना कोणत्याही प्रकारचा डेन्गेल्ड नांवाचा कर द्यावा लागत नव्हता, आणि त्यांचा व्यापार कर जकाती वगैरेपासून मुक्त होता. बारन लोकांनीं "ट्रायल बाइ बाटल" किंवा "ड्यूएलिंग," म्हणजे लढाईनें किंवा द्वंद्वयुद्धानें चौकशी, ही इनसाफाची रीति,

कोर्ट आफ धि एक्स्चेकर.

कसब्याचे गांव व इतर खेडींपाडीं.

दिव्यानें चौकशीच्या बदली, त्या देशाच्या कांहीं भागांत चालू केलेली होती. परंतु **लंडनांत** राहणाऱ्या लोकांचा इनसाफ त्या रीतीनें होऊं शकत नसे. खेड्यापाड्यांतले लोकदेखील पूर्वीपेक्षां खाऊनपिऊन सुखी होते, कारण एका पक्षीं जंगलासंबंधीं कायदे जरी अजून फार कडक होते, तरी दुसऱ्या पक्षीं चोरटे, लुटारू, ह्यांना फांशीं देत असत, आणि दुराचारणांना फार कडक शिक्षा होई. ह्या काळच्या बखरींत लिहिलें आहे "**हेन्री** हा चांगला पु-"रुष होता, आणि त्याचा मोठा दरारा असे. त्याच्या काळांत, को-"णीही माणूस दुसऱ्या कोणाच्या विरुद्ध वागण्यास किंवा वर्तन "करण्यास धजत नसे."

कायदे चांगले होते त्यामुळें शांतिमूलक कला **इंग्लंडांत** वृद्धिंगत होऊं लागल्या. ह्या **हेन्रीच्या** कारकीर्दीत दोन विलक्षण नव्या वसाहती झाल्या.

फ्लेमिंग्स व सिस्टर्शियन्स.

११०५ त, **फ्लांडर्स** देशांतून जलप्रलयामुळें पळून आलेल्या **फ्लेमिंग्स** लोकांकडून **पेंब्रोकशायरांत** त्यानें वसाहत करविली. तेथें ते आजपावेतों आहेत. आणखी ११२८ त **रूआंग्** नजीक **सीटो** नांवाच्या गांवीं प्रथम स्थापिलेल्या **सिस्टर्शियन** नांवाच्या, आचरणानें कडकडीत व कष्टाळू, **मंकांच्या** पंथापैकीं अनेक **मंक** (जोगी) येऊन, **इंग्लंडाच्या** अति जंगली प्रदेशांत, **सरी** प्रातांतील **वेव्हर्लि** एथें, आणि पुढें उत्तरेकडे आणि पश्चिमेकडे, वस्ती करून राहूं लागले. त्या **सिस्टर्शियन मंकांनीं** मेंढरें पाळून वाढविण्याचा उद्योग मांडला, आणि ओसाड जमिनी साफसफा करून लागवडीस आणल्या, आणि त्या **फ्लेमिंग्सांनीं** आपल्याबरोबर लोंकर विणून तिचें कापड करण्याचें कसब आणलें. ह्यामुळें त्या दोन्ही वसाहती देशाला उपयोगी झाल्या.

हेन्रीचीं दुसरीं दोन कृत्यें एथें सांगणें आवश्यक आहे, कारण पुढल्या राजांच्या कारकीर्दीत तीं मोठ्या महत्वाचीं झालीं. **आर्चबिशप आन्सेल्म** ह्याच्याशीं त्याचा पुष्कळ वादविवाद होऊन, **कथीड्रलां** (बिशपांच्या गाद्या असलेल्या देवळां) संबंधी धर्मोपदेशकांना, आपआपले **बिशप** निवडून नेमूं देण्याला त्यानें आपलें अनुमोदन दिलें. त्यामुळें, **वुइलियम रूफस** रिकामे ठेवी, तसे **बिशप्रिक्स** (म्हणजे बिशपांच्या जागा) **हेन्री** राजाला रिकामे ठेवतां येईनात. तथापि धर्मोपदेशकांकडून निवडणूक व्हावयाची ती राजाच्या कोडतांत व्हावी लागे, आणि बिशपांना आपल्या जमिनींबद्दल राजाला सेवांजलि संस्कार (धनीपणाचा मानपान) करावा लागे. आणखी **हेन्रीनें पोपाला इंग्लंडांत** आपला **लेगेट**, म्हणजे वकील, पाठविण्याची परवानगी दिली. ह्या गोष्टीनें पुढील काळांत त्रास उत्पन्न झाला, कारण त्या **हेन्रीच्या** कृतीनें त्या देशांत **पोपाला** एक प्रकारचा नवीन अधिकार मिळाल्या सारखें झालें.

बिशपांची निवडणूक. पोपाचा लेगेट म्हणजे वकील.

आणि आतां स्वदेशीं (इंग्लंडांत) सर्व गोष्टींविषयीं स्वस्थता असतां **हेन्रीवर** एक मोठें दुःख येऊन पडलें. तो तीन वर्षेंपर्यंत **नार्मंडींत** बारनांशीं लढत होता. तिकडून परत येत असतां त्याचा एकुलता एक मुलगा **वुइलियम** हा, **व्हाइटशिप** (पांढरें जहाज) नांवाच्या जहाजांत समुद्रांत बुडून मरण पावला. तें जहाज एका खडकावर आदळून त्यावर असलेल्या सर्व माणसांसह समुद्रांत बुडालें. त्या दिवसापासून **हेन्री** पुनः कधींही हसला नाहीं असें म्हणतात. आतां तो जर विवेकी आणि उदार असता, तर

हेन्रीचा एकुलता एक मुलगा समुद्रांत बुडून मेला, ११२०.

त्यानें ड्यूक राबर्टीचा मुलगा **नार्मंडीचा वुइलियम** ह्याला आपल्या पश्चात् आपल्या गादीचा मालक करण्याकरितां स्वीकारलें असतें, कारण तो **नार्मंडीकर वुइलियम** चांगला, प्रामाणिक, तरुण पुरुष असून, गादीला अतिशय जवळचा वारस होता. परंतु **हेन्रीनें** आपल्या कुटुंबांत गादी ठेवण्याचें कारस्थान मांडलें. त्यानें, **जर्मनीच्या** सार्वभौम राजाची विधवा जी आपली मुलगी **माटिल्डा** हिचें, **आंजूचा कौंट जिफ्री** ह्याच्याशीं पुनः लग्न केलें. शत्रुत्व करूं लागला तर ज्याला **हेन्री** भीत असे असा **जिफ्रीच** काय तो एकटा पुरुष होता. नंतर, आपल्या मागें त्या **माटिल्डानें** गादीवर बसावें, आणि तिच्या पश्चात् त्या समयीं केवळ तान्हें मूल असलेला जो तिचा मुलगा त्यानें गादीवर बसावें,' ह्या आपण केलेल्या व्यवस्थेला **इंग्लिश** बारनांकडून जुलुमानें शपथ वाहवून त्यानें मान्यता घेतली. त्यांनीं, तो **नार्मंडीकर वुइलियम** लढाईत मारलागेला असें ऐकिल्यावर देखील, शपथ घेऊन ती मान्यता अतिशय नाराजीनें दिली; कारण त्या दंगेखोर बडे लोकांना आपणांवर राज्यकर्त्री स्त्री नको होती. सारांश भाविदर्शन फारच काळोखीचें दिसूं लागलें, आणि तें दिसत होतें त्याहीपेक्षां वाईट असें प्रत्ययास आलें. ११३४ त फेब्रुअरीच्या ३ ऱ्या तारखेस **राबर्ट** बंदिखान्यांत वारला; आणि **हेन्री नार्मंडींत** त्याचें एक शिकारीचें स्थान होतें तेथें, **लांप्रे** नांवाचे मासे खाल्यामुळें उत्पन्न झालेल्या तापानें ११३५ त डिसेंबरच्या १ ल्या तारखेस मरण पावला. त्याचें शव **इंग्लंडांत** आणून **रेडिंग** एथील देवळांत पुरलें. परंतु तें शव **इंग्लंडांत** दाखल होण्यापूर्वीच, भलताच राजा **इंग्लिशांच्या** गादीवर बसला.

हेन्री जुलुमानें माटिल्डा आणि तिचा मुलगा ह्यांना बारनांवर लादतो.

प्रकरण ६.

स्टीफनच्या कारकीर्दीतील एकुणीस वर्षांची झोटिंगपादशाही

११३५–११५४.

आतां हेन्रीच्या मृत्यूनंतर सतत १९ वर्षें पर्यंत इंग्लंडानें, जी हालअपेष्टा, जो रक्तस्राव, व जो क्रूरपणा, पाहिला, तसली हालअपेष्टा, तसला रक्तस्राव, आणि तसला क्रूरपणा, त्यानें खरोखर पूर्वी कधींही पाहिला नव्हता, आणि तें पुनः कधींही न पाहो. ब्ल्वाचा **स्टीफन** हा, आपला मामा **हेन्री** वारतांच, तत्काल त्वरेनें **इंग्लंडास** गेला. तो, **आडिला** नांवाची जी **वुइलियम विजयी** ह्याची मुलगी होती, तिचा पुत्र होता. (तिनें एका ब्ल्वाच्या **कौंटाशीं** विवाह केलेला होता, पृष्ठ ७६ ह्या वरील वंशावळ पहा.) तेव्हां **हेन्रीच्या** मागें, तो, आणि **माटिल्डाचा** लहान मुलगा **हेन्री**, हेच काय ते गादीला पुरुष–वारस होते. **स्टीफन** हा **वुइलियम विजयी** ह्याचा नातू, आणि **हेन्री** हा पणतू होता. **स्टीफन** हा, फार लोकप्रिय, शूर, आणि उदार, असून, **पहिल्या हेन्रीचा** फार आवडता होता. परंतु तो तलख, आणि क्षणिकबुद्धि, असल्यामुळें राज्याचा कारभार हांकण्याला अगदीं अयोग्य होता. **लंडनच्या** लोकांनीं त्याचें अभिनंदन केलें, कारण त्यांना राणी नको होती. आणि **सालिस्बरीचा बिशप राजर**, आणि **वुइंचेस्टरचा बिशप हेन्री** (हा **स्टीफनाचा** सहोदर बंधु होता), ह्या दोघांचें त्या **स्टीफनाला** पाठबळ होतें. त्याची निवडणूक होऊन ११३५ तील हिंवाळ्याचा मध्यदिन म्हणजे डिसेंबरची २६

स्टीफनाचा दावा किंवा हक्क.

वी तारीख ह्या दिवशीं त्याला राज्याभिषेक केला. तेव्हां त्यानें, राज्य चांगल्याप्रकारें चालवीन, आणि बारन लोकांत आपआपसांत कलह होते ते मोडीन, असें वचन दिलें.

परंतु जी गोष्ट त्याच्या हातून होण्यास शक्य नव्हती त्या गोष्टीविषयीं त्यानें वचन दिलें. आतां **हेन्रीचा** जबरदस्त हात राज्यकारभारांतून नाहींसा झालेला पाहून, बारन लोक उघड बंड करून उठले. त्यांनीं आपल्या किल्ल्यांची मजबुती केली, आणि वेगळाले पक्ष उचलले. कित्येकांनीं, **माटिल्डाचा** पुस्तपना करूं अशी शपथ घेतलेली होती, म्हणून **माटिल्डाचा** पक्ष धरला. कित्येकांनीं, **स्टीफन** हा आपला राज्याभिषिक्त राजा म्हणून, त्याचा पक्ष धरला. परंतु त्या साऱ्या बारनांचें खरोखर लक्ष्य, आपणांला ह्या धामधुमींत देश लुटून फस्त करण्यास मिळेल, ह्या एकाच गोष्टीकडे होतें. त्या समयीं **स्काट्लंडचा** राजा **डेव्हिड** नांवाचा होता. तो **माटिल्डाचा** मामा होता, म्हणून त्यानें तिच्या तर्फे शस्त्र धरून उठावा केला. परंतु **यार्कशायरांतील कौटनमूर** नांवच्या गांवाजवळ **"बाटल आफ धि स्टांडर्ड"** (निशाणाची लढाई) नांवची लढाई झाली, तींत त्या **डेव्हिडाचा** पराभव झाला. त्या लढाईला तें नांव पडण्याचें कारण, **इंग्लिशांनीं** एका जहाजाच्या डोलकाठीवर एक अभिमंत्रित वेफर (चकती) चढवून तें आपलें निशाण म्हणून केलेलें होतें.

बाटल आफ धि स्टांडर्ड नावाची लढाई, ११३८.

पुढें ११३९ त **स्टीफनानें** एक मोठी मूर्खपणाची गोष्ट केली. बारन लोक जसजसे अधिकाधिक दंगेखोर होत चालले, तसतशी **बिशपांना** आपल्या जमिनींविषयीं किंवा मालमत्तेविषयीं दहशत वाटूं लागली. म्हणून ते आपले किल्ले नवीन तटबंद्या करून मजबूत

करूं लागले. तेव्हां ते बिशप आपणाशीं विश्वासघात करून माटिल्डाला मिळतील कीं काय, अशी स्टीफनाला दहशत पडून, त्यानें त्यांपैकीं कित्येकांना कैदकरविलें. त्या कैदकेलेल्या लोकांत, त्याचा परम मित्र जस्टिशियर राजर, त्या राजरचा मुलगा चान्सेलर होता तो, आणि त्याचा (राजराचा) पुतण्या ईलाईचा बिशप खजीनदार होता तो, हे होते. त्यानें राजराला तर बिड्या घालविल्या, आणि तुम्ही आपले किल्ले माझ्या हवालीं न कराल तर तुझ्या मुलाला मी फांशीं देईन अशी त्यानें त्या राजराला भीति घातली. तेव्हां बिशप राजर भग्नहृदय होऊन कामकाज सोडून सुखवस्तु राहवयास गेला, आणि स्टीफन आपल्या अत्यंत उपयोगी मित्रांना मुकला. त्या दिवसापासून सर्व नीति आणि व्यवस्था नाहींशी झाली.

स्टीफन, जस्टिशियर आणि चान्सेलर ह्यांस कैदकरवितो.

दरम्यानच्या वेळांत माटिल्डाचा राबर्ट नांवाचा सावत्रभाऊ ग्लास्टरचा अर्ल ह्यानें, आणि उत्तरेकडील व पश्चिमेकडील बारन ह्यांनीं, तिच्या तर्फे शस्त्र धरून उठावा केला. आणि दक्षिण व पूर्व ह्या दिशांकडील भागांतल्या लोकांनीं स्टीफनाच्या तर्फे युद्ध मांडलें. इतक्यांत माटिल्डा ही ११३९ त येऊन पोर्ट्स्मौथ एथें जमिनीवर उतरली. तेव्हां आपआपसांतलें युद्ध म्हणून ज्याला म्हणतात, तें मोठ्या नेटानें जुंपलें. मग एकामागून एक अशा लढाया झाल्या. त्या सर्वांचें वर्णन करणें अशक्य आहे, कारण, सतत आठ वर्षेंपर्यंत देशांतील कोणत्या तरी एका भागांत लढाई चालू नव्हती असा एकही

माटिल्डा, इंग्लंडास येऊन जमिनीवर उतरते, ११३९.

आठवडा गेला नाहीं. एका वेळीं **स्टीफन** हा **लिंकन** येथील किल्ल्यांत कैदेंत पडला, आणि **माटिल्डा** ही **लंडनांत** शिरली, आणि ११४१ त ती राणी झाली म्हणून तिच्या नांवानें डांगोरा पिटला. परंतु ती इतकी दयामायाहीन, आणि तोरेदार, होती कीं, त्या नगरांतील लोक तिच्याविरुद्ध उठले, आणि तिला मुकुट घालून राज्याभिषेक कधींच केला नाहीं. नंतर **बूलोनकरीण माटिल्डा** नांवाची **स्टीफनाची** शूर बायको हिनें, **वुइंचेस्टरच्या** वेढ्याकरितां एक हजार चिलखतवाले लढवय्ये माणूस पाठविण्याला **लंडनांतील** लोकांना चेतवून प्रवृत्त केलें. ह्या हजार लोकांनीं जाऊन तें **वुइंचेस्टर** गांव लुटलें, **ग्लास्टरचा अर्ल** ह्याला धरून कैदकेलें, आणि त्याला **स्टीफनाच्या** बदली कैदेंत ठेवून **स्टीफनाला** मुक्त करविलें. ह्याप्रकारें पुनः एकवार खुला झाल्यावर **स्टीफनानें** ११४२ त **आक्सफर्ड** एथील किल्ल्यांत **माटिल्डाला** गांठून तिला वेढा घातला. तिला तेथें इतकें अतिशय बेजार केलें कीं, तिला पांढरा झगा घालून रात्रीं जमिनीवर ओंड बर्फ पडलेलें होतें त्यावरून पळून जाणें भाग पडलें. पुढें पुष्कळ चकमकी झाल्यानंतर शिणून कंटाळून, ११४७ त ती **इंग्लंड** सोडून निघून गेली, आणि त्याच वेळेच्या सुमारास **ग्लास्टरचा अर्ल राबर्ट** हा मृत्यु पावला.

माटिल्डा इंग्लंड सोडून निघते, ११४७.

इतकें झालें तथापि अजून देशांत स्वस्थता झाली नाहीं, कारण बारन लोक एकमेकाशीं लढत होतेच. प्रत्येक किल्ला हें एक राजाचें राज्यच होऊन बसलें. त्या किल्ल्याचा मालक स्वतःचें नाणें पाडूं लागला, स्वतःचे कायदे करूं लागला, आणि भोंवतालच्या प्रदेशाचा धुवा उडवूं लागला. त्या काळच्या बखरींत लेख आहे

तो येणें प्रमाणें. "किल्ले बांधण्याचे कारखाने चालू करून त्यांनीं त्या
" देशांतल्या दीन झालेल्या लोकांवर निर्दयपणानें जुलूम मांडला,
" आणि जेव्हां ते किल्ले बांधून तयार झाले तेव्हां त्यांत त्यांनीं पि-
" शाचें आणि पापी दुर्जन भरले. नंतर ज्यांजवळ कांहीं चीज-
" वस्त आहे असें त्यांस वाटले, त्यांना दिवसारात्रीं पकडून, व
" मजूरी करणारे पुरुष आणि बायका ह्यांस
" धरून, त्यांच्याजवळ असलेल्या सोन्यारु-
" प्यासाठीं त्यांनीं कैदेंत टाकलें, आणि त्यांना अवाच्य यातना
" केल्या ... हजारों जणांना भुकें मारून बेजार केलें. ह्या प्रकारें
" त्यांनीं ह्या देशांतील दुःखांत बुडालेल्या गरीब लोकांवर जे
" घाय केले, आणि त्यांना ज्या यातना केल्या, त्या सर्वांचें वर्णन
" माझ्यानें करवत नाही, आणि मी करूंही नये. आणि हा प्रकार
" ज्या एकुणीस हिंवाळ्यांभर **स्टीफन** राजा होता त्यांभर टिकला,
" आणि तो प्रकार हळू हळू एकसारखा अधिकाधिक वाईट होत
" गेला ... त्या वेळी धान्य, मांस, पनीर, आणि लोणी, हीं महाग
" होतीं, कारण साऱ्या देशांत ती बिलकूल नव्हतीं ... कांहीं दिव-
" सांनंतर त्यांनीं एकही देऊळ, किंवा देवळाभोंवतालची प्रेतें पुर-
" ण्याची एकही जागा नित्रस सोडली नाहीं, त्यांतील सारी ची-
" जवस्त त्यांनीं घेतली, आणि नंतर तीं देवळें आणि चटसारें एक-
" दम जाळून टाकलें ... जमिनीला पीक येईना, कारण असल्या
" कर्मांनीं त्यांनीं जमीन सारी ओस करून टाकली, आणि माणसें
" उघड म्हणूं लागलीं कीं **ख्रिस्त** आणि त्याचे साधु निजले."

लोकांची हालअपेष्टा.

ह्या प्रकारें दुःख आणि मृत्यु ह्यांनीं लोकांवर कहर उडविला, आणि, परदेशीय धर्मोपदेशकांच्या हाताखालीं जो प्राचीन कळक-ळीच्या भक्तीचा जिव्हाळा इतके फार दिवस निद्रिस्त होता, तो

त्यांनीं जागृत केला. शहरांत आणि खेड्यापाड्यांत लोक उपासना व प्रार्थना ह्यांसाठीं जुटें करूं लागले, जोगी, वानप्रस्थ, अरण्यांत जमूं लागले, आणि अमीर आणि नांगव्ये ह्यांनीं, ते निष्ठुरव्रती सिस्टर्शियन जोगी जेव्हां सर्व अरण्यें आणि जंगलें ह्यांभर पसरले, तेव्हां त्यांचे सारखें अभिनंदन केलें. वारन लोक अधिकाधिक दुष्ट घातकी होऊं लागले, तसतसे सामान्य लोक अधिकाधिक आस्थेवाईक झाले, आणि शेवटीं दुःखपरिहाराचा समय आला.

धर्मसंबंधाचें पुनरुज्जीवन.

११५० त जेव्हां **रोम** एथें निवडणूक होऊन नवीन **पोपाची** स्थापना झाली, तेव्हां त्यानें **कांटर्बेरी** एथील **थिओबाल्ड** नांवाचा **आर्चबिशप** ह्यालाच आपला **इंग्लंडांतील लेगेट**, म्हणजे वकील, नेमलें. त्याचें नीतिविषयक ज्ञान मोठें तिखट होतें. **माटिल्डाचा** पुत्र **हेन्री** हा आतां वयानें २० वर्षांचा झालेला होता, त्याला, आपल्या मागें गादीचा मालक म्हणून मान्य करण्याविषयीं **स्टीफनाला** प्रवृत्त करण्यांत त्या **थिओबाल्डानें** आपल्या नवीन अधिकार संबंधानें उत्पन्न झालेलें वजन खर्च केलें. ह्याच वेळीं **स्टीफनाचा यूस्टेस** नांवाचा मुलगा वारला, आणि **माटिल्डाचा** तरुण मुलगा **हेन्री** हा **इंग्लंडांत** येऊन जमिनीवर उतरला तोंच, राज्याला सुस्थिर शांति मिळेल ह्या आशेनें त्याच्या भोंवतीं एकदम फौज जमा झाली. तेव्हां **स्टीफनाच्या** तत्काल लक्षांत आलें कीं, आतां आपण हट्ट धरून उपयोग नाहीं, **थिओबाल्डाचें** सांगणें मान्य केलेंच पाहिजे. मग त्यानें ११५३ त **वालिंग्फर्डच्या** तहानें त्या **हेन्रीला** गादीचा वारस म्हणून मान्य केलें. त्यायोगें न्याय पुनः स्थानापन्न

वालिंग्फर्ड एथील तह, ११५३.

झाला, कारण जे जे लोक बखेडे मोडून स्वस्थता व्हावी अशी इच्छा करून होते, ते सर्व बंडवाल्यांचा नाश करण्यासाठीं **स्टीफनाला** मिळाले. शिवाय, **स्टीफन** हा थडग्यांत रुतूं लागला होता, म्हणजे त्याचा मरणसमय जवळ आला होता. तो ११५४ त आक्टोबरच्या २५ व्या तारखेस, गादी **हेन्रीला** मागें ठेवून, मरण पावला. ह्याच वर्षी **ओल्ड इंग्लिश क्रानिकल**, म्हणजे प्राचीन इंग्लिश बखर, बंद पडली. तींतील शेवटले लेख **पीटर्बरो** एथील **आबींत** (मठांत) लिहिले.

प्रकरण ७.

हेन्री प्लांटाजनेट आणि त्याचे पुत्र

(आन्जेव्हिन घराण्यांतले राजे)

दुसरा हेन्री, ११५४–११८९.

रिचर्ड, ११८९–११९९. जान, ११९९–१२१५.

स्टीफन मरण पावला तेव्हां **हेन्री इंग्लंडांत** नसून परदेशीं होता. परंतु **आर्चबिशप थिओबाल्ड** ह्यानें, तो येऊन पोहोंचे तोंपर्यंत, चांगला बंदोबस्त ठेवला. तो आल्यावर, त्याच्या वयाच्या एकविसाव्या वर्षी, त्याच्या राणीसहवर्तमान **वेस्टमिन्स्टर** एथें ११५४ त डिसेंबरच्या १९ व्या तारखेस त्याला राज्याभिषेक केला. तेव्हां त्यानें एक **चार्टर**, म्हणजे लेखी राजशासनपत्र, प्रसिद्ध केलें. **फ्रान्स** देशांतील त्याचा मुलूख साऱ्या **इंग्लंडाहून** मोठा होता, आणि आपल्या पसतीस वर्षांच्या कारकीर्दीपैकीं अठरा वर्षे, किंवा अर्ध्याहूनही अधिक काळ, त्यानें **इंग्लंडच्या**


बाहेर घालविला, तरी, **इंग्लिश** राजांपैकीं जे उत्तम म्हणून राजे झाले त्यांतला तो एक होता.

तो एका नवीन वंशांतला पहिला राजा होता. त्या वंशाला कांहीं लोक **प्लांटाजनेट** घराणें असें म्हणतात, कारण **हेन्रीचा** बाप **आन्जूचा कौंट** हा, **प्लांटा जेनिस्टा** किंवा **ब्रूम** नांवाचें एक झाड आहे, त्याची डाहळी आपली निशाणी म्हणून आपल्या अंगावर वागवीत असे. दुसरे कांहीं लोक त्या घराण्यांतील राजांना **आन्जेव्हिन** राजे, किंवा **आन्जूचे कौंट** ह्यांचे वंशज असें म्हणतात. आम्हांला **प्लांटाजनेट** हेंच नांव उत्तमसें वाटतें, कारण तें केवळ एक सांकेतिक चिन्ह किंवा संज्ञा आहे. परंतु **आन्जेव्हिन** ह्या दुसऱ्या नांवावरून, जणू कीं एक नवीन परदेशीय वंश **इंग्लंडा**वर राज्य करण्याला आला, असें ध्वनित होतें. आतां उलट पक्षीं, **हेन्री** म्हटला म्हणजे, **नार्मनां**च्या विजयाच्या काळापासून अलीकडे, देहाच्या शिरांत **वेस्टसाक्सन** रक्त असलेला असा पहिलाच राजा होता. कारण, जरी तो **आन्जूच्या कौंटा**चा मुलगा होता, तरी त्याची आई ही **नार्मन** होती, आणि **साक्सन**ही होती. ती **वुइलियम विजयी** ह्याची नात, आणि **एड्मंड आयर्नसाइड** ह्याचें निपणत्वंड होती. शिवाय, पुढें पाहण्यांत येईल कीं, **हेन्रीचे** वंशज हे **आन्जूचे कौंट** होण्याचे पुढें लवकरच बंद झाले.

दुसरा हेन्री, ११५४–११८९.

तथापि **हेन्री** स्वतः मोठ्या विस्तीर्ण मुलुखावर राज्य करीत होता, आणि त्याच्यामध्यें जलाल **फ्रेंच** स्वभावाचा बराच अंश होता. बापापासून त्याला वारशानें **आन्जू** आणि **टूरेन** हे प्रांत प्राप्त झाले, आणि **मेन, नार्मंडी,** व **इंग्लंड,** हीं त्याची आई आणि आजा

नकाशा नं. ३



आन्जेव्हिन् वंशांतील राजांचें राज्य
मैलाचे स्केल
० ५० १०० १५०
उत्तर समुद्र
बिस्केचा उपसागर
पर्थ
स्टर्लिंग
फोर्थनदी
एडिंबरो
ट्वीडनदी
न्यूकासल
हंबरनदी
अल्स्टर
कॉन्नाट
डब्लिन
लीन्स्टर
लिमरिक
आंगलसी
फ्लांडर्स
पारिस
गारोननदी
बेयोन
लिमोज

ह्यांकडून वारशानें मिळालीं. शिवाय, कान्स्टन्स नांवाची जी ब्रिट्टनीची वारसदारीण होती तिचा नवरा जिफ्री हा हेन्रीचा भाऊ होता, ह्यास्तव त्या नात्याने हेन्री ब्रिट्टनीवर अमल करूं लागला. आणि त्याची बायको एलिनोर हिच्यासवें त्याला, प्वाटू, आक्विटेन, आणि गास्कनी हे प्रांत मिळाले. ती एलिनोर त्याच्याहून वयानें थोर होती, आणि फ्रान्सचा राजा सातवा लूइ ह्याच्यापासून सोडचिठ्ठी होऊन तिचा विवाहसंबंध तुटल्यावर, थोडक्याच आठवड्यांनीं हेन्रीनें तिच्याशीं लग्न केलें.

हेन्रीच्या मालकीचा मुलूख आणि लग्न.

तो दणगट आणि चौरस बांध्याचा पुरुष होता. त्याचे केश अखूड तांबडे, आणि डोळे टळटळीत व कैरे होते. तो इतका चपळ होता कीं, भोजनाशिवाय इतर वेळांत कधीं खालीं बसलेला असा तो विरळ असे, आणि एकवेळ एका ठिकाणीं सांपडला तर दुसऱ्या वेळीं कोठें मिळेल हें त्याच्या प्रजेपैकीं कोणाच्यानेंही सांगवत नव्हतें. ह्या प्रकारच्या स्वभावामुळें तो प्रजेला सदा हुकुमांत किंवा जरबेंत ठेवी. त्याचें विद्याध्ययन आणि शिक्षण चांगलें झालेलें होतें, आणि जेव्हां त्याच्या जलाल स्वभावापुढें त्याचा विचारीपणा दबून जात नसे, तेव्हां तो व्यवहारांतल्या कामकाजांत हुशार, आणि राजनीतिकुशल होता. तो आपल्या मुलांविषयीं वत्सल होता. परंतु त्यांनीं त्याच्याशीं गैरवर्तन केलें. तो आपल्या बायकोशीं ममताळू किंवा इमानी नव्हता. ह्या गोष्टीपासून पुष्कळ किचाटें उत्पन्न झालीं.

हेन्रीचें रूप आणि गुणदोष.

समर्थ आणि न्यायी प्रभूपासून जें हित होतें तें इंग्लिश लोक लवकरच अनुभवूं लागले. राजाच्या परवानगीवांचून बांधलेले किल्ले,

थिओबाल्डाच्या सल्ल्यानें, **हेन्रीनें** बारनांकडून जुलुमानें जमीनदोस्त करविले. **स्टीफनानें** आपल्या अनुयायांना लांचविण्यासाठीं म्हणून ज्या राजकीय जमिनी दिलेल्या होत्या त्या **हेन्रीनें** परत घेतल्या, आणि त्यानें (**स्टीफनानें**) परदेशीय लष्कर **इंग्लंडां**त आणलेलें होतें तें **हेन्रीनें** फांटा देऊन माघारें लावून दिलें. माजी अमलांत बंद केलेलीं न्यायाचीं कोडतें त्यानें पुनः स्थापलीं, आणि चांगल्या, आणि आपणावर ज्याची निष्ठा आहे अशा, एका **रिचर्ड डी लूसी** नांवाच्या पुरुषाला निवडून आपला **जस्टिशियर** नेमलें. त्या **लूसीनें** २५ वर्षेपर्यंत त्याची नौकरी केली. **टामस बेकेट** नांवाचा **कांटर्बरी** एथील **आर्च डीकन** (बिशपाच्या खालचा अधिकारी) होता, त्याला त्यानें आपला **चान्सेलर** (पंडितराव) केलें. **गिल्बर्ट बेकेट** नांवाचा एक श्रीमंत **नार्मन** व्यापारी, **लंडन** बंदरचा **शेरिफ्फ** किंवा **मॉजिस्ट्रेट**, आणि **आर्चबिशप थिओबाल्ड** ह्याचा शिष्य व मित्र होता, त्याचा तो **टामस बेकेट** पुत्र होता.

टामस बेकेट चान्सेलर.

जरी **हेन्रीनें** परदेशीं कित्येक युद्धें केलीं, आणि तो, ११५८ पासून ११६३ पर्यंत पांचवर्षें, देशांतरीं होता, तरी पुढील दहा वर्षेपर्यंत **इंग्लंड** निवांत होतें. **हेन्री** देशांतरीं होता तेव्हां देखील **इंग्लंडांतील** राज्यकारभारसंबंधी गोष्टींत त्याचें मन गुंतलेलें असे, आणि ह्या दहा वर्षांत तेथील लोकांकरितां त्यानें पुष्कळ चांगले कायदे केले. त्याला बारनांचें प्राबल्य दडपून टाकावयाचें होतें, आणि परदेशीं चालविलेल्या आपल्या युद्धांकरितां लागणाऱ्या शिपायांस देण्याला पैसा उत्पन्न करावयाचा होता. ह्या दोनही गोष्टी त्यानें एक गोष्ट करून साधल्या, ती ही. बारनांचे पोट-

जाहागीरदार ह्यांना आपआपल्या धन्यांमागून परदेशीं चाललेल्या युद्धांस जाणें भाग होतें. तें तसें त्यांस जाणें न पडावें असें असेल तर, त्यांनीं राजाला म्हणजे आपल्याला, "स्कूटेज", किंवा "शील्डमनि" (स्कूटेज हा शब्द ढाल ह्या अर्थी स्कूटम शब्द आहे त्यावरून साधलेला), म्हणजे चाकरीपासून ढालीसारखा बचावणारा पैसा, ह्या नांवाचा दंड द्यावा असा त्यानें ठराव केला. हा, त्या पोटजाहागीरदार शेतीभाती करणाऱ्या कुळांना एक मोठा वरप्रसादच मिळाल्यासारखा वाटला. कारण, शेतें पेरून पिकें कापण्याला आपण घरीं राहूंच असा त्यांना निर्धास्त भरवसा ठेवतां येऊं लागला. दुसऱ्या पक्षीं, बारनांनी मुंडी हालवून खूण करून हाक मारतांच त्यांच्या चाकरीला येणारीं अशीं हत्यारवालीं माणसें आतां त्यांच्या कह्यांत पूर्वीहून थोडींच राहिलीं, त्यायोगें त्या बारनांचें बळ अर्थात् कमी झालें.

स्कूटेज.

फिरते न्यायाधीश आतां पूर्वीहून नियमानें आपल्या फेऱ्या करूं लागले. कारण, हेन्रीनें सर्व देशाचे विभागून सहा प्रांत किंवा सर्किटें म्हणजे मंडलें केलीं, आणि प्रत्येक शायरांत चौघां नाइटांनीं (बडे लोकांची एक पदवी), आणि ज्यांतील लोकांना परस्परांचे शेजारी म्हणतां येईल, अशा प्रत्येक भागांतील बारा पुरुषांनीं, गुन्हे करणारे आणि मालमत्तेविषयीं वाद करणारे ह्यांना त्या फिरत्या न्यायाधीशांपुढें हाजीर करावें, आणि ते गुन्हेगार अपराधी आहेत म्हणून, किंवा मालमत्तेच्या वादांत खरें अमुक इतकें आहे म्हणून, शपथ वाहून सांगावें, अशी त्यानें व्यवस्था केली. हीच ती ग्रांड जूरी (मोठी जूरी) होय, आणि तींतील लोकांना जूरर्स

सर्किटें म्हणजे मंडलें आणि जूऱ्या.

(जूरीदार) असें नांव पडलें. **जूरी** किंवा **जूरर्स** हा शब्द, मी शपथ करितों, ह्याअर्थी जूरो ह्या **लाटिन** शब्दापासून साधला आहे. मालमत्तेसंबंधी खटल्यांत ते बाराजण **"सिव्हिल जूरी"** (दिवाणी कामांसंबंधीं **जूरी**) म्हणून वर्तत, तेव्हां त्यांच्या साक्षी-नेंच वादाचा निर्णय होई; परंतु गुन्ह्यांचा आरोप ज्यांवर असे, त्या लोकांना, पुढें, प्राचीन **साक्सन** काळांतल्या वहिवाटीप्रमाणें, "दिव्यानें" चौकशी होऊन निकाल करण्यासाठीं पाठवीत. पुढें चाळीस वर्षांनीं, **जान** राजाच्या कारकीर्दींत, दिव्यें बंद करण्यांत आलीं, आणि मग हीच **ग्रांड जूरी** कैद्याला **"पेटि जूरी"** कडे पाठवी. **पेटि जूरी** म्हणजे छोटी किंवा लहान जूरी. ही, ज्यांना त्या खटल्यांतील साऱ्या खऱ्या गोष्टी माहीत असण्याचा विशेष संभव असे अशा दुसऱ्या बारा लोकांची असे. ते बाराजण, आपल्या जातीच्या माहितीवरून **ग्रांड जूरीनें** केलेला गुन्ह्यांचा आरोप खरा आहे किंवा नाहीं तें सांगत. ह्या त्यांच्या सांगण्याला **"व्हर्डिक्ट"** (निवाडा) देणें असें म्हणत. त्या **व्हर्डिक्ट** शब्दाचा अर्थ "खरें म्हटलेलें किंवा सांगितलेलें" हा आहे. त्याच्याही पुढें **पेटि जूरी**ला अनुभवानें समजलें कीं, आपणांहून इतर लोकांना काय माहीत आहे ह्याची बारकाईनें चौकशी करणें जरूर आहे. ह्यास्तव साक्षी म्हणून असतील त्यांचें म्हणणें ऐकून घेण्याची वहिवाट सुरू झाली.

लोकांना, आपलें कोणाकडूनही कांहीं वाईट झालें तर, फिर्याद करण्याला आतां हरएक संधि असे, आणि ज्यांत ह्या वर सांगितलेल्या फेरफारांचें दृढीकरण केलें होतें, म्हणजे ते मंजूर केले होते, अशीं **क्लारेंडन** एथील ११६६ तील, आणि **नार्थहाम्टन** एथील ११७६तील, राजशासनें हीं, **इंग्लिश** लोकांच्या स्वातंत्र्याच्या संबंधानें

आमच्या हालींच्या दिवसांत देखील मोठीं महत्त्वाचीं म्हणून ध्यानांत ठेवलीं पाहिजेत. ह्या चांगल्या कायद्यांच्या अमलाखालीं देशांत स्वास्थ्य असल्यामुळें, पुष्कळांना, पूर्वींच्या धामधुमीच्या काळांत ज्ञान मिळविण्याचा विचार करतां येत नव्हता, तो विचार करण्यास आतां त्यांना मोकळीक मिळाली. आणखी **आक्सफर्ड** एथें **फ्रायर्स** (रोमन क्याथोलिक धर्मातील जोग्यांच्या चार पंथांपैकीं एका पंथांतील जोगी) लोक हेच त्या कालीं मुख्यत्वें शिक्षक होते, त्यांच्यापासून विद्यार्थी व्याख्यानें ऐकूं लागले, ही वार्ता आम्ही पहिल्यानेंच ऐकतों. हा आरंभ अल्प होता खरा, तथापि ती भावी मोठ्या विद्यालयाची सुरवात होती.

क्लारेंडन एथील राजशासन, ११६६.

आक्सफर्डएथील पहिलेच विद्यार्थी.

न्यायाचीं कोडतें सुधारण्याच्या कामीं **हेन्री** फारच कळकळ वागवीत होता, तीमुळें त्यानें आपणावर मोठेंच अरिष्ट आणून घेतलें. त्याचा **चान्सेलर** (पंडितराव) **टामस बेकेट** हा मोठा मनुष्य बनलेला असून त्याचा जिवलग मित्र झालेला होता; आणि जेव्हां **थिओबाल्ड** वारला तेव्हां, जसें आपल्या बडे लोकांना सुधारलें तसें, आपल्या धर्मोपदेशकांनाही सुधारलें पाहिजे, असें मनांत येऊन, त्या कामीं तो आपणाला साहाय्य करील असें वाटून त्यानें **टामस बेकेटाला कांटर्बरी** एथील **आर्चबिशप** केलें. परंतु जें कोणतेंही काम आपल्याला करावयाचें असेल त्यांत तो **बेकेट** आपलें सारें अंत:करण घाली. जेव्हां तो **चान्सेलर** होता, तेव्हां तो राजाचा नौकर होता, आणि त्याची सेवा त्यानें चांगल्या प्रकारें केली. तो **आर्चबिशप**

बेकेट आर्चबिशप होतो.

झाला, तेव्हां तो धर्माचा नौकर बनला, म्हणून त्यानें आपला छानीचा पोषाक वर्ज केला, तो केंसांचें विणलेलें खमीस वापरूं लागला, आणि धर्मोपदेशकांचा पुस्तपना करण्याचा त्यानें निश्चय केला.

पहिल्या वुइलियमानें धर्मोपदेशकांना त्यांचीं म्हणून वेगळीं कोडतें स्थापून दिलीं होतीं, हें स्मरणांत असेलच (८७ वें पृष्ठ पहा). ह्या व्यवस्थेपासून फार वाईट झालें, कारण जरी धर्मोपदेशकांकडे ज्यांना विद्वत्ता नको अशीं धर्मसंबंधेतर गृहस्थी सरकारी कामें पुष्कळ होतीं, तरी त्या दिवसांत विद्याभ्यास केलेले सुशिक्षित लोक बहुतेक सारे काय ते धर्मोपदेशकच होते; आणि त्यांनीं कोणतेही गुन्हे केले, चोऱ्या व खून देखील केले, तरी त्यांची सुटका सहज होई, कारण धर्माधिकारीमंडळाला भारी सजा नव्हत्या, आणि सामान्य न्यायाधीशांचा धर्मोपदेशकांवर अमल नव्हता. हेन्रीनें आग्रह धरला कीं, सामान्य गुन्ह्यांबद्दल धर्मोपदेशकांची चौकशी किंग्स कोर्ट (राजाचें कोडत) म्हणून जें होतें त्यांत होऊन, एड्वर्ड धि कान्फेस्सर ह्याच्या कारकीर्दींत होई तशी, त्यांना इतर माणसांसारखी सजा झाली पाहिजे. ह्या गोष्टीला बिशप कबूल झाले, परंतु बेकेट कबूल होईना; आणि धर्मोपदेशकांच्या नियंत्रणासाठीं म्हणून ११६४ त "कान्स्टिट्यूशन्स आफ क्लारेंडन" (क्लारेंडन एथील व्यवस्थापक राजशासनें) ह्या नांवाचे कानू केले होते, त्यांवर बेकेटची समजूत घालून त्याकडून आपला शिक्कामोर्तब करविला, तरी, दुसऱ्याच दिवशीं आपण हें गैर केलें असा त्याला पश्चात्ताप झाला, आणि मीं दिलेल्या ह्या वचनांतून किंवा मान्यतेंतून मला आपण मुक्त करावें असा त्यानें पोपाला अर्ज केला.

धर्मोपदेशकांची चौकशी.

हें ऐकून हेन्री आपला मित्र बेकेट ह्यावर रागानें संतप्त झाला. त्यानें त्याचे सर्वप्रकारचे अपमान केले, आणि त्याला जुलुमानें फ्रान्स देशीं पळवून लावलें. तेथें तो सहा वर्षेपर्यंत राहिला. इकडे हेन्रीनें नीचपणाच्या अकसीनें त्याचे सारे आप्त व इष्ट ह्यांना देशपार केलें. दरम्यानच्या वेळांत ११७० सालीं, आपण देशांतरीं जातों त्या वेळीं आपल्या मागें राज्य चालवायाला कोणी तरी पाहिजे, ह्यास्तव राजपुत्र हेन्री ह्याला राज्याभिषेक करवावा अशी हेन्रीला इच्छा झाली. तेव्हां बेकेट तर देशपार होऊन परदेशीं होता, म्हणून यार्क एथील आर्चबिशप राजर ह्यानें तो अभिषेकसंस्कार केला. ही गोष्ट कांटर्बरीचा आर्चबिशप म्हणविणारास अत्यंत अपमानाची होती, म्हणून, बेकेटाला माघारें न बोलावलें तर, मी आपणावर बहिष्कार घालीन, अशी पोपानें हेन्रीला धमकी दिली.

राजपुत्र हेन्री ह्याला राज्याभिषेक केला.

हेन्री त्या वेळीं फ्रान्स देशीं होता, त्याला त्या धमकीमुळें तंटा मिटवून बेकेटाला इंग्लंडास माघारें जाण्यास परवानगी देणें भाग पडलें. परंतु आतां त्याची पाळी आली तेव्हां, बेकेट रागानें संतापलेला होता. त्यानें इंग्लंडांत पाय ठेवतांच, राजपुत्राला राज्याभिषेकसंस्कार केल्याबद्दल त्यानें यार्केच्या आर्चबिशपाला त्या अधिकारावरून सस्पिंड केलें, म्हणजे कांहीं दिवस अधिकारावरून दूर ठेवलें. तो तंटा उभयतर्फे मूर्खपणाचा होता, आणि हेन्रीचा वेडेपणाचा तैष तर त्याहूनही मूर्खपणाचा होता. त्या तैषानें हेन्री एकदां कडकून बोलला "ह्या दंगेखोर धर्मोपाध्यायापासून मला कोणीच का सोडवीत

बेकेटाचा खून, तारीख २९ डिसेंबर ११७०.

नाहीं ?" चौघां नाइटांनीं (सरदार बहादुरांनीं) त्याचे ते उद्गार ऐकून त्याची मनीषा खरीच तशी आहे असें समजून, ते फ्रान्सांतून खाडी ओलांडून इंग्लंडांत आले, आणि कांटर्बरी एथील त्या बेकेटाच्याच कथीड्रलांतील (देवळांतील) भूमीवर त्या शांत व शूर पुरुषाचा त्यांनीं खून केला.

क्रोधाचा आणि सूड उगविण्याच्या बुद्धीचा परिणाम ह्या प्रकारचा झाला. कायदा पालटला ही यथान्याय तीच हेन्रीनें गोष्ट केली, आणि त्या गोष्टीला आड येण्यांत जें आपलें कर्तव्यकर्मसें त्याला वाटलें तेंच बेकेटानें केलें. परंतु आपला छळ झाला त्याबद्दल सूड घेण्याच्या बुद्धीनें शेवटीं बेकेट भलत्या मार्गाला गेला, आणि क्रोधानें हेन्री आपल्या मित्राचा प्राणघात करणारा झाला. असो, झालेली गोष्ट हेन्रीनें ऐकली तेव्हां त्याला फार पश्चात्ताप झाला, आणि बेकेटाचा खून व्हावा अशी माझी बिलकूल मनीषा नव्हती हें कळविण्यासाठीं, पोपाकडे त्यानें तत्काल जासूद पाठवले. नंतर पोपाकडून दोषमुक्तता होई तोंपर्यंत आपण दूर असावें अशी इच्छा होऊन तो फ्रान्सांतून खाडी उतरून इंग्लंडांत आला, आणि तेथून निघून खाडी ओलांडून आयर्लंडांत गेला.

आयर्लंडांत मोठेच पालट होत होते. डेनांनीं ७९५ त त्या देशावर स्वारी करून तेथील लोकांवर जुलूम करून त्यांना लुटलें, त्या काळापासून ते लोक लोटत लोटत रानटीपणाच्या पूर्व स्थितींत माघारे चालले होते. १०१४ त ब्रायन बोरू नांवाच्या आयरिश वीरानें डेनांना आपल्या देशांतून बाहेर पिटाळून लावलें, आणि तो त्यांच्याशीं झालेल्या लढाईत मरण पावला. तेव्हांपासून त्या देशांतील छोटे छोटे राजे आणि रजवाडे नेहमी आपआपसांत लढाया करीत असत. आपल्या कारकीर्दीच्या आ-

रंभींच, खाडीवरून जाऊन **आयर्लंड** देश जिंकण्याविषयीं **हे-न्रीनें पोपाची** आज्ञा मिळविलेली होती; परंतु ११६६ त **आयरिश** राजांतून **डर्मोट** नांवच्या **लीन्स्टर**च्या राजानें, आपल्या आशीं-पाशींच्या राजांशीं लढण्यासाठीं **हेन्रीकडे** कुमक मागितली तोंप-र्यंत, **हेन्रीनें** त्या प्रकरणीं कांहीं उद्योग केला नाहीं. नंतर **हेन्रीनें**, **"स्ट्रांग्बो"** उपनांवाच्या **रिचर्ड डि क्लेर** नांवाच्या **पेंब्रोक**च्या **अर्ली**ला साहसी लोकांची फौज घेऊन त्या देशांत जाण्याला पर-वानगी दिली. त्यानें बहुतेक **लीन्स्टर** प्रांत जिंकून काबीज केला. तेव्हां हा नवीन मुलूख स्वाधीन करून घेण्यासाठींच मुजरत, आतां **हेन्री** फौज घेऊन **आयर्लंडांत** गेला. तो तेथें **डब्लिन**च्या बा-हेर तळ देऊन एक वर्षभर राहिला, आपल्या अनुयायांना त्यानें जमिनी दिल्या, किल्ले बांधविले, आणि तेथील राजेरजवाड्यांकडून **आयर्लंडाचा** प्रभु म्हणवून घेऊन तो प्रभुत्वाचा मानपान पावला.

लीन्स्टर हा प्रांत जिं-कला.

पुढें पांचवर्षांनीं त्यानें आपला प्रीतींतला मुलगा **जान** ह्याला त्या देशांत अमल करण्यासाठीं पाठवलें. परंतु त्या **जानानें** तेथें इतके पुष्कळ शत्रु केले कीं, त्याला तेथून परत यावें लागलें. **आ-यर्लंड** जिंकण्याची ही सुरवात होती, त-थापि **इंग्लिशांचा** वास्तविक अमल त्या देशांत होण्यापूर्वी तीनशें-हूनही जास्ती वर्षें लोटलीं.

दुसरा हेन्री आय-र्लंडचा प्रभु होतो, ११७१.

ह्या प्रकारें हेन्री आपलें राज्य वाढवीत होता तों, स्वदेशीं त्याचे पुत्र आणि त्याचे शत्रु ह्यांनीं, **बेकेट**च्या खुनापासून अंगावर कांटे उभे राहण्यासारखें महाभय उत्पन्न झालें होतें, ती संधि सा-धून त्याच्या विरुद्ध बंड केलें. **राजपुत्र हेन्री** ह्याला **इंग्लंड**